**हॉवर्ड गार्डनर यांनी खालीलप्रमाणे आठ बुद्धिमत्ता सांगितल्या आहेत. मुलांच्या बुद्धिमत्ता ओळखून त्या अंगाने शिक्षणाची रचना करता येते.**

- ❖ भाषिक बुद्धिमत्ता : शब्दसामर्थ्य, भाषासामर्थ्य, वक्तृत्व, वाङ्मयनिर्मिती, विविध भाषांचे आकलन
- ❖ तार्किक - गणिती बुद्धिमत्ता : संख्यासामर्थ्य, तार्किकता, वैज्ञानिकता, विश्लेषणशक्ती
- ❖ सांगीतिक बुद्धिमत्ता : संगीताची समज व आवड, गायन, वादन, रागांचे चलन-वलन समजणे
- ❖ शरीर-स्नायूविषयक बुद्धिमत्ता : शरीराचा कुशलतेने वापर करून नृत्य करणे, विविध खेळांत वाकबगार होणे, शरीरस्नायूंवर नियंत्रण असणे.
- ❖ अवकाशीय बुद्धिमत्ता : फिल्म्स-व्हिडिओ तयार करणे, वास्तुशास्त्र, शल्यविशारद यांचे कौशल्य, दिशांचे अंदाज, आलेख करता येणे
- ❖ निसर्गविषयक बुद्धिमत्ता : निसर्गाची आवड, झाडे-पशू-पक्षी यांच्या अभ्यासात रस, बागा-पर्यावरण यांच्या अभ्यासात गती.
- ❖ व्यक्तीअंतर्गत बुद्धिमत्ता : स्वत:ला ओळखणे, स्व-नियंत्रण, स्वत:च्या भाव-भावना ओळखणे, त्यांवर नियंत्रण ठेवणे, आत्मशोधाची आवड असणे
- ❖ आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता : दुसऱ्या व्यक्तींच्या भाव-भावना, हेतू, इच्छा यांची समज, लोकांच्यात मिसळण्याची आवड, नेतृत्वाची कला इ.

**मुलांना हुशार करण्याच्या फंदात पडू नका. मुले चलाख कशी होतील, ते पाहा.**

संदर्भ : लहान मुलांच्या शाळांसाठी, प्रा. रमेश पानसे

# शिक्षणवेध

शिक्षणातील परिवर्तनासाठी

**वर्ष : चौथे । अंक आठवा**
**मार्च २०१४**

संपादक
रमेश पानसे

कार्यकारी संपादक
डॉ. वैखरी वैद्य

संपादन साहाय्य
मुग्धा नलावडे

व्यवस्थापकीय संपादक
प्रसाद मणेरीकर

संचालक
अदिती नातू

संपादक मंडळ
डॉ. द. ना. धनागरे । डॉ. हेमचंद्र प्रधान
विवेक सावंत । आशिष पेंडसे

सल्लागार मंडळ
डॉ. राम ताकवले । डॉ. जब्बार पटेल
कुमार केतकर । प्रमोद लेले । दीपक घैसास ।
डॉ. चंद्रहास देशपांडे । अच्युत गोडबोले

कार्यकारी संचालक
अजित मंडलिक

मुखपृष्ठ
राजू देशपांडे

आतील चित्रे
अपर्णा कुलकर्णी

सजावट व मांडणी
राजश्री जाधव

मूल्य
रु. ४० /-

**संपादकीय व कार्यालयीन पत्रव्यवहार :**

'सृष्टी' अपार्टमेंट,फ्लॅट नं.१०६, सिंहगड रोड,पुणे-३०. संवाद -०२०-२४२५२१५१

**पुणे कार्यालय :**

गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड, पुणे ४११०३८.

संवाद : ०२०२५३८६६८७ Email : shikshanvedh@grammangal.org,

**मुंबई कार्यालय :**

अजित मंडलिक, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७., संवाद : ०९८६९०४९८४९

हे मासिक मुद्रक-प्रकाशक अजित मंडलिक यांनी ग्राममंगल संस्थेसाठी इम्प्रेशन, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७ येथे छापून त्याच ठिकाणाहून प्रसिद्ध केले.



# ॥ अंतरंग ॥


संपादकीय / ६

बालकाचा मेंदू-विकास / प्रा. रमेश पानसे / ८

स्वामी विवेकानंद आणि ज्ञानरचनावादी शिक्षण / डॉ. कैलास बवले / १४

मुलांमधील वाढती व्यसनाधीनता : एक सामाजिक प्रश्न / डॉ. अनुराधा सहस्रबुद्धे / १८

महत्त्व श्रमप्रतिष्ठेचे / वैजयंती देवळालकर / २२

प्रश्न शिक्षणाच्या माध्यमाचा / कालिदास मराठे / २५

व्रतस्थ संन्यासिनी : सिंधुताई अंबिके / संतोष वनकर / ३०

चार भिंतींबाहेरील शिक्षण / वासंती जोशी / ३३

वडिलांचाही सहवास हवा / पुष्पा सोळंके / ३९

काही अनुवादित कविता / ४४

सर्जनशीलता आणि शैक्षणिक प्रगती / डॉ. रत्ना गुजर / ४६

वृत्तविश्व / ५०

ग्राममंगलवार्ता / ५२

पुस्तकपरीक्षण / डॉ. विनायक गंधे / ५३

लहान मुलांच्या पालकांसाठी / भाग्यश्री चौथाई / ५६

आम्हांलाही शिकायचं आहे / जयश्री घाटगे / ५८

शंका-समाधान / गंपूदादा / ६४

संपादकीय

# खेळवाडीचा शिक्षणक्रम

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेने कित्येक वर्षांपूर्वी, शिशुवाडी (वय वर्षे साडेतीन ते साडेचार) आणि बालवाडी (वय वर्षे साडेचार ते साडेपाच-सहा) या बालकांच्या शिक्षणातील पायाभूत वर्गांसाठी शिक्षणक्रम तयार केला. पुढे दहा वर्षांनंतर बदलत्या गरजांनुसार व बदलत्या शास्त्रज्ञानानुसार त्यांत काही बदलही केले. अनेक ठिकाणी त्यांचा वापर केला जातो. अलीकडे, आपल्या मुलांना आणखीही लहान वयांत बालशाळांतून घालण्याची प्रवृत्ती आणि प्रथा, पालकांच्यात जोर धरू लागली आहे. वयाच्या दोन-अडीच वर्षांपासूनच मुलांना बालशाळांतून दाखल केले जात आहे, आणि मागणीप्रमाणे अशा व्यवस्थांचा पुरवठाही केला जात आहे. बऱ्याचदा पालकांच्या लेखी लवकर शाळांतून घालून, लवकरात लवकर लिहा-वाचायला शिकवण्याचा अट्टाहास केवळ शिक्षणविषयक गैरसमजातून केला जातो हे खरे; पण बालशाळा चालवणाऱ्यांनी त्यांना बालवय, बालविकास व बालशिक्षण या गोष्टी समजावून देऊन, आपल्या बालशाळांचे स्वरूप शास्त्रीय पद्धतीचे ठेवूनच ते औपचारिक शिक्षणापासून दूर ठेवले पाहिजे.

बालशाळांना, त्यांतील शिक्षिकांना आणि त्यांच्या पालकांना मदत व्हावी म्हणून, महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेने, अलीकडेच दोन दिवसांचा अभ्यासवर्ग घेऊन खेळवाडीचा (वय वर्षे अडीच ते साडेतीन) शिक्षणक्रम तयार करायला घेतला.

शिक्षणक्रम तयार करताना दिशादर्शक अशी एक भूमिका निश्चित केली. या लहान वयाची मुले फार तर दोन-अडीच तास खेळवाडीत असतील व बाकीचा वेळ घरीच वाढतील. त्यामुळे शैक्षणिक अंगाने या वयाला भिडण्यासाठी खेळवाडीबरोबरच घरात, पालकांकरताही काही, बालकांसाठीचे विकासात्मक उपक्रम उपलब्ध करून द्यावेत असे ठरले.

हा शिक्षणक्रम तयार करताना शास्त्राधार अपेक्षितच होता. बालकाचे खेळवाडीचे वय हे मेंदू स्तरावरील शारीरिक व भाषिक क्षमतांच्या विकासाचे वय असते, ही मज्जामानसशास्त्राने दिलेली जाण विचारात घेऊन, खेळवाडीतही हीच दोन विकासक्षेत्रे समोर ठेवून शिक्षणक्रम तयार करावा अशीही भूमिका निश्चित केली.

शिक्षण हे नेहमीच अनुभवातून होत असते, ही शास्त्रीय बालशिक्षणाची जाण विचारात घेऊन, या वयातील मुलांना साजेसे पण त्याचबरोबर त्यांच्या मेंदूविकासास अनुसरून त्यांना कोणते

अनुभव देता येतील याचाच विचार प्राधान्याने करायचा होता. त्यामुळे, एक, शारीरिक हालचाल व दोन, भाषिक व्यवहार अशी दोन अनुभवक्षेत्रे निश्चित करण्यात आली.

गेल्या काही दशकांमध्ये पुढे आलेल्या आकलनविषयक शास्त्राने 'शिकण्या'विषयीचे काही तत्त्वज्ञान व शास्त्रज्ञान आपल्यापुढे ठेवले आहे, त्याचाही आधार घ्यायचे ठरविले. शास्त्र असे सांगते की, नवे शिकणे हे पूर्वज्ञानाला म्हणजे आधीच्या ज्ञानाला जोडूनच नेमकेपणाने होत असते. त्यामुळे अडीच वर्षे वयाचे मूल जर खेळवाडीत येणार असेल तर त्याचे पूर्वीचे ज्ञान कोणते असेल, किती असेल व किती विविध प्रकारचे असू शकेल हे विचारात घेऊन त्यासाठीचे शारीरिक हालचालींचे व भाषावृद्धीचे अनुभवाधारित उपक्रम मुलांपुढे ठेवले जावेत. अर्थातच असे बालकांने अगदी अल्पावयांत घेतलेले अनुभव हे प्रामुख्याने त्याने आपल्या घरात आणि नजीकच्या परिसरातच घेतलेले असणार आणि त्यातूनच त्याचे 'पूर्वज्ञान' घडलेले असणार असे गृहीत धरून, बालकाच्या पूर्वज्ञानाचे स्वरूप व अंदाज याच परिसरात धुंडाळला पाहिजे, व त्याकरता यासंदर्भातील विचारांची सुरुवात प्रत्यक्ष मूल व त्याचे घर यांपासून करावी असे ठरवण्यात आली.

अर्थात, शिक्षणक्रम तयार करण्याची ही सारी शास्त्रीय पार्श्वभूमी झाली. प्रत्यक्षात याच्या आधारे मुलांना नवे ज्ञान आत्मसात करावयाचे आहे, याविशिष्ट वयात होत असलेला मेंदूचा विकास व शारीरिक व भाषिक क्षमतांचा विकास यांना पोषक असे नव्या ज्ञाननिर्मितीचे अनुभवविश्व खेळवाडीतील उपक्रमांतून, साधनातून नव्याने उभे करावयाचे आहे. यासाठी महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे कार्यकर्ते कटिबद्ध आहेत. लवकरच एक अतिशय अनुभव समृद्ध शास्त्रीय शिक्षणक्रम - खेळवाडीचा शिक्षणक्रम - आपल्याला उपलब्ध होईल अशी आशा करावयास हरकत नाही.

**संपादक**

**शहाणपणाची गोष्ट**

## स्पर्धा

**सदा शहाणे**

शाळेतल्या पाच मुलांना शिक्षकांनी वक्तृत्व स्पर्धेला पाठवले;
कुणी कुणी बक्षिसे मिळविली, इतरांना ते कळलेच नाही.
कळले त्यांना त्याचे काही वाटलेच नाही.
शाळेने पाच मुलांना चित्रकलेच्या स्पर्धेला पाठवले.
कुणी कुणी बक्षिसे मिळविली. इतरांना ते कळलेच नाही.
कळले त्यांना त्याचे काही वाटलेच नाही.
शाळेने पाच मुलांना खेळांच्या स्पर्धेला पाठवले.
कुणी कुणी बक्षिसे मिळविली. इतरांना ते कळलेच नाही.
कळले त्यांना त्याचे काही वाटलेच नाही.
हेडमास्तरांनी पाहुण्यांना ते बक्षिसांचे ताठ मानेने सांगितले.
आधी ठरवून दिल्याप्रमाणे मुलांनी टाळ्या वाजवल्या.
पाहुण्यांनी आपल्या भाषणात मोठे कौतुक केले.
**वक्तृत्व, चित्रकला, खेळ हे शाळेचे विषयच नाहीत; शहाणपण म्हणाले !**

■
प्रा. रमेश पानसे

# बालकाचा मेंदू-विकास

■■

विकासाच्या दोन अवस्थांमध्ये बालकाच्या मेंदूची प्रगती आपल्याला पाहता येईल. एक- जन्मपूर्व अवस्था आणि दुसरी-जन्मोत्तर अवस्था. मेंदूची पहिल्या अवस्थेतील तयारी ही प्रामुख्याने जनुकांची ठरवून दिलेल्या नियोजनाने घडत असते; तर तिला मातेचे निरोगी, पोषक वातावरण उपयुक्त ठरत असते. बालकाच्या मेंदूची दुसऱ्या अवस्थेतील प्रगती मात्र, जनुकांच्या नियोजनाने, परंतु बाह्य वातावरणाची पुष्टी प्राप्त होऊन घडत जाते. साहजिकच दुसऱ्या अवस्थेतील ही प्रगती जेवढी नैसर्गिक, तेवढीच सामाजिक-सांस्कृतिक अशी असते.

**१. जन्मपूर्व अवस्था** (Prenatal Stage)

मातेच्या गर्भाशयात झालेल्या बीजधारणेनंतर तिसऱ्या आठवड्यापासून मेंदूपेशी तयार होऊ लागतात. हे काम सुरू होते ते मात्र एकदम अतिशय वेगाने. दर मिनिटास २,५०,००० या वेगाने पेशी तयार होतात. बीजधारणेनंतर तीनच आठवड्यांनी गर्भाशयाचे तीन पदर तयार झालेले असतात. सर्वांत वरचा पदर एक्टोडर्म (ectoderm), मधला मेसोडर्म (meso-derm) व आतला एंडोडर्म (endoderm), असे तीन पदर असतात. यांपैकी वरच्या पदरातून म्हणजे एक्टोडर्ममधून असणाऱ्या पेशींमधून खास तऱ्हेच्या मज्जापेशी तयार होतात. त्यांना असणाऱ्या कंगोऱ्यांतून (growth cones) अक्ष (axons) नि वृक्षिका (dandriles) फुटायला लागतात. यामुळे प्रत्येक पेशीचे 'शरीर' पूर्णपणे तयार होऊ लागते.

सातव्या आठवड्यापर्यंत स्त्री-पुरुष असा भेद मेंदू करीत नाही. त्यानंतर मात्र तो लिंगभेदाची दखल घेतो. सामान्यपणे मुलीचा मेंदू आणि मुलाचा मेंदू काहीसा वेगळेपणा सांभाळून विकसित



होत जातो, तो हार्मोन्सच्या निर्मितीमुळे.

मज्जापेशी निर्मितीचा वेग साधारणपणे विसाव्या आठवड्यात मंदावतो. या वेळेपर्यंत मात्र मेंदूचे कार्य जवळजवळ चाळीस वेगवेगळ्या कार्यप्रक्रिया हाताळता येतील इतपत त्याची तयारी सुरू झालेली असते. व साधारणपणे सहाव्या महिन्याच्या अखेरीस गर्भाची मेंदूवाढ पूर्णतेस पोचते. म्हणजे असे की, गर्भाशयातील पूर्ण कालावधीत जेवढा तयार व्हायला हवा तेवढा तो सहाव्या महिन्याच्या अखेरीस तयार होत असतो. आश्चर्याची गोष्ट अशी की, जन्मानंतर अगदी आयुष्यभर पुरेल एवढा पेशींचा साठा गर्भाच्या मेंदूत या वेळेपर्यंत साठवलेला असतो. मानवी उत्क्रांतीच्या काळात ज्याप्रमाणे मेंदूचे नवखे थर निर्माण होत गेले, अगदी त्याच क्रमाने गर्भातील मेंदूची वाढ होत जाते. म्हणजे आधी मेंदूचा सर्वांत खालचा भाग- ज्याला 'सरपट मेंदू' असे म्हणतात- तो भाग- तयार होतो. त्यानंतर 'लिंबिक सिस्टिम' हा मेंदूचा भावभावनांशी संबंधित हा भाग तयार होतो आणि सर्वांत शेवटी 'नवबाह्यकां'चा वरचा पदर तयार होतो. साधारणपणे चोवीस-पंचविव्या आठवड्यात, मेंदूचा सर्वांत वरचा भाग 'नीओ कॉर्टेक्स', तयार होऊन तेथील पेशी आपापले स्थान ग्रहण करतात.

याच वेळी गर्भाच्या मेंदूमध्ये आणखी एक महत्त्वाची घटना घडून येते. अगदी अल्प प्रमाणात का होईना, पण, मेंदूमधील पेशींची परस्परजोडणी होण्यास सुरुवात होते. जन्मानंतर लगेचच लागणाऱ्या क्रियांची ही जशी तयारी असते तशीच, जन्मानंतर जगाची ओळख करून घेण्याची आणि सदैव शिकण्याची क्षमता ज्या पेशीजोडणींतून होणार असते, त्याची पूर्वतयारीही येथे

होत असते. ज्यांची जोडणी होऊ लागते, त्यांची परस्परसंवाद प्रक्रियाही सुरू होते. उदाहरणार्थ- या पेशीजोडणींतून स्पर्शभावना निर्माण होते. गर्भाला बाहेरचे आवाजही जाणवू लागतात. बाह्य संगीताचे आवाज आणि आईचा आवाज गर्भाच्या कानी पडू लागतो. भाषेतील स्वरांच्या अर्थ-आकलनाचे किंवा शब्दार्थांचे आकलनसामर्थ्य मात्र या वेळी नसते. भाषा-आकलन ही जन्मानंतरच्या काही काळानंतर घडून येणारी घटना असते.

साधारणपणे पंचविसाव्या आठवड्यापासून गर्भाची मज्जासंस्था कार्यरत होऊ लागते. तसेच मेंदूच्या सर्वांत वरच्या भागात- निओ कॉर्टेक्समध्ये- सहा पटल म्हणजे पदर तयार होतात. आता बाह्य जगात उतरण्याची तयारीही मेंदू करू लागतो. तिसाव्या आठवड्यात मेंदूची मोठी क्षमतावाढ होऊन गर्भाची स्मृती-केंद्रे तयार होत जातात. जन्मानंतरच्या शिक्षणाचीच जणू ही तयारी होत असते. मेंदूवाढीच्या यानंतरच्या काळात- म्हणजे गर्भाशयातील अखेरच्या काळात- वाढत्या पेशींना समावून घेण्यासाठी मेंदूला सुरकुत्या पडायला लागतात आणि त्यातून घडीदार मेंदू तयार होतो. आठव्या महिन्यात मज्जासंस्थेतील पेशीजोडणीचे काम चालूच असते. नवव्या महिन्यापर्यंत ही पेशींची जोडणी पुढे सरकून श्वासोच्छ्वास करणे, चोखणे अशा जन्मानंतर लगेच कराव्या लागणाऱ्या मोजक्या क्रियांची तयारीही पूर्ण झालेली असते.

आता, जन्म पावणाऱ्या बालकाच्या मेंदूतील पेशींची संख्या १०० अब्जांपर्यंत पोचलेली असते आणि या अफाट तयारीनिशी, बालकाचा मेंदू बाह्य जगाची आव्हाने पेलण्यास सज्ज होतो. जगात प्रवेश करण्यास तयार होतो.

**नवजात अर्भकाचा मेंदू**

नुकतेच जन्माला आलेले मानवी मूल हे इतर प्राण्यांच्या पिल्लांपेक्षा खूप वेगळे असते. हे इतर प्राण्यांच्या पिल्लांच्या तुलनेत दीर्घकाळ परावलंबी असते. त्याला काही कळतही नसते. याचे कारण असे की, नवजात अर्भकाच्या मेंदूचे वजन प्रौढ मेंदूच्या वजनाच्या जेमतेम २५ टक्के एवढेच असते. इतर प्राण्यांच्या संदर्भात ते ४० ते ५० टक्के इतके असते. त्यामुळे ही इतर पिल्ले फार काळ आणि फारशा प्रमाणात परावलंबी नसतात. याचाच अर्थ असा की, जन्मत:च करावी लागणारी कार्ये सहजतेने करता यावीत अशी तयारी घेऊन बालकाचा मेंदू बाह्य जगाला सामोरा जातो. बालक जन्माला येताच त्याच्या मेंदूचे कार्य सुरू होते. ज्या पेशींची जोडणी जन्मपूर्व अवस्थेत झाली आहे, त्या पेशी कार्यरत होतात. अर्थात अशी फारच थोडी जोडणी जन्मपूर्व अवस्थेत झालेली असते, तीही कमजोर अशीच असते. तिला पक्केपणा द्यायचा असतो. केवळ जगण्यापुरत्या आवश्यक इतपतच पेशींची जोडणी झालेली असते. जन्माच्या वेळेस- मेंदूतील खालच्या भागाची- म्हणजे मज्जासंस्था, लिंबिक सिस्टिम तयार झालेली असते. मात्र मेंदूच्या वरचा भाग नीओ कॉर्टेक्स हा अपूर्ण स्थितीतच असतो. त्यामुळे असे म्हणता येईल की, बालकाच्या मेंदूची खरी वाढ जन्मानंतरच होत असते. अब्जावधी पेशी आधीच तयार होऊन आलेल्या आहेत; त्यांची परस्पर-जोडणी मात्र अजून व्हायची असते. म्हणजेच, नवजात अर्भकाचा मेंदू जन्माला येताना पूर्ण होऊन आलेला नसतो; तो तर अपूर्णच असतो. जनुकीय नियोजनाप्रमाणे (Genetic Coding) त्याच्या मेंदूवाढीचा कार्यक्रम घडून येत असतो. जन्मत:च अक्षरश: अब्जावधी मज्जापेशींचा संच मेंदूत आपापली जनुकनियुक्त जागा घेऊन तयार असतो, परंतु त्या साऱ्यांचे कार्य मात्र सुरू झालेले नसते. या अब्जावधी पेशींची परस्परबांधणी होण्याचे कार्य जन्मापूर्वी फारच अपूर्ण असते.

'बाळाची नजर अजून स्थिर झाली नाही.' असे उद्‌गार अगदी नवजात अर्भकाबाबत घरची प्रौढ मंडळी नेहमीच काढतात. अशा वेळी मेंदूमधील परिस्थिती काय असते? प्रत्येक डोळ्यातून सुमारे दहा लाख इतक्या पेशींची सुमारे वीस लाख ठिकाणी पोचता येणारी अशी

जोडणी व्हायची असते. जन्मत: ती अपूर्ण असते. ही केवळ एका अवयवाची स्थिती, तर सर्वच शरीराचे कार्य घडवून आणणाऱ्या पेशींची परस्परजुळणी होण्याचे काम किती प्रचंड असेल याची कल्पना येईल. या संपूर्ण अशा मेंदूविकासप्रक्रियेचा जनुकीय कार्यक्रम काही निसर्गाने ठरवून दिलेला नसतो, हे एक मानवी बालकाचे वैशिष्ट्य म्हणून मानता येईल. मेंदूतील पेशींची परस्परजुळणी करायचे काम जन्मल्यापासून पहिल्या तीन वर्षांमध्ये तर अतिशय वेगाने होत असते. याचा जनुकीय कार्यक्रम जरी अमलात येत असला तरी, या प्रक्रियेत मधेच केव्हा तरी, या कार्यक्रमाचे धरलेले बोट सोडून; हा तोवर विकसित झालेला मेंदू हे कार्य आपल्याच शिरावर घेतो. म्हणजे पेशीजुळणींची ही प्रक्रिया स्वतंत्रपणे घडून येते आणि त्याला खतपाणी मिळते ते बाह्य जगातील प्राप्त होणाऱ्या अनुभवांमधून. सर्व कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये, परिसरातील जगाची ओळख संबंधित प्रौढांच्या मदतीने, त्यांच्या प्रेमाच्या नि आस्थेच्या उबेत करून घेत असतात. मेंदूमधील अब्जावधी पेशींची जुळणी ही आयुष्यभराच्या शारीरिक, भावनिक, बौद्धिक व सामाजिक कामांसाठी आवश्यक असते आणि ती प्रभावी रीतीने होणे हे लहान वयात प्राप्त होऊ शकणाऱ्या विविधांगी, गुंतागुंतीच्या आणि असंख्य लहान-मोठ्या अनुभवांवर अवलंबून असते. बाल्यावस्थेत मिळणाऱ्या अनुभवांना बालकाच्या एकूण विकासातच अतिशय महत्त्वाचे असते. साहजिकच मेंदूघडणीच्या संदर्भात जनुकीय नियोजनाबरोबरच, बाह्य वातावरणाशी होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांचे कार्य अत्यावश्यक ठरते.

मानवी मूल अर्भकावस्थेत आणि त्यानंतरही काही काळ अपरिपक्व असते. उत्क्रांती-अवस्थेत या नैसर्गिक घटनेचा फार मोठा फायदा माणसाला झाला. इतर कोणत्याही प्राण्यांना आपल्या अस्तित्वांसाठी विशिष्ट असेच पर्यावरण, किंवा वातावरण सामान्यत: हवे असते; परंतु मनुष्य मात्र अगदी टोकाच्या भिन्न अशा वातावरणाशी जुळवून घेत गेला आणि अत्यंत चिवटपणे टिकून राहिला. याचे कारण हे मेंदूमधील एका वैशिष्ट्यपूर्ण घटनेशी संबंधित आहे. मेंदूमधील पेशींची जुळणी आणि बाह्य वातावरणातील अनुभवप्राप्ती याचा असलेला परस्परसंबंध हीच ती वैशिष्ट्यपूर्ण घटना होय. मेंदूघडणीत अनुभवाचे मोल अमाप आहे. अनुभवांच्या उपलब्धतेनुसार बालकाची विकसनशील अशी मज्जासंस्था आपल्याला बेतून घेत असते. तिच्यात बदलही संभवतात नि तिचे कार्य अधिक कार्यक्षमही होऊ शकते. त्यामुळेच, 'मनुष्य हा वातावरणाशी जुळवून घेणारा प्राणी आहे', अशी माणसाची एक नि:संदिग्ध व्याख्या मेंदू संशोधनातून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे करता येते.

**बाल्यावस्थेतील मेंदू-विकास**

लहान बाळाच्या मेंदूचे त्याच्या शरीराशी असलेले प्रमाण हे प्रौढांच्या तुलनेत मोठे असते. प्रौढांची विशिष्ट अशी शरीराची प्रमाणबद्धता नजरेत बसल्यामुळे लहान बाळे ही शरीराच्या मानाने डोके मोठे दिसून, बेढब वाटतात, ती यामुळेच. असे जरी असले, तरी बालकांचा मेंदू प्रौढांच्या तुलनेत मात्र लहानच असतो. प्रौढांच्या मेंदूचे वजन सामान्यत: १४०० ग्रॅम इतके असते, तर नवजात बालकाच्या मेंदूचे वजन जेमतेम ३०० ग्रॅम एवढे असते. पुढे हे झपाट्याने वाढून साधारणपणे वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत प्रौढ मेंदूच्या ९० टक्क्यांपर्यंत बालकाच्या मेंदूचा आकार वाढतो. त्यामुळे ही पहिली काही वर्षे मेंदूवाढीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची ठरतात.

साधारणत: वयाच्या ८ ते १२ महिन्यांच्या अवधीत, निओ कॉर्टेक्स या बौद्धिक मेंदूची वाढ झपाट्याने होत जाते. त्याच्या वेगवेगळ्या भागांत म्हणजे फ्रंटल, पेरिएटल आणि ऑसिपेटल लोब्जमधील पेशींचे (याला 'व्हाईट मॅटर' असे म्हणतात) रूप दृग्गोचर होऊ लागते. तिसऱ्या वर्षापर्यंत पेशींमधील परस्परसंवाद घडविणारे प्रमुख मार्ग अस्तित्त्वात येतात. साहजिकच, प्रौढांसारखे पंचेंद्रियाचे काम मुले सहजतेने करू लागतात. मात्र, या वयापर्यंत त्यांना अमूर्त पातळीवरील बौद्धिक क्रिया

करण्याचे सामर्थ्य प्राप्त झालेले नसते. बहुतेक मुलांच्या बाबतीत वयाच्या चौथ्या वर्षापर्यंत भाषा-आकलनाचे आणि भाषा बोलण्याचे कौशल्य पुरेसे आत्मसात झालेले असते. याचा अर्थ असा की, मेंदूमधील भाषाविषयक व्यवस्था प्रौढांसारखीच तयार झालेली असते. याच संदर्भातील स्मरणव्यवस्थाही मेंदूमध्ये तयार झालेली असते. त्यामुळे मुलांचा शब्दसंग्रह वेगाने वाढू शकतो आणि वाक्यरचनाही नेमकेपणाने स्मरणात साठलेली असते. मात्र, अधिक तरल स्तरांवरील, अधिक गुंतागुंतीच्या पातळीवरील बौद्धिक स्वरूपाच्या बाबी स्मरणात राहू शकतील अशी स्मरणव्यवस्था अजून तयार झालेली नसते. त्यामुळे भाषेची अमूर्त पातळीवरील चलने बालकाच्या आवाक्यात आलेली नसतात. वयाच्या पाचव्या-सहाव्या वर्षापर्यंत शारीरिक व स्नायूविषयक नियंत्रण बऱ्यापैकी साध्य झालेले असले, तरीही मनावर ताबा ठेवणे, भावनांवर नियंत्रण येणे या गोष्टी अजूनही मुलांच्या क्षमतेच्या बाहेरच असतात. खरे तर हे घडून यायला आणखी बरीच वर्षे वाट पाहावी लागते.

स्वत:च्या दृष्टीवर पूर्णपणे ताबा असल्यामुळे आठ ते दहा वर्षांपर्यंत मुलांना व्यक्ती, वस्तू किंवा निसर्ग यांच्या नेमक्या आकलनाच्या क्षमता प्रौढांप्रमाणेच प्राप्त होतात. चेहरे दीर्घकाळ लक्षात राहणे, व्यक्ती-वस्तू-निसर्गसंबंधित अशा घटना दीर्घकाळ आठवणीत राहणे, या गोष्टी घडविणाऱ्या रचना मेंदूमध्ये कायम-स्वरूपी तयार होतात. यातूनच मुलांची प्रौढतेकडे वाटचाल होत असते.

**विदरनिर्मिती**

बालकाच्या- एवढेच नव्हे, तर संपूर्ण मानवी जीवनात घडून येणाऱ्या सर्वच शारीरिक, भावनिक, बौद्धिक नि सामाजिक क्रिया-प्रतिक्रियात्मक घटनांचा संबंध मेंदूमधील पेशींच्या परस्परबांधणीशी असतो. जोवर हे पेशीबांधणीचे वेगवान कार्य चालू असते, तोवरचे बालकाचे वय हे 'मेंदूघडणीचे वय' म्हणून लक्षात घ्यायला हवे; किंवा वेगळ्या शब्दांत सांगायचे तर, बालवय हे मेंदूविकासाचेच वय असते. एकूणच मानवी जीवनात लहान वयातील सर्वांत महत्त्वाची घटना असते ती मेंदूविकास होण्याची. एखाद्या पिकाच्या वृद्धीसाठी जसे विशिष्ट वातावरण लागते, त्याचप्रमाणे मेंदूवाढीच्या वयातही विशिष्ट वातावरणाची गरज असते. त्यामुळे संबंधित प्रौढांनी अशा तऱ्हेचे वातावरण, जाणीवपूर्वक पुरविण्याची काळजी घ्यावी लागते. उदाहरणार्थ अर्भकावस्थेत होणाऱ्या मेंदूच्या वाढीवर सर्वांत मोठा परिणाम होत असतो तो आईच्या आरोग्याचा आणि आरोग्यपूर्ण वागणुकीचा. होऊ घातलेल्या आईचे पोषण नीट होत नसेल, ती व्यसनाधीन असेल, इतरांची तिच्याशी असलेली वागणूक तापदायक असेल, तिला अतिशय ताणात जगावे लागत असेल अथवा कोणत्याही कारणाने ती निराशाग्रस्त असेल; तर तिच्या पोटात असलेल्या बाळाच्या मेंदूची वाढ हवी तशी होणार नाही. उलट, मेंदूवाढीत काही विकृतीही निर्माण होतील. याचा अर्थ असा की, मूल अर्भकावस्थेत असतानाही त्याच्यावर नि त्याच्या मेंदूवाढीवर बाह्य वातावरणाचा इष्ट-अनिष्ट प्रभाव पडत असतो. मग जन्माला येऊन बाह्य जगात प्रवेश केलेल्या बालकावर तर आजूबाजूच्या वातावरणाचा किती तरी परिणाम होत असणार, यात नवल नाही.

बाह्य जगातील वातावरणाच्या संदर्भात आपण समजतो त्यापेक्षाही अधिक प्रमाणात मुले जागरूक असतात. अगदी एक दिवसाचे मूलसुद्धा आपल्या जागृतावस्थेत किलकिल्या डोळ्यांनी भोवतालचे जग न्याहळता-न्याहळता आकलन करून घेत असते, शिकत असते. अगदी दोन दिवसांचे मूलही आईचा स्तन किंवा बाटली पाहिल्याबरोबर चोखण्याची कृती करू लागते. हे त्या बालकाचे शिकणेच असते. परंतु ते अतिशय अल्प प्रमाणात असते. पाहिलेल्या-ऐकलेल्या सगळ्याच गोष्टींचा अर्थ लावण्याची, पाहिलेल्या गोष्टी लक्षात ठेवण्याची क्षमता त्याच्यामध्ये नसते. कारण, मेंदूतील पेशीजलिका तयार व्हायला नुकतीच कुठे सुरुवात झालेली असते. अजून खूप लांबचा पल्ला गाठायचा असतो.

जन्मल्यानंतर पहिल्या तीन वर्षांमध्ये पेशींच्या

परस्परजोडणीचे काम खूप वेगाने होत असते. जिथे दोन पेशी एकमेकींना जोडल्या जातात, त्या स्थानाला विदर (Synapse) असे म्हणतात. एक पेशी सुमारे इतर दहा ते वीस हजार पेशींशी जोडली जाते. याचा अर्थ, तेवढ्या संस्थेने विदर तयार होतात. म्हणजे पेशींच्या संख्येच्या किती तरी पटींनी मोठी अशी विदरांची संख्या असते. जसजसे विदर निर्माण होतात, तसतसा मेंदू कार्यरत होत जातो. नेमके हेच विदरनिर्मितीचे कार्य वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत कमालीच्या वेगाने होत असते. इतके की, तीन वर्षांच्या बालक-बालिकेच्या मेंदूमधील विदरांची संख्या प्रौढांच्या मेंदूमधील विदरांच्या संख्येच्या तुलनेने दुपटीपेक्षाही जास्त असते. साहजिकच या मुला-मुलींचा मेंदू प्रौढांपेक्षाही किती तरी अधिक प्रमाणात कार्यरत असतो आणि कार्यक्षमही असतो. जन्मत:च विदरांची संख्या खूपच मर्यादित असते; परंतु त्यानंतर मात्र बालकाच्या परिसरातील वातावरणाशी जो संबंध प्रस्थापित होतो, त्याने पेशींची जोडणी होऊन विदरसंख्या वाढू लागते. शेजारच्या आकृतीत विदरसंख्येचे स्वरूप दर्शविलेले असते.

विदरनिर्मितीची ही प्रक्रिया वयाच्या थेट आठ ते दहा वर्षांपर्यंत चालू असते. विदरांच्या संदर्भातील तीन प्रक्रिया बालकांच्या मेंदूमध्ये एकाच वेळी चालू आणि-अतिशय वेगाने चालू असतात.

एक म्हणजे, पेशींच्या नवनवीन जोडण्या होऊन-झपाट्याने विदर निर्माण होणे.

दोन, अगोदर तयार झालेल्या विदरांना त्यांच्या वापरातून बळकटी प्राप्त होणे आणि

तीन, बराच काळ ज्यांचा वापर केला गेला नाही, असे विदर निरुपयोगी ठरून ते नामशेष होणे.

एकाच वेळी घडून येणाऱ्या या सर्वच प्रक्रियांमधून मेंदूमधील संख्या हळूहळू स्थिर होऊ लागते. साधारणपणे वयाच्या तिसऱ्या वर्षांपर्यंत विदरनिर्मितीची प्रक्रिया अधिक प्रभावी असते. त्यानंतर तीन ते दहा वर्षे या वयात विदरनिर्मितीची आणि विदरविनाशाची प्रक्रिया यांचा परस्पर छेद जाऊन विदरांची संख्या



सामान्यत: स्थिर राहते आणि दहा वर्षांनंतर मात्र विदरनिर्मितीपेक्षा विदरविनाशाची प्रक्रिया प्रभावी ठरून वयाच्या प्रौढतेपर्यंत विदरांची एकूण संख्या घटलेली दिसते. तरीही अर्थातच परिस्थितीनुसार नवीन विदर नाहीसे होणे किंवा वापरात दीर्घकाळ नसलेले विदर निर्माण होणे हे आयुष्यभर चालूच असते. पण अर्थातच, त्याचा वेग आणि त्याचे प्रमाण मात्र बालवयाच्या तुलनेने अल्प असते.

मेंदूमधील विदरांबाबतचा टिकाऊपणाचा सामान्य नियम असा आहे की, ज्यांचा वापर पुन: पुन्हा केला जातो असे विदर टिकून राहतात- तर ज्यांचा वापरच होत नाही, ते कमजोर होऊ लागतात. ज्यांना बराच काळ काही कामच नाही असे विदर, आपली येथे गरज नाही असे समजून पळ काढतात, नाहीसे होतात. विदरांचा वापर होणे वा न होणे याचा संबंध त्यांच्या वापराची संधी मिळणे वा न मिळणे याच्याशी म्हणजे अनुभवप्राप्तीशी आहे. लहान वयात जेवढे अधिक आणि विविध प्रकारचे अनुभव मिळतील तेवढे विदर बळकट होत जातात व टिकूनही राहतात. प्रत्येक नवा अनुभव विदरांना चेतवतो. सतत चेतवला जाणारा विदर सरावाने अधिक कार्यक्षम होतो. याउलट, ज्या विदरांना अशी संधीच प्राप्त होत नाही, ते विदर काळाच्या ओघात नष्ट होतात. त्यामुळे लहान वयातील मेंदूच्या विकासासाठी अनुभवप्राप्तीच्या संधीचे वातावरण अत्यावश्यक असते, असे म्हणता येईल.

❒

विशेष लेख

# स्वामी विवेकानंद आणि ज्ञानरचनावादी शिक्षण

■■

शिक्षण आणि ज्ञानप्राप्ती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ज्ञानप्राप्तीबरोबरच जीवन समृद्ध करणे व विकास साधणे हे शिक्षणाचे सर्वसाधारण उद्दिष्ट होय.

शिक्षणाबाबत भारतीय तत्त्वज्ञानामध्ये काही मूलभूत आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्वविकासाचे विचार ज्यांनी मांडले; त्यांमध्ये स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर, योगी अरविंद, महात्मा गांधी, विनोबा, डॉ. जे. पी. नाईक आणि एकविसाव्या शतकातील वेदविज्ञान सांगणारे व मन:शक्ती प्रयोग केंद्राचे प्रथम चिंतक स्वामी विज्ञानानंद यांचा विचार करावा लागेल.

एकोणिसाव्या शतकापासून विचार करता गेल्या दोन दशकांतील शिक्षणाची वाटचाल ही वर्तनवादाकडून ज्ञानरचनावादाकडे झाल्याचे दिसून येते. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील तत्कालीन 'मानसशास्त्र' हे शिक्षणशास्त्राचा पाया असल्याने, मानसशास्त्रात वर्तनवादी विचारसरणी रुजली व त्यातूनच 'वर्तनबदल म्हणजे शिक्षण' अशी शिक्षणाची एक व्याख्या रूढ झाली.

या वर्तनवादी शिक्षणप्रणालीची महत्त्वाची गृहीते म्हणजे -

* समाजात व संस्कृतीत विशिष्ट, विद्वान लोक ज्ञाननिर्मिती करतात.

* यांतील निवडक ज्ञान शिक्षकांकरवी विद्यार्थ्यांमध्ये वितरित केले जाते.

* वितरित झालेले ज्ञान विद्यार्थ्याने कितपत ग्रहण केले आहे यावर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन होते.

त्यामुळे शिक्षककेंद्री शिक्षणव्यवस्था व्यवहारात निर्माण झाली. सन १९५० पर्यंत वर्तनवादी शिक्षणाच्या प्रभावाचा काळ होता.

भाषाशास्त्रांचा विकास, माणसाची ज्ञानप्राप्ती आणि आकलन यावर प्रकाश टाकणारे नवे संशोधन, नव्या शास्त्रांचा विकास, तंत्रज्ञानाची प्रगती यामुळे विसाव्या शतकाच्या मध्यावधीत आकलनशास्त्र (congnative science) विकसित झाले.

'पियाजे' या संशोधकाने 'ज्ञाननिर्मितीचा शरीरशास्त्रीय सिद्धान्त' मांडला. त्यामध्ये त्याने दोन महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या-



## डॉ. कैलास बवले

१) मुलांचा बौद्धिक विकास हा त्यांच्या शारीरिक विकासाशी संबंधित असतो.

२) ज्ञान ही बाहेरून घेण्याची गोष्ट नाही, तर मुले आपल्या ज्ञानाची रचना आपली आपणच करीत असतात.

'पियाजे'ने मुलांच्या अंतर्गत असणारी प्रक्रिया शोधून काढली आणि ती विचारात घेऊन मुलांचे शिक्षण करावे, अशी नवी आकलनवादी विचारसरणी निर्माण केली.

या आकलनविषयक विचाराला कारणीभूत ठरणाऱ्या पाच कल्पनांचा उल्लेख मानसशास्त्रज्ञ व भाषाशास्त्रज्ञ स्टीव्हन पिंकर यांनी आपल्या 'द ब्लॅक स्लेट' या ग्रंथात केला. आजच्या ज्ञानरचनावादी शिक्षणप्रणालीचा आशय ज्या पाच कल्पनांमध्ये आहे, त्या कल्पना -

१) मानसिक पातळीवरील जग हे वास्तव पातळीवर आणता येण्याची शक्यता आहे. (माहिती तंत्रज्ञान व गणन क्रांती)

२) मन ही कोरी पाटी नसते.

३) मनामधील मर्यादित पण गुंतागुंतीच्या कार्यक्रमांकरवी अमर्याद वर्तनप्रकार निर्माण होतात.

४) त्यासाठी सार्वत्रिक स्वरूपाच्या मानस यंत्रणेचे अस्तित्व असते.

५) परस्परसंबंधी अशा तुकड्यांकरवी तयार झालेली मन ही एक व्यामिश्र रचना आहे.

रचनावादी ज्ञाननिर्मितीशास्त्र (Constructive - Epistemology) ही संज्ञा पियाजेने १९६७ मध्ये लिहिलेल्या 'लॉजिक ॲण्ड सायंटिफिक नॉलेज' या निबंधात प्रथम वापरली. यातूनच पुढे शिकण्याविषयीचे एक व्यवहारशास्त्र निर्माण झाले. शिकणारे मूल आपणहून शिकणारे आहे, ते अनुभवातून शिकते, ते कृतीतून शिकते; ते स्वयंप्रेरणेने जसे शिकते तसेच ते स्वत:च्या कलाने, आवडीने, निवडीने आणि स्वतंत्र अशा निसर्गदत्त शैलीने शिकते. हीच ज्ञानरचनावादी शिक्षणप्रणाली होय. या शिक्षणप्रणालीनुसार विद्यार्थी आपल्या ज्ञानाची रचना आपली आपणच करीत असतो. शिक्षक मार्गदर्शक म्हणून त्याला साहाय्यभूत

*शिकणारे मूल आपणहून शिकणारे आहे, ते अनुभवातून शिकते, ते कृतीतून शिकते; ते स्वयंप्रेरणेने जसे शिकते तसेच ते स्वत:च्या कलाने, आवडीने, निवडीने आणि स्वतंत्र अशा निसर्गदत्त शैलीने शिकते. हीच ज्ञानरचनावादी शिक्षणप्रणाली होय. या शिक्षणप्रणालीनुसार विद्यार्थी आपल्या ज्ञानाची रचना आपली आपणच करीत असतो.*

ठरू शकतो आणि शिक्षणप्रक्रियेतील सहभागावरून विद्यार्थ्याचे मूल्यमापन होते. या रचनावादी शिक्षणपद्धतीची बदलाची दिशा सूत्ररूपाने पुढीलप्रमाणे सांगता येईल. माहिती साठविण्याकडून - ज्ञाननिर्मितीकडे, शिक्षणकेंद्री व्यवस्थेकडून - विद्यार्थिकेंद्री व्यवस्थेकडे, एकूण शिकणे यांकडून प्रत्यक्ष करून शिकणे याकडे, शिकविण्याकडून शिकण्याकडे आणि पाचवे सूत्र - बंदिस्त वातावरणातून खुल्या वातावरणात शिक्षणाला आणणे.

भारतात २००५ च्या राष्ट्रीय शिक्षणक्रम मसुद्याने हा ज्ञानरचनावादी शिक्षणविचार स्वीकारला आहे. महाराष्ट्र सरकारने २०१० च्या नव्या शिक्षणक्रमामध्ये यावर आधारित अभ्यासक्रम करून शिक्षक-प्रशिक्षणाची मोहीम सुरू केली आहे. ज्ञानरचनावादी शिक्षणामध्ये शरीर, मेंदू, मज्जासंस्था, मन या सर्व घटकांचा शिक्षण व ज्ञानप्राप्तीशी असणारा संबंध लक्षात घेऊन काही व्यावहारिक तत्त्वे मांडण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यामध्ये स्वयंअध्ययनाचे तत्त्व, स्वानुभवतत्त्व, स्वरचित अर्थपूर्णतेचे तत्त्व, आव्हानतत्त्व, परिपूर्तितत्त्व यांचा समावेश आहे.

स्वामी विवेकानंदांनी मांडलेले शिक्षणविषयक विचार व शैक्षणिक तत्त्वज्ञान हे या ज्ञानरचनावादाला भिडणारे तर आहेच, पण त्याही पुढे एक पाऊल टाकणारे आहे. शिक्षणाचे तत्त्वज्ञान सांगताना ते म्हणतात, 'शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठायी जे पूर्णत्व आधीचेच विद्यमान आहे, त्याचे प्रकटीकरण'. इथे माणसाचे मन कोरी पाटी नाही, हा आधुनिक विचार स्पष्टपणे मांडल्याचे दिसून येते. विवेकानंदांच्या मते, ज्ञान होणे म्हणजे आवरण दूर करणे. पुढे ते असेही म्हणतात - समस्त ज्ञान माणसात अंतर्निहित असते. मनामध्ये अनंत शक्ती वसत आहे. बालक स्वत:च स्वत:चा गुरू असते. रोपटे जसे आपल्या स्वाभाविक वाढीने वाढते, मूलदेखील त्याप्रमाणे स्वत:च शिकत असते. प्रत्येक मूल स्वतंत्रपणे शिकते, त्याच्या स्वत:च्या वेगाने शिकते व स्वत:च्या पद्धतीने शिकते अशीच मांडणी रचनावादी शिक्षणही करते. आपण (पालक व शिक्षक) त्याच्या वाढीस मदत मात्र करू शकतो. त्यासाठी आपण फक्त भावात्मक कल्पनाच द्याव्यात, असे ते सुचवितात. विवेकानंदांनी शिक्षण व ज्ञानप्राप्तीविषयीची प्रक्रिया मानसशास्त्रीय अंगाने अतिशय प्रभावशाली मांडली आहे. ते म्हणतात- आपण जर आपले मन इंद्रियांशी संयुक्त केले नाही तर आपल्याला नाक, कान, डोळे या बाह्य ज्ञानेंद्रियांद्वारा काहीच ज्ञान वा संवेदना प्राप्त होणार नाही. कारण या बाह्य इंद्रियांचा मन हे साधनांसारखा उपयोग करीत असते.

ज्ञानप्राप्तीचा स्वामी विवेकानंदांनी सांगितलेला सूक्ष्म मार्ग हा ज्ञानरचनावादी शिक्षणप्रक्रियेशी खूपसे साधर्म्य सांगणारा व या ज्ञानरचनावादाला पुढील संशोधनाचा मार्ग दाखविणारा असाच आहे. हा ज्ञानमार्ग म्हणजे कर्मेंद्रिये → ज्ञानेंद्रिये → ज्ञानतंतू → मेंदू → मन → बुद्धी → चित्त →आत्मा → असा सूक्ष्मातिसूक्ष्मापर्यंत जाणारा आहे. यापुढे जाऊन ते असेही म्हणतात- जे सूक्ष्म आहे तेच शक्तीचे अधिष्ठान आहे. (विज्ञानदेखील हेच सिद्ध करते). साहस, आत्मविश्वास, प्रत्यक्ष अनुभूती, नवानुकरण व आत्मबोध या रचनावादाच्या अंगाने जाणारी शिक्षणाची मांडणी करताना आणि

त्याची सूक्ष्म प्रक्रिया स्पष्ट करताना स्वामीजी म्हणतात - ‘‘तुम्ही जर माझे लक्षपूर्वक ऐकत असाल व बाहेर घंटेचा नाद झाला, तर तो ध्वनी -- बाहेरून कान - कानाचा पडदा - तेथून -ज्ञानतंतूंमार्फत मेंदूपर्यंत संदेशवहन करेल. अशा वेळी मन इंद्रियाशी जोडले असेल, तर ध्वनी ऐकू येतो. ज्या वेळी मन इंद्रियापासून अलग असते - तेव्हा आलेला संदेश ते ग्रहण करणार नाही. परंतु केवळ मन जोडण्याने ही प्रक्रिया पूर्ण होत नाही व आपणास विषयज्ञान वा विषयानुभव होत नाही. आतून एक प्रतिक्रिया व्हायला हवी, ती प्रतिक्रिया घडताच ज्ञान उत्पन्न होते. या प्रतिक्रियेची प्रक्रिया तेव्हाच पुढे जाते, जेव्हा बाहेरून आलेला संदेशप्रवाह मनाने स्वीकारून, ग्रहण करून बुद्धीला सादर केला जातो. बुद्धीने चित्तात पूर्वीपासून अवस्थित असलेल्या संस्काराच्या अनुरोधाने (पूर्वज्ञानस्थिती) त्याचे वर्गीकरण केले आणि एक प्रतिक्रियाप्रवाह प्रेरित केला. इथे त्या वस्तूचे ज्ञान होते, मात्र वस्तुज्ञानाची प्रक्रिया पूर्ण झालेली नसते. प्रतिमा स्पष्ट उमटण्यासाठी जिच्यावर ह्या साऱ्या- संवेदनांचे जणू सलग चित्र पाडता येईल असे स्थिर, स्थायी, अचल मन पाठीमागे असावे लागेल,’’ त्यालाच विवेकानंद ‘आत्मा’ असे म्हणतात.

ज्ञानरचनावादी शिक्षणप्रक्रियेने ‘शरीर, मेंदू आणि मन’ यांच्या समन्वयातून स्वयंअध्यायी शिक्षणप्रणाली पुढे आली आहे. मात्र मनाच्या संशोधनापासूनचा पुढचा टप्पा अद्यापही सुस्पष्ट नाही. त्याची सूचक दिशा विवेकानंदांनी ज्ञानप्राप्तीचा एकच मार्ग म्हणजे, एकाग्रता असे प्रतिपादन करून ‘एकाग्रता यशोबीजम’ या मूलसूत्राकडे बोट दाखविले आहे. रचनावादी शिक्षणप्रणालीला मनाचे स्वरूप, मनाची शक्ती आणि ज्ञानप्राप्तीतील तिचे योगदान यावरच भविष्यात अधिक भर द्यावा लागेल. तेव्हाच आपणा सर्वांना अपेक्षित व विवेकानंदांच्या शिक्षणप्रक्रियेचा गाभा असणारे ‘माणूस निर्माण करणारे शिक्षण’ ज्ञानरचनावादी शिक्षणातून प्राप्त होईल.

संदर्भ : १) शिक्षण - स्वामी विवेकानंद
२) आदर्श शिक्षण - स्वामी विवेकानंद
३) रचनावादी शिक्षण - रमेश पानसे

❐

ग्राममंगल
शिक्षणवेध
शिक्षणातील परिवर्तनासाठी

वार्षिक वर्गणी रुपये ४००/-
त्रैवार्षिक वर्गणी रुपये १०००/-
किंवा ग्राममंगल संस्थेला १०,००० रुपये वा अधिक देणगी द्या.
‘८० जी’ कलमाखाली आयकरातून सूट मिळवा आणि
दरमहा ‘शिक्षणवेध’चा अंकही मिळवा.
वर्गणी/रोख/चेक/ड्राफ्टने ‘ग्राममंगल’ या नावाने पाठवू शकता.
मुंबई-पुणे बाहेरील चेकसाठी रुपये ३०/- वटणावळ आवश्यक.

**पुणे कार्यालय :**
ग्राममंगल, गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरुड,
पुणे ४११ ०३८. संवाद : ०२० २५३८६६८७



डॉ. अनुराधा सहस्रबुद्धे

# मुलांमधील वाढती व्यसनाधीनता : एक सामाजिक प्रश्न

मुलांमधील व्यसनाधीनता हा वाढता प्रश्न होऊन बसला आहे. या विषयाचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी त्या वाटेने गेलेल्या, तसेच परतलेल्या मुलांचा मी अभ्यास केला. तसेच विविध वयाच्या मुलांशी याबाबत बोलले. २०-२५ वर्षांचा विषयांतर्गत अनुभव गाठीशी असूनही मुलांचे हे विश्व मला मुळापासून हादरवून गेले, हे निर्विवाद.

मुले व्यसनाधीन का होतात याची अनेक कारणे आहेत. 'प्रस्थापिताच्या विरुद्ध विद्रोह' हा तरुणाईचा नियम आणि आनंदही. पौगंडावस्थेत काही तरी 'वेगळे' करावेसे वाटणे हे अगदी स्वाभाविक आहे. आपल्या तारुण्यात प्रत्येकाने असे काही तरी कमी-अधिक प्रमाणात केलेलेच असते. मैत्रिणीकडे जाते म्हणून सिनेमाला जाणे, लेक्चर बंक करून उगीचच भटकणे, छत्री असून पावसात भिजणे, मुद्दाम फाटक्या जीन्स घालणे - एकूण, 'मोठ्यांचे' नियम मोडणे यात प्रचंड धमाल असते.

दुसऱ्या नियम मित्र-परिवाराच्या पगड्याचा (Peer Pressure). मित्रांत मान्यतेचे तारुण्यात फार महत्त्व असते. मित्र-परिवारांच्या विरुद्ध जाणे म्हणजे एकटे पडणे, टिंगल-टवाळीला तोंड देणे. ''मला पटले नाही तर मी करणार नाही,'' हे म्हणण्याचे धाडस फारच थोड्यांमध्ये असते; ते असण्यासाठी लागते भक्कम संस्कारांची शिदोरी आणि मनाचा कणखरपणा- जो पालकांच्या वर्तणुकीच्या निरीक्षणातून येतो. प्रत्यक्षात चांगले-वाईट शिकवू पाहणारे पालक वेळोवेळी शिकवणीच्या विपरित वागताना दिसतात. 'दारू पिणे वाईट'; पण social status साठी प्यावी लागते, पाजावी लागते.' अशा समजुतीमुळे मित्रपरिवारातील 'स्टेटस'साठी मुलांनी दारू प्यायली, ड्रग्ज घेतले तर ते

चूक कसे?

विद्रोह, मित्रपरिवाराची मान्यता यामुळे अशा गोष्टींकडे मुले प्रथमत: आकर्षित होतात हे जसे खरे; तसेच अशा पार्टीजमधील संगीत, लाइटिंग, एकूण वातावरण हे एक प्रकारचे झिंग आणणारे, हवेसे वाटणारे असते. अशाच गंमत म्हणून घेतलेल्या एका सहज अनुभवाचे व्यसनात रूपांतर होऊ शकते.

एके काळी १४ ते १८ वर्षांच्या पुढील वयात दिसणारी व्यसने आता १०-१४ वर्षांच्या वयोगटातही दिसू लागली आहेत. सिगारेट, गुटखा, व्हाईटनर ही त्यामानाने निरागस वाटावीत अशी व्यसने मुलांमध्ये सध्या दिसत आहेत.

आपल्यापेक्षा मोठ्या वयाच्या 'दादाचे' अनुकरण हे कुमारवयातील आकर्षण. मुलांशी बोलल्यावर कळते की, बऱ्याच वेळा असे 'दादा' मोठ्या व्यसनांची दीक्षा छोट्यांना देतात. हुक्का पार्लर हे त्याचे एक उदाहरण होय.

पार्टीचे व्यसन लावायला प्रत्यक्ष पालकच जबाबदार असतात. पालकांच्या स्वाभाविक आदर्श घेणाऱ्या मुलांना, पालकांच्या 'पार्टी देणे-घेणे' संस्कृतीची भुरळ पडली नाही, तरच नवल! मुलांच्या पार्टीज हल्ली घरी होत नाहीत. भरपूर पैसे देऊन बाहेर पार्टी करायला पालकच उत्तेजन देताना दिसतात. अशा पार्टीजवर कुणाचाच अंकुश नसतो. तेथे काय खाल्ले-प्यायले जाते, 'गेम्स' व 'नृत्य' या नावाखाली काय घडते याचा पत्ता पालकांना नसतो. मित्रपरिवारावर देखरेख ठेवणे वगैरे पद्धती मुळात पालकांना शक्य होत नाहीत.

वयाने वडीलमुलांच्या संगतीत गुटखा, दारू आणि सिगारेट ही व्यसने लागल्याच्या जशा घटना माझ्याकडे आहेत, तशाच रेडलाईट एरियाच्या अनुभवाच्याही. अनेक वेळा स्वत:च्या व्यसनांना पैसा मिळविण्यासाठी मोठे मित्र छोट्यांना मुद्दाम या चक्रात ओढतात आणि त्यांना व्यसने लावून एकूणच त्यांचा वापर करून घेतात.




'गेमिंग झोन्स' हे सध्याच्या मुलांचे मोठे व्यसन. घरातील संगणकावर व्हिडिओ गेम्स सतत खेळणे याचे आधी व्यसन लागते. याला एक कारण हेही आहे की, मैदानी खेळांचे महत्त्व आजच्या पालक-शिक्षकांना नाही. असले तरी मैदानेच उपलब्ध नाहीत. मुलांना खेळण्याची कौशल्ये द्यायला कुणाला वेळही नाही. व्हिडिओ गेम्समध्ये मुले तासन्-तास गुंतलेली आढळतात. खेळातील विषयांमुळे व मैदानी खेळांमुळे अंगातील स्वाभाविक रगेला जी वाट मिळते ती अशा मुलांत न मिळाल्यामुळे, आक्रमकता वाढलेली दिसते. गेमिंग झोन्समधील 'Virtual Money', गुण यांची देवाण-घेवाण करून जुगार खेळला जातो. कुणाकडे असा किती पैसा, यावर मित्र-परिवारातील प्रतिष्ठा

*विद्रोह, मित्रपरिवाराची मान्यता यामुळे अशा गोष्टींकडे मुले प्रथमत: आकर्षित होतात हे जसे खरे; तसेच अशा पार्टीजमधील संगीत, लाइटिंग, एकूण वातावरण हे एक प्रकारचे झिंग आणणारे, हवेसे वाटणारे असते. अशाच गंमत म्हणून घेतलेल्या एका सहज अनुभवाचे व्यसनात रूपांतर होऊ शकते.*

पणास लागते. अनेक खेळांतून आक्रमकतेला उत्तेजन मिळते. वेगवेगळ्या प्रकारे खून, बंदुकीचा वापर इत्यादी त्यात असल्यामुळे मुले-मुले असे प्रयोग प्रत्यक्ष आयुष्यात करून पाहतात. मुलांनी परत-परत गेमिंग झोन्समध्ये यावे म्हणून Complimentary पेयातून भांगेसारखा परिणाम करणारे नशीले पदार्थ दिले जातात, अशी माहिती पुढे आली आहे.

मुलांना वेळ न देऊ शकणारे पालक असे खेळ मुलांना एकटेपणावर उपाय म्हणून आणून देतात. गेमिंग झोन्सचे व्यसन मित्रपरिवारामुळे लागते. असे खेळ न खेळणारे 'भोट' ठरतात.

मोबाईल बेटिंग हेसुद्धा आठवीच्या पुढील मुलांत आढळून येणारे वाढते व्यसन आहे.

मुलांमधील आणखी एक सर्वसामान्य व्यसन म्हणजे इंटरनेटचे. गेम्स डाऊनलोड करण्याबरोबरच पोर्नोग्राफी (अश्लील चित्रफिती) पाहणे हे एक वाढते व्यसन आहे. Interative video chatting द्वारे मुले स्वत: अशा पोर्नोग्राफीला बळी पडू शकतात.

सोशल मीडिया साईट्सवरून तासन् तास गप्पा मारणे, हे आणखी एक व्यसन.

Sleepover पार्टीमध्ये गेमिंग, पोर्न पाहणे, ड्रग्स-दारू, नशीले नृत्य असे कार्यक्रम होतात.

मुलांमधील वाढत्या व्यसनांत 'पत्त्यांचा पोकर' हा खेळ विशेष लोकप्रिय आहे. पैशाची उलाढाल या खेळात मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे उधारी, मारामारी, चोरी, खून, आत्महत्या हे ओघाने आलेच. सोरट हा सर्व स्तरांतील मुलांत लोकप्रिय जुगार आहे. खाऊ, पैसे, फटाके, खेळणी, कशावरही यात पैसे लावले जातात.

मुलींमध्ये मुलांपेक्षा एकूण व्यसनाधीनता सध्या कमी असली तरी वाढतेच आहे.

एकूणच, मुलांमधील व्यसनांची यादी करावयाची ठरवली तर ती अशी होते -

गुटखा, तंबाखू, सिगारेट, सिगार, पानमसाला, जुगाराचे अनेकविध प्रकार, खेळांचे केलेले जुगार, व्हाइटनर/ड्रग्ज, पार्टीज, रेव्ह पार्टीज, हुक्का पार्लर, व्हिडिओ गेम्स, गेमिंग झोन्स, लाऊंज, पब, पॉर्न पाहणे, दारू, मुलींची चेष्टा, स्त्री-पुरुष संबंध, वेश्यागमन, इंटरनेट, नेटवर्क (सोशल), बेटिंग... ही यादी न संपणारी आणि मती गुंगवणारी आहे.

यावर उपाय काय, हा पुढचा स्वाभाविक प्रश्न. त्यासाठी काही वस्तुस्थिती पाहू या :

१) पौगंडावस्थेचा अलिखित नियम : प्रस्थापिताच्या विरुद्ध बंड !

२) पौगंडावस्था = विद्रोह

३) वयाची गरज - मित्रपरिवाराची मान्यता

४) न टाळता येणारी बाब - मित्रपरिवाराचा पगडा

५) आजचे मूल काय पाहते -

- पालक बोलतात तसे वागत नाहीत
- मोठे संस्कारांच्या विपरीत वारंवार वागतात
- चुकीचे आदर्श चोहीकडे
- मुलांसाठी पालकांना वेळ नाही/संवाद नाही
- प्रेमाची जागा पैसा घेत आहे.

६) व्यसनाच्या नशेला पर्याय माहितीच नाहीत.

७) भावना हाताळण्याची कौशल्ये नाहीत.

एकूणात, या वास्तवाचे भान ठेवून मुलांमधील व्यसनाधीनतेच्या प्रश्नाला हाताळले पाहिजे. स्वत:च्या वर्तणुकीवर ताबा ठेवून मुलांचे सक्षमीकरण हा मार्ग असू शकतो. करू नको म्हटले की ते होणारच, त्यापेक्षा

परिणाम दाखविणे जास्त श्रेयस्कर ठरू शकते. पूर्व मुक्तता देऊन विद्रोहातील हवा काढून टाकता येते. मात्र त्याच्याबरोबर धोक्यांची जाणीव देऊन त्यावर मात करण्याची कौशल्ये मुलांना देऊन त्यांचे सक्षमीकरण करता येते. चांगल्या-वाईटातला फरक, वाईटाला कोणत्याही किमतीवर नाकारता येणे ही मनाची ताकद मुलांमध्ये निर्माण झाली- तर मित्रपरिवाराच्या पगड्यावर उपाय सापडेल.

व्यसनांतून येणारी नशा इतर गोष्टींतूनसुद्धा येऊ शकते याचे अनुभव पालकांनी दिले, तर मुलांना चांगल्या गोष्टींचे वेड लावता येईल. व्यसनांच्या मोहावर मात केलेली मुले सांगतात की, त्यांच्या पालकांनी त्यांना नेहमीच मैदानी खेळांसाठी प्रोत्साहित केले. त्यामुळे गेमिंग झोन्स, व्हिडिओ गेम्समध्ये गेलो तरी रमलो नाही.

मुले अनुकरणप्रिय असतात. पालकांनी ट्रेकिंग, सायकलिंग, वाचन, मॅरेथॉन, किल्ले धुंडाळणे, निसर्गाचा मुक्त आस्वाद घेणे, पक्षी-निरीक्षण, मैदानी खेळ, नाट्य-नृत्य-संगीत अशा बेहोष करणाऱ्या पण चांगल्या अर्थाने झिंगविणाऱ्या-गुंगविणाऱ्या गोष्टींची ओळख मुलांना करून दिली तर उपयुक्त ठरेल. कलाविश्व असेच बेभान करू शकते - मग ते ध्यास घेऊन कला शिकणे असो वा त्याचा निव्वळ आस्वाद घेणे असो. वाचन, व्याख्याने ऐकणे, भाषा शिकणे, तऱ्हेतऱ्हेचे कोर्सेस करणे, सामाजिक कार्य, याबाबत सकारात्मक ईर्षा/ध्यास मुलांच्या मनात तयार करता येतो. पालक स्वत:च्या वर्तनातून तसेच आस्वादाच्या संधी लहानपणापासून उपलब्ध करून देऊन अशा चांगल्या 'व्यसनांची' वाट दाखवू शकतात. यातून वयानुरूप बेहोषीची गरज भागेलच, पण त्याबरोबर व्यक्तिमत्त्वही बहरून येईल. एखाद्या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिक, अपंग, दुर्बल घटकांतील मुले यांच्यासाठी काम करणे, एखाद्या कार्यासाठी चळवळ उभारणे अशी इतरही पर्यायी 'नशा' असू शकतात.

संधी देणे, वाट दाखविणे तर दूर; पण मुले वरीलपैकी काही करू पाहतील तर अभ्यास/करिअर वगैरेच्या नावाखाली त्यांना परावृत्त तरी केले जाते किंवा 'लष्करच्या भाकऱ्या' म्हणून अवेहलना तरी केली जाते.

तरल वयात, संप्रेरकांनी शारीरिक गोंधळ घातलेला असताना, धूसर-बेधुंद वातावरणात केवळ मैत्रीखातर धरलेल्या हातातून लक्ष्मणरेषा कशा ओलांडल्या जातात व पुढे वाटचाल कोणती याची माहिती मुलांना हवी; त्याबरोबरच धोका झाल्यास पालकांच्या आधाराची खात्रीही, म्हणून व्यसनांचा प्रश्न फक्त सक्षमीकरणातूनच सुटू शकेल, असे वाटते. ❐

**महापालिकेच्या शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी २००९ पासून शालेय विद्यार्थ्यांची व्यसनाधीनता रोखण्यासाठी 'शालेय समुपदेशन' हा स्तुत्य प्रकल्प राबविण्यात येत आहे. २०१३ सालची त्यासंबंधीची ही आकडेवारी.**

| **जून ते ऑक्टोबर २०१३** | **शाळा : ३०६** |
|---|---|
| **समुपदेशन** | |
| **वैयक्तिक समुपदेशन : एकूण ३,३५०** | **गट समुपदेशनातील विद्यार्थी : १५,३८२** |
| **समुपदेशन झालेले विद्यार्थी : ६२०** | **झालेले विद्यार्थी : ११,४४०** |
| **समुपदेशन चालू असलेले विद्यार्थी : २,७३०** | **चालू असलेले विद्यार्थी : ३,९४२** |
| | **समूह समुपदेशन : ३,५५,९५६** |

साभार : दैनिक सकाळ, ७ जाने. २०१४

विचार



■

वैजयंती देवळालकर

# महत्त्व श्रमप्रतिष्ठेचे

■■

श्रमशक्ती अर्थात श्रमप्रतिष्ठा, श्रमानंद. दातृत्त्व म्हणजे दान देण्याची वृत्ती. आपल्या भारतीय ग्रंथात दानाचे महत्त्व सांगितले आहे. किती, कोणते आणि कसे याला फारसे महत्त्व न देता ते देण्याची वृत्ती जोपासता आली पाहिजे. त्याचे महत्त्व स्वत:ला समजले, तरच ते दान दिले जाते.

आता दानाचेही अनेक प्रकार आहेत. अन्नदान, द्रव्यदान, गोदान, वस्त्रदानापासून भूदानापर्यंत सर्व शब्द आपण ऐकलेच आहेत. आता त्याही पुढचे म्हणजे रक्तदान, नेत्रदान, त्वचा दान आणि किडनीदान! जे-जे आपल्याजवळ आहे, ते स्वखुशीने दुसऱ्याला देणे म्हणजेच दान करणे. दान करण्यामागे कोणताही स्वार्थ हेतू नसतो. मला वाटलं म्हणून मी दिलं, हीच भावना असावी. मी दिलं म्हणजे मला त्यापासून हा फायदा व्हायला हवा, ही स्वार्थी भावना. त्या व्यक्तीला उपकारही वाटता कामा नये.

असं म्हटलं जातं की, दान देताना या हाताचं त्या हातालासुद्धा कळता कामा नये. या सर्व दानाला 'धर्म' म्हटलं जातं. म्हणजेच ते दान देताना स्वत:बरोबरच ज्याला द्यायचं किंवा जो घेणार आहे, त्याला समाधान-आनंद वाटला पाहिजे, म्हणूनच आपण म्हणतो. दान करणं हा धर्मच आहे !

आता दानात श्रेष्ठ कोणते, कनिष्ठ कोणते, हा भेदभाव नाही. करणारा किंवा घेणारा यामध्येही कोणी श्रेष्ठ-कनिष्ठ हा भेद नाही. 'खुलभर दुधाची' कहाणी आपण ऐकली असेलच. ही कहाणी; कहाणी न राहता त्यात परिस्थिती किंवा कालानुरूप बदल होतातच. आज आपण त्याचाच विचार करणार आहोत.

परवाच वाचनात आलं की, जपानी लोक तायक्वांदो हा खेळाचा प्रकार शिकवताना दहा मूल्ये शिकवतात. आपल्याही जीवनात मूल्यांचे फार महत्त्व सांगितते आहे.

ती बालवयातच जोपासायला हवीत. स्वातंत्र्य-संयम-सहकाराबरोबर श्रम हेही मूल्य आहे.

अन्नदानाप्रमाणेच श्रमदान हा शब्द परवलीचा आहे. श्रमदानातून रस्ता, विहिरी बांधल्या. आज श्रमदिन आहे. गांधी जयंतीनिमित्त आम्ही श्रमदान करणार आहोत, असे म्हटले जायचे आणि रक्तदानासारखीच श्रमदानाची शिबिरे घेतली जायची.

आता त्याही पुढच्या टप्पा आपल्याला विचार करायचा आहे, कारण आज आपण त्याला नाव दिलंय- 'श्रमप्रतिष्ठा !'

मी, १९५३-५४ मध्ये स्काऊटमध्ये जात होते तेव्हा, म्हणजे मी ११-१२ वर्षांची असतानाची गोष्ट! खूपच चांगले संस्कारक्षम खेळ आम्ही खेळत असू. नकाशावाचन, चिठ्ठ्या टाकून मार्ग शोधत वस्तू-व्यक्ती शोधून काढणे, वर्णनावरून नेतेमंडळी समजून घेणे, स्वत: काटक्या गोळा करून खिचडी तयार करणे इ. या खेळांबरोबर एक आठवडा असा येई, की त्या वेळी स्वत: काम करून देतील ते पैसे मिळवणे म्हणजेच खरी कमाई. खूप मजा यायची हे करताना. सुरुवातीला कोणाकडे जावे काम करायला, हे समजले नाही. पण आईने मावशीकडे जाण्यास सांगितले. गेले मावशीकडे. पण मावशीने काम करून न देताच २ आणे दिले. घरी येऊन मी पैसे मिळाल्याचा आनंद व्यक्त केला. वडिलांनी ते पैसे परत करायला सांगितले. 'काम न करता पैसे मिळवायचे नाही,' असे स्पष्ट बजावले आणि त्यांनी आत्याकडे पाठवले. आत्या स्वत: स्काऊट असल्याने खऱ्या कमाईचा हेतू तिला माहिती होता. तिने डबाभर गहू निवडून घेतले आणि चार आणे दिले.

आता मलाही उत्साह आला, अर्थही समजला. आणि मग वाडा- मैत्रीण- काका यांच्याकडे जाऊन भाजी निवडणे, केर काढणे, कपबशा घासणे, कपडे वाळत टाकणे, झाडाला पाणी घालणे, अंगण झाडणे, रांगोळी काढणे इ. कामे करून एकशेवीस रुपये जमवून गटात पहिला नंतर पटकावला. आई-वडिलांची शाबासकी आणि नातलगांकडून कौतुक झाले ते वेगळेच. तर या खऱ्या कमाईतूनच स्काऊटने मुलांच्या



मनात श्रमाचे मूल्य जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. आता याच मूल्याला आपण श्रमप्रतिष्ठेचे स्वरूप देणार आहोत. कोणतेही काम कमी प्रतीचे नाही. मुळात काम करणे- ते कोणतेही असो... त्याला प्रतिष्ठा आहे, हे आपल्या मनावर बिंबवले जायला हवे.

स्वत:ला ते करता आले पाहिजे, तरच त्याची किंमत कळते. म. गांधीजींच्या विचारांतून आणि कृतीतून आपण हेच पाहिले की, स्वत:चे काम स्वत: करायलाच हवे; त्याबरोबर त्या कामातून इतरांना स्फूर्ती देऊन त्यांचे सहकार्यही मिळवता आले पाहिजे. खूपच वरच्या स्तरावर नेतात म. गांधीजींचे विचार. स्वकृतीतून ग्रामविकास करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवायला हवे. स्वत:च्या स्वच्छतेतून ग्रामस्वच्छता... स्वत:च्या अर्थार्जनातून ग्रामविकास. प्रत्येक गाव स्वयंपूर्ण व्हायला हवे, हीच म. गांधीजींची विचारधारा होती.

या ग्रामविकासाची परीकल्पना वाटते, कारण आता गाव सोडून सगळेच शहराकडे धावत आहेत.

श्रमसाफल्याच्या आनंदापेक्षा पैसा मोजून काम करवून घेतले जात आहे. मी स्वत: सूत कातून त्याचे कापड करून ते मी परिधान करीन, हा आनंद वाटेनासा झाला आणि श्रमानंदाकडून 'आयत्यानंदाकडे' वाटचाल सुरू झाली.

आपण गरीब नाही, त्यामुळे कोणतीही वस्तू खरेदी करण्यासाठी स्वत: कामाचा आनंद न घेता माणसे लावून त्यांना पैसा देण्यासाठी आपल्याजवळ खूप पैसा आहे. या भ्रामक समजुतीमुळे कष्टाची सवय, स्वावलंबन हे शब्दच आपल्यापासून दूर गेलेत. कष्टकरी-बुद्धिजीवीबरोबर आयटीची संस्कृती आली आहे.

घरची कामे करणाऱ्याची सुट्टी, की जेवण बाहेर. या गोष्टींचीच सवय होऊ लागली आहे.

खरंतर मा. मॉंटेसोरी बाईच्या म्हणण्यानुसार सर्व चांगल्या सवयी या उपक्रमातच येतील, पण परंपरेने सिद्ध झालेले संस्कार आपण समोर ठेवू. म्हणजे असं -- उठल्याबरोबर स्वत:ची कपबशी विसळून जागेवर ठेवणे, स्वत: वापरलेली जागा स्वच्छ ठेवणे ह्या गोष्टी न सांगता सवयीनुसारच होणे अपेक्षित आहे.

घरातील बारीक-सारीक गोष्टी करता यायलाच हव्यात. त्यासाठी मुलांसमोर आई-बाबांनी त्या सहजपणे करायला हव्यात. त्यातून स्वावलंबन, सहकार्य ह्या मूल्यांची जोपासना होईल.

सहकार्य - गोष्टी वाटून घेणे, यातून काम करण्याचा आनंद मिळवता येईल. 'साथी हाथ बढाना' या उक्तीप्रमाणे घरातील सर्वच कामे आनंदाने केली जातील. मा. मॉंटेसोरीबाईंनी तर स्वयंशिस्त, स्वावलंबन, सहकार्य अशा मूल्यांसाठी जीवनव्यवसाय हे नाव देऊन ३ ते ६ वयोगटातील मुलांकरीता विविध उपक्रम आयोजित केलेत; तेसुद्धा बालवाडीपासूनच! यात घरगुती सर्व कामे... निवडणे-किसणे, चिरणेपासून वाटणे, घुसळणेपर्यंत... भांडी घासणे-धुणे धुणे, कपड्याच्या घड्या करण्यापासून फर्निचरच्या सफाईपर्यंत... बुटाची लेस, बटणं लावणेपासून भांडे पॉलिशपर्यंत... घराच्या, वर्गाच्या सफाईबरोबर परिसरसफाई, रांगोळी घालणे, पताका लावणे, सजावट करणे. इ.

मॉंटेसोरी बाईंनी असे विविध उपक्रम करता करता स्वच्छता, नीटनेटकेपणाबरोबरच सौंदर्याचं मूल्य जोपासण्या-पर्यंतचे सर्व उपक्रम संस्कारक्षम वयातच अंगीकारून घराबरोबर परिसराचे निरीक्षण करण्याची सवय लावायला हवी, असे प्रतिपादन केले आहे. काळ बदलला तरी मूल्ये बदलत नाहीत. रचनावादी शिक्षणपद्धतीतही कृतीतून शिक्षण याला महत्त्व दिले आहे. श्रमप्रतिष्ठेचे मूल्य तसेच ठेवून पुढे आपण श्रमानंदाला मूल्य म्हणत आहोत.

कुंभार मडकी बनवतो, त्यात व्यवहारातून श्रमानंदाची जोपासना होते. चांभार दुसऱ्याच्या चपलेला टाचा मारताना श्रमानंदातून सौंदर्यमूल्याची जोपासना करतो. मातीकाम करीत मातीचे मणी करत-करत उंची झुंबरे करण्याचा आनंद मिळवला जातो. कष्टाने पोळी करून सुंदर पोळीतंत्र अवगत करून, विक्री करून श्रमानंदाबरोबर अर्थाजनही करू शकतो. हे सगळे रचनावादी शिक्षणात अभिप्रेत आहेच.

स्वरचनेतून साकरली जाऊ शकते. श्रमानंदाची मूल्यकल्पना आणि म्हणून आता सुंदर परिसर, सुंदर नदी, सुंदर किल्ले, सुंदर नगर, सुंदर रस्ते ठेवण्यासाठीच विविध कल्पना पुढे येत आहेत. बालशाळेपासून कॉलेजकुमारांपर्यंत या मूल्यांची जोपासना होण्यासाठी वेगवेगळ्या संस्था काम करीत आहेत. मुलांमध्ये, तरुणांमध्ये 'हे माझे आहे-- मग मी, माझे घर, माझा रस्ता, माझा परिसरपासून माझा गाव आणि माझा देश' असा प्रेममय प्रवास होण्यासाठीच श्रमाचे मूल्य जोपासायला हवे. ते समजले की श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त होईल आणि श्रमानंद मिळेल.

पण म्हणूनच श्रममूल्य रुजायला हवे. इतर कोणाचीही वाट न पाहता ते स्वत: समजावून घेऊन अंगीकारण्याची वेळ आली आहे.

हम चलेंगे साथ, डाले हाथोंमे हाथ
हम होंगे कामयाब एक दिन
मनमें है विश्वास, पूरा है विश्वारस
हम होंगे कामयाब एक दिन....

❒

कालिदास मराठे

# प्रश्न शिक्षणाच्या माध्यमाचा

**मुलांच्या शिक्षणाचे माध्यम हे प्रथम भाषा म्हणजेच 'मातृभाषा' असली पाहिजे, ही भूमिका 'शिक्षणवेध'ने वेळोवेळी स्पष्ट केली आहे. 'मातृभाषा हीच ज्ञानभाषा असावी' हे आधुनिक भाषातज्ज्ञही सांगत आहेत. त्यामागील विचारांची विश्लेषणपूर्वक मांडणी या लेखांमधून केली आहे. गोव्याच्या पणजीतील 'हेरॉल्ड' या दैनिकातून तीन भागांत प्रसिद्ध झालेल्या लेखमालेचा हा तिसरा व शेवटचा भाग आमच्या वाचकांसाठी...**

गेल्या दोन भागांत आपण मातृभाषा-परिसरभाषा माध्यमाचे फायदे, इंग्रजी माध्यमातून शिकण्याचे तोटे आणि माध्यमाच्या प्रश्नांबाबत असलेले गैरसमज पाहिले. या संबंधात काही सनातन सत्ये आहेत, तीही पाहिली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर खरे तर आपापल्या भाषेतून, बोलीतून शिकणे ही अभिमानाची, गर्वाची, देशभक्तीची गोष्ट आहे- ही भावना विकसित व्हायला हवी होती.

स्वातंत्र्यापूर्वी विदेशी मालावर बहिष्कार, तसेच इंग्रजी शाळांवर बहिष्कार ही चळवळ जोरात होती; परंतु भाषावार प्रांतरचना त्या-त्या राज्यातील प्रगतीसाठी आवश्यक आहे, असे मानणाऱ्या सरकारांनी त्या त्या प्रदेशातील राज्यकारभार त्या-त्या प्रदेशाची राजभाषा म्हणून कायद्याने संमत केलेल्या भाषेतून चालवायला हवा होता. राज्य करणारे सत्ताधीश, नोकरशहा यांनी आपापल्या मातृभाषेत अथवा देशाच्या राष्ट्रभाषेत - हिंदीत स्वाक्षरी करून त्याची सुरुवात करायला हवी होती. परंतु आपल्या भाषाभिमानाची, देशाभिमानाची एवढी साधी गोष्ट करायला सत्ताधीश-सत्ताधीशच कशाला, आपण सामान्य जनही तयार नाही.

सत्ताधीश व नोकरशहा यांनी आपापल्या मुलांना इंग्रजी शाळांत शिकायला पाठविले आणि

याबाबतीत त्यांचे अनुकरण खालच्या वर्गातील लोकांनी केले; परिणामी, माध्यमाचा प्रश्न आज गंभीर होऊन बसला आहे. त्यामुळे लिंगभेद निवड करण्याचे स्वातंत्र्य आई-वडिलांना नाही आणि तसे केल्यास गुन्हा ठरेल डॉक्टर आणि पालकांना शिक्षा होईल, त्याच प्रकारचा गुन्हा माध्यमनिवड करणाऱ्या पालकांचा मानला जावा, अशी मागणी प्रा. डॉ. प्रकाश परबांसारखे विचारवंत करीत आहेत. याचे कारण स्पष्ट आहे. माध्यमनिवडीचे, हवी ती शाळा निवडण्याचे अमर्याद स्वातंत्र्य पालकांना दिले गेले आणि कोठारी आयोगाने सांगितलेली परिसर शाळा, शेजार शाळा संकल्पनेची कार्यवाही सरकारने गंभीरपणे केली नाही; ज्याचे परिणाम आज आपण भोगत आहोत.

महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, आचार्य विनोबा भावेंपासून अनेक विचारवंत-लेखकांनी, शिक्षण-तज्ज्ञांनी मातृभाषा माध्यमातून शिक्षण घेण्याचे विचार मांडले. परंतु त्यांचा विचार शासनाने केला नाही, आणि समाजातील पालकांनी केला नाही.

माध्यमाचा प्रश्न सोडविण्यासाठी जे उपाय सांगितले जातात, ते आता आपण पाहू या.

१) मुलाला आपल्याला शिकवायचे आहे, ही संकल्पनाच चुकीची आहे. मूल आपले आपण शिकत असते. त्यामुळे 'मूल शिकतं कसं?' या विषयावर पालकांचे प्रबोधन करायला हवे. याची सुरुवात इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील पालकांसाठी प्रबोधनवर्ग आयोजित करून करायला हवी. या दृष्टीने भाषा शिकविण्याऱ्या शिक्षकांचे सघन प्रशिक्षण करायला हवे.

२) शेजार शाळा, परिसर शाळा ही संकल्पना राबविण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

३) शिक्षणात बोलीभाषांचा वापर करून क्रमाक्रमाने आठवी-नववीपर्यंत प्रमाणभाषा मुलांच्या आटोक्यात येईल, यादृष्टीने साहाय्य करायला हवे.

४) स्थानिक भाषा बोलीकडून प्रमाणभाषेकडे नेण्यासाठी वेगळी पाठ्यपुस्तके तयार करायला हवीत.

५) प्रत्येक भाषेसाठी, बोलीसाठी माधुरी पुरंदरे यांच्या 'लिहावे नेटके'सारखी पुस्तक-मार्गदर्शिका तयार करावी.

६) शासनाने आपल्या शाळांना भौतिक सोई-सुविधा पुरविण्याकडे लक्ष द्यायला हवे.

७) शासनाने प्राथमिक शिक्षण म्हणजेच इयत्ता आठवीपर्यंतचे शिक्षण परिसरभाषेतून घेणाऱ्या व्यक्तीलाच नोकरी/रोजगार मिळेल, असा कायदा प्रथम करावा. खरे तर हा एकच उपाय केल्यास माध्यमाचा प्रश्न सुटू शकतो.

८) शासनाने सर्व व्यवहारात परिसरभाषेचा/राज्यभाषेचा वापर करावा, यासाठी दबाव आणायला हवा. पूर्वप्राथमिक ते विद्यापीठाच्या शिक्षणापर्यंत परिसरभाषा माध्यम असावे, यासाठी दबाव आणायला हवा.

९) मातृभाषेतून शिक्षण घेऊन जागतिक पातळीवर यशस्वी झालेल्यांची उदाहरणे लोकांपुढे, पालकांपुढे सातत्याने मांडायला हवीत आणि त्यांचा प्रचार करायला हवा.

१०) मातृभाषादिन, राज्यभाषा पंधरवडे, जागतिक मातृभाषादिन यांसारखे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरे करून भाषाभान जागृत ठेवायला हवे.

११) इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इयत्ता पहिलीपासून त्यांची मातृभाषा उत्तम रीतीने शिकवण्याची व्यवस्था करायला हवी.

१२) उच्चवर्गीयांचे अंधानुकरण करून सर्व समाजाने आपला स्वाभिमान व जीवनमूल्ये सोडू नयेत, यासाठी प्रयत्न करायला हवेत.

१३) इंग्रजी माध्यमाच्या शाळांत इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, पर्यावरणशिक्षण, मूल्यशिक्षण, व्यवसायशिक्षण, कला, संगीत, शारीरिक शिक्षण यांसारखे विषय मुलांना मातृभाषेतून/ परिसरभाषेतून शिकवण्याची व्यवस्था करणाऱ्या शाळांना खास अनुदान देण्याची शासनाने व्यवस्था करायला हवी. (गोमंतकाच्या बाबतीत सेमी कोकणी, सेमी मराठी




माध्यम म्हणता येईल.)

१४) इंग्लिश माध्यमाच्या शाळांतून परिसरभाषा/मातृभाषा माध्यम स्वीकारणाऱ्या विद्यार्थ्यांना खास प्रोत्साहनभत्ता देण्याची तरतूद करायला हवी.

१५) परिसर भाषा/देशी माध्यम न स्वीकारणाऱ्या शाळांना कोणतेही अनुदान देऊ नये. थोडक्यात, या देशातील भाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व बाबतींत उत्तेजन द्यायचे ठरविले व त्याच्या जोडीला पालकांचे शिक्षण केले आणि सरकारने सर्व राज्यकारभार त्या-त्या राजभाषेत केला, तर माध्यमाचा प्रश्नच शिल्लक राहणार नाही. या दृष्टीने मातृभाषेतील शिक्षणाची महती सांगणाऱ्या काही शिक्षणतज्ज्ञांचे, विचारवंतांचे विचार वेळोवेळी मांडून या लेखाला पूर्णविराम देतो. मला आशा आहे, की तिन्ही भागांतील मुद्दे लक्षात घेऊन गोमंतकातील नागरिक माध्यम प्रश्नाबाबत योग्य निर्णय घेतील आणि शासन यासाठी योग्य कार्यवाही करेल.

**१) डॉ. देवीप्रसन्न पटनायक** (माजी संचालक, भारतीय भाषा संस्थान, म्हैसूर)

मातृभाषेतून शिक्षण मिळाल्यास त्या शिक्षणाचा पाया भक्कम होतो. परिणामी, द्वितीय भाषाही मूल सहजपणे आत्मसात करते. स्वभाषेमुळे आपण आपले पाय आपल्या संस्कृतीत पक्के रोवू शकतो. संस्कृतीचे आद्य संस्कार याच भाषेतून मुलांवर होतात. या भाषेतून मुलांची अस्मिता जागृत होते. या भाषेद्वारेच ती आपल्या परिसराशी संतुलित संबंध प्रस्थापित करू शकतात. पूर्वप्राथमिक स्तरापासून एक भाषाविषय म्हणून इंग्रजीचे शिक्षण असावे, अशीही मागणी करण्यात येत आहे. अशाने मुलांचा भाषिक विकास किती मंदावेल, याचा विचार कोणीही करत नाही. आपल्या परिसरातील सर्व रोपे, झाडे, पक्षी इत्यादींना इंग्रजी नावे असतातच असे नाही. त्यामुळे मुलांची कुचंबणा होते व ते आपल्या परिसराला दुरावतात. आपले लोकवाङ्मय, लोककला, आपल्या मिथककथा, आपली बडबडगीते, आपले पोवाडे- हा सारा सांस्कृतिक ठेवा आत्मसात करणे

मुलांना फार कठीण जाते. पुष्कळदा नितांत आवश्यक असलेले हे सांस्कृतिक संक्रमण होतच नाही. याचा परिणाम म्हणजे, मूल बऱ्याच अंशी सांस्कृतिकदृष्ट्या आंधळे बनते.

व्यक्तिमत्त्वाला ही संस्कृतीची मुळे न फुटल्याने आपण कुणीच नाही, अशी एक अनामिकपणाची आणि समाजाहून अलगतेची भावना त्यांच्या मनात निर्माण होते. इंग्रजीने मातृभाषेची जागा बळकाविल्याने अशा व्यक्तीच्या भाषा- वापरातील, शिक्षणातील सध्याच्या भाषिक धोरणामुळे एक सरासरी बुद्धिमत्तेचा साधारण समाजच निर्माण होईल. एक भाषाशास्त्रज्ञाने १९८७ मध्ये केलेले विवेचन आपणाला मान्य होत नाही, ही दुःखाची गोष्ट आहे.

२) **कवी कुसुमाग्रज** (वि. वा. शिरवाडकर) ज्ञानपीठ पुरस्कारविजेते.

''भाषेचा प्रश्न हा केवळ अभिमानाचा नसून समाजाच्या अस्मितेचा आणि म्हणून अस्तित्वाचा प्रश्न आहे. इंग्रजांची सत्ता गेली, पण इंग्रजीची सत्ता वाढत्या प्रमाणात येथे फैलावत आहे. याचा संभाव्य अर्थ हाच की, आपल्यावरील गुलामगिरीचे सावट अद्याप संपूर्णतः नष्ट झालेले नाही. इंग्रजीवर एक संपन्न भाषा म्हणून माझेही प्रेम आहे. जग हे विज्ञानाशी संपर्क साधणारी एक खिडकी आहे, हे सुभाषित मला मान्य आहे. पण खिडकी म्हणजे घर नव्हे. आपण घराच्या चार भिंती न बांधता फक्त खिडक्याच उभ्या करीत आहोत. इंग्रजीच ही एकमेव खिडकी आहे, असे आपण मानत आहोत. एक विषय म्हणून इंग्रजीच कशाला- जपानी, चिनी, रशियन, फ्रेंचही आपण शिकायला हवी.''

३) **डॉ. अशोक केळकर**, भाषाशास्त्रज्ञ :

''शालेय शैक्षणिक अवस्थेत अमूक इतके ज्ञान घ्यायची ओढ मुलांमध्ये उत्पन्न करणे आणि ज्ञानग्रहणाचा सराव त्याला सहजपणे करता येते, या गोष्टी साधावयाच्या असतात. त्या तशा साधावयाच्या, तर मुलाच्या स्वानुभवाचे स्वभाषेतून साकार होणारे विश्व आणि शाळेतून मिळणाऱ्या ज्ञानाचे विश्व यांचा साधा जुळला पाहिजे. यासाठी स्वभाषेतून शिक्षण देणे आवश्यक आहे.''

४) **वि. वि. चिपळूणकर**, माजी शिक्षणसंचालक, महाराष्ट्र राज्य

''ज्ञानसाधनेसाठी आणि विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या प्रगतीसाठी इंग्रजीवर प्रभुत्व हवे, हे मान्य करूनही त्यासाठी माध्यम म्हणून इंग्रजीचा आग्रह धरणे हे वैचारिक गुलामगिरीचे, पराभूत मनोवृत्तीचे व बालविकासासंबंधीच्या मूलभूत अज्ञानाचे निदर्शक ठरते. अभिव्यक्तीची सहजता, सभोवतालच्या सामाजिक परिसराशी समरस होण्याची सुलभता या सर्वांचा एकत्रित विचार करता मातृभाषेतून शिकणे केव्हाही श्रेयस्कर ठरते.''

५) **प्रा. माया पंडित**, केंद्रीय इंग्रजी संस्थान, हैदराबाद

''संकल्पनांचा पाया मातृभाषेतून पक्का झाल्यावर दुसरी भाषा, ज्ञानभाषा स्वीकारणे वेगळे. आपली मातृभाषा कमी दर्जाची ठरली, की आपणही कमी दर्जाचे ठरतो. ही भाषा वापरणे म्हणजे काही तरी कमअस्सल होणे, असे मानसिक खच्चीकरण करणारा गंड तयार होतो. त्या गंडातून एका परक्या भाषेला आपले मानणे आणि ज्ञान परक्या भाषेतून आत्मसात करणे सोपी बाब नाही. 'साऱ्या वंचितांनी आता मातृभाषेऐवजी इंग्रजीचा स्वीकार करणे आवश्यक आहे' हे प्रमेय अयोग्य व अहितकारक दिसते. आई जशी बदलता येत नाही, तशी भाषाही. तेव्हा इंग्रजी ही वंचितांनी आपली मातृभाषा म्हणून स्वीकारावी हे प्रमेय सामाजिक, मनोवैज्ञानिक, सांस्कृतिक, राजकीय आणि अगदी भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातूनदेखील स्वीकारार्ह नाही. त्यामागचे हे सारे जागतिकीकरणाचे सांस्कृतिक राजकारण समजून घ्यायला हवे.''

वाचकहो, असे अनेक जण परखडपणे सांगताहेत; आपण कृती करणार का?

(समाप्त)



# अनुताईंच्या आठवणी

## प्रदर्शन

आमच्या कोसबाडला, त्यावेळी दर महिन्याला एका वर्गाचे प्रदर्शन भरवावे, अशी ताराबाईंची सूचना. शिक्षकांच्या सभेत अनुताई आम्हाला सांगत, ‘आपल्या शाळेत सर्व प्रदर्शने होतात. कारण, आदिवासी मुलांना भांड्यांचा, कपड्यांचा, थोर नेत्यांचा, परिचय होणे जरुरीचे असते.’
त्याप्रमाणे पानांचा, धान्यांचा परिचयान देत होतो, माझ्या तिसरीच्या वर्गाचे धान्यांचे प्रदर्शन मी ठरवले, सुंदर धान्यांच्या रांगोळ्या काढल्या, पुठ्ठ्यावर डिंकाने वाटाणे चिकटवून धान्यांनी अक्षरे तयार केली, मसूरडाळ, उडीदडाळ, चणाडाळ यांचा गालिचा तयार केला होता, अनुताईंना प्रदर्शन खूप आवडले, त्या म्हणाल्या, ‘ताईंना दुपारी घेऊन येते प्रदर्शन दाखवायला.’ दुपारी चार वाजता ताराबाई प्रदर्शन पाहायला आल्या, त्या प्रदर्शन पाहत पाहत कौतुक करत पुढे चालल्या, त्यांच्या मागे अनुताई आणि त्यांच्या मागे मी असे चालत होतो, मध्येच ताराबाई म्हणाल्या, ‘आता ही मिसळलेली धान्ये वाया जाणार.’ लगेच अनुताई म्हणाल्या, ‘नाही ताई, या धान्यांची न्याहरी करणार आहेत सिंधुताई. होय ना सिंधुताई?’ मी लगेच ‘हो’ म्हणाले, म्हणजे ताराबाईंना योग्य उत्तर देणे मला सुचेल का अशी शंका येऊन आपणच योग्य उत्तर देऊन, त्यांनी माझे संरक्षण केले.

**सिंधुताई अंबिके**

# व्यक्तिविशेष

■

संतोष वनकर



## व्रतस्थ संन्यासिनी :
# सिंधुताई अंबिके

■■

पू. ताराबाई मोडक आणि पू. अनुताई वाघ यांच्या प्रेमाने, स्नेहाने व ज्ञानाने फुललेला, बहरलेला अन् विस्तारलेला महावृक्ष म्हणजे माननीय सिंधुताई अंबिके होत. ज्यांनी आपले संपूर्ण जीवन आदिवासींच्या आणि उपेक्षित समाजाच्या मुलांसाठी समर्पित केले, त्यांत स्वयं- तेजाने प्रकाशित होऊन लखलखत आहे ती चांदणी म्हणजे सिंधुताई. परिसाने एखाद्या वस्तूला स्पर्श करावा आणि त्याचे सोने व्हावे, तसेच ताराताई व अनुताई या परिसरूपी पावनस्पर्शाने तयार झालेले बावनकशी सोने म्हणजे मा. सिंधुताई होय.

आज त्या ८४ वर्षांच्या आहेत, तरीपण तरुणांना लाजवेल असेच त्यांचे कार्य आहे. ज्या वयात सामान्य व्यक्ती परमेश्वराचे मनन, चिंतन, भजन, पूजन, जप-तप करीत नातवंडांना अंगाखांद्यावर खेळवीत, गोष्टी सांगत आपले जीवन घालवत असतात; त्या वयात त्यांना त्यांच्यातील अंतर्गत प्रेरणा स्वस्थ बसू देत नाही. त्यांच्या गुरूने लावलेली ज्योत सतत तेवत ठेवण्याचे कार्य त्या अखंडपणे करीतच आहेत.

सिंधुताई या मूळच्या सांगलीच्या.  त्यांनी हिंगणे स्त्रीशिक्षण संस्था, पुणे येथून शिक्षक पदवी उत्तीर्ण केल्यानंतर पू. अनुताईंच्या २६ नोव्हेंबर १९५८च्या एका पत्राने त्यांच्या संपूर्ण आयुष्यालाच कलाटणी मिळाली आणि कोसबाडच्या पवित्र टेकडीवरून महावृक्षांच्या छत्रछायेत त्यांचा बालशिक्षणाचा प्रपंच सुरू झाला. तेव्हापासूनच अनुताईंच्या सहवासात सव्वीस वर्षे राहून आकारास आलेला हा वृक्ष आजही आदिवासी बालकांना मायेची शीतल सावली आणि शिक्षणाची गोड



**बाया कर्वे पुरस्कार स्वीकारताना सिंधुताई अंबिके**

गोड फळे त्या कोसबाडच्या टेकडीवर पन्नास वर्षांपासून देतच आहे.

त्या काळात सिंधुताईंनी अनेक उपक्रम राबवले. भागशाळा, कुरणशाळा, बांधावरची शाळा, जंगलशाळा अशा अनेक शाळा त्यांनी चालवल्या. आदिवासी बालक-पालक यांना जवळ आणून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. पाड्यावरच्या आदिवासी भगिनींची सफाई शिबिरे घेतली. विविध माध्यमांतून त्यांचे प्रबोधन केले. सहभोजने, पदार्थ प्रात्यक्षिके, हळदी-कुंकवाचे कार्यक्रम, तसेच माता-बालक-स्पर्धा अशा एक ना अनेक उपक्रमांनी मुलांच्या शिक्षणाबरोबरच पालकजागृतीही घडवून आणली.

अशा या सिंधुताईंनी कोसबाड येथील शिक्षण केंद्रातून सन १९८८ मध्ये निवृत्ती घेतल्यानंतरही त्यांचे मन त्यांना स्वस्थ बसून देत नव्हते. म्हणून साई मंदिर, नरवड येथे भटक्या मुलांची शाळा, विनोबा भावे यांच्या 'गागोदे' या गावी कातकरी मुलींची शाळा, तसेच बांधावरची शाळा असे उपक्रम त्यांनी चालूच ठेवले होते. मुलांच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास त्यांना शांत बसू देत नाही. आदिवासींच्या मुलांची, त्यांच्या शिक्षणाची ओढ त्यांना या वयातही तेवढीच आहे, जेवढी त्यांना सुरुवातीच्या काळात होती. म्हणूनच परमपूज्य गुरुंनी (ताराताई आणि अनुताई) लावलेल्या 'ऐना' येथील 'ग्राममंगल'रूपी वृक्षाच्या छायेत राहून त्यास महावृक्ष करण्यासाठी त्यांनी आपले पुढचे आयुष्य समर्पित केले आहे.

तेथे आजही त्या बालकांना गाणी, गोष्टी, नाटुकली मोठ्या उत्साहाने शिकवत आहेत. त्यातून मुलांची भीती व न्यूनगंड कमी होऊन मुलांमध्ये आत्मविश्वास जागृत होत आहे. लाजरी-बुजरी व अबोल मुलांना धीट व बोलकी करण्यासाठी त्या सतत प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी शाळेत बालसभा, सणसमारंभ, बातमी वाचन, अनुभव कथन, उखाणे सांगणे अशा विविध उपक्रमांतून बालक घडविण्याचा प्रयत्न त्या करीत आहेत. जी मुले वाचन-लेखनात मागे पडली आहेत, त्यांचे वर्ग त्या येथे घेतात. तसेच बालवाडी विकासघर येथील शिक्षकांना दर गुरुवारी मार्गदर्शन व प्रशिक्षणही देत आहेत. ज्याप्रमाणे सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पाहावे पाण्यात त्याप्रमाणे सिंधूताईंना पाहावे बालकांच्यात. त्या त्यांच्यात रममाण होऊन जातात. मग त्यांना एकच ध्यास लागतो मुलांना अधिकाधिक नवनवे काही तरी पोषक देतच राहावेसे वाटते. त्या जे काही सांगतात ते इतके अवीट असते की, ऐकणाऱ्याला ते अधिकाधिक ऐकत राहावे असे वाटते. आबालवृद्धांना मंत्रमुग्ध करण्याची जादूच जणू त्यांच्याकडे आहे की काय, असे वाटावे इतक्या प्रभावीपणे आणि अस्खलितपणे सांगण्याचा त्यांचा ओघ असतो. ऐकणारा प्रत्येक जण त्या ओघात वाहून जाईल यात शंका नाही.

आपल्याकडील ज्ञानमेवा वाटण्यासाठी त्या नेहमी तत्पर असतात. त्या एक शिक्षणतज्ज्ञ तर आहेतच; परंतु त्या उच्च दर्जाच्या कवी, लेखक, कलाकार, उत्तम वक्त्या, उत्तम गायिका, तसेच संग्रहकार आहेत. त्यांनी अनेक बालगीते, संवाद, नाटुकली, गाणी-गोष्टी, एकांकिका लिहिल्या आहेत. त्यांनी अनेक आदिवासी गाण्यांचा-गोष्टींचा-उखाण्यांचा संग्रह करून ठेवला आहे. आदिवासी शब्दकोशही त्यांनी तयार केला आहे. 'वटवृक्षाच्या सावलीत' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्धच आहे. त्याचबरोबर अनुताईंच्या सहवासात, ग्राममंगलचा पूर्वेतिहास, पळसाची फुले, वारली बोली, करू या गंमत, माझी आदिवासी बालके आणि त्यांचे शिक्षण, गीतावली (समाजशिक्षण), वारली गीते (संग्रह), लालन गीते, बालनाटके, शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक यांचे शिक्षक-पालकांसाठीचे सुविचार अशी अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.

त्याचबरोबर आनंददायी शिक्षण व हसत-खेळत शिक्षण मिळावे म्हणून भाषा, गणित, विज्ञान, भूगोल या विषयांवर बालगीते, धडे, गाणी, नाटके, गोष्टी इ. लिहिलेल्या आहेत. तसेच प्रौढ शिक्षणासाठी भजने, भारूडे, दारूबंदी, कुटुंबकल्याण या विषयांवरही त्यांनी विपुल साहित्य लिहिलेले आहे. बालसाहित्याचा न आटणारा झरा म्हणजे सिंधुताई होत. त्यांच्या या बाल-कल्याणाचा, आदिवासीकल्याणाचा - महान कार्याचा गुणगौरव अनेक संस्थांकडून झालेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनानेही त्यांना पुरस्कार देऊन, त्यांचा गौरव करून त्यांच्या या उदात्त कार्याची दखल घेतलेली आहे.

'आदर्श शिक्षिका' पुरस्काराचा मान त्यांना तीन वेळा मिळाला आहे; त्याचबरोबर सावित्रीबाई फुले पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार, बाया कर्वे पुरस्कार, शिक्षण परिवर्तन पुरस्कार व नुकताच मा. राज्यपाल यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत मिळालेला आदिवासी सेवा पुरस्कार त्यांचा उचित गौरव करणारा आहे.

अशा या तपस्विनी, बालकांच्या लाडक्या आजी यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी दीर्घ आयुरारोग्य लाभो, हीच सदिच्छा !

ताराताई, अनुताई झाल्या महान कोसबाडवर
त्यांच्या शिष्या सिंधुताई शोभे खऱ्या वारसदार
सोडून शहराची साथ, धरली पाड्याची वाट
ताराताई, अनुताई, यांचे धरूनिया बोट
विकास सर्वांगीण बालकांचा करण्या सोडले घरदार
धरला शिक्षणाचा ध्यास, त्या उपेक्षित समाजाचा
रिता केला हो कलश त्यांनी तो अखंड ज्ञानाचा
वसा बालशिक्षणाचा त्यांनी घेतला जीवनभर
गाणी, गोष्टी, बालगीते त्यांनी लिहिली कित्येक
अशी फुलली-बहरली बालक-पालक अनेक
बालकाच्या विकासाची त्यांना सदैव हुरहूर

❒

■
वासंती जोशी

# चार भिंतींबाहेरील शिक्षण

## पुणे-कन्याकुमारी सायकलप्रवास

ग्राममंगलच्या शिक्षणपद्धतीत 'अनुभवातून शिक्षण' या संकल्पनेला महत्त्व दिले जाते. शालेय पातळीवर विद्यार्थ्यांना अनेक विषयांच्या माध्यमातून प्रत्यक्ष काम करणे, मुलाखती घेणे, मोठ्या व्यक्तींच्या भेटी घडवून आणणे; विविध ठिकाणी भेटी देऊन प्रत्यक्षात इतिहास, भूगोल, संस्कृती, भाषा यांचा अनुभव देऊन शिक्षण दिले जाते. मुलांना दिलेल्या या अनुभवातून ती स्वत: विचार करायला, स्वतंत्रपणे लेखन करायला, अनुभवकथन करायला, नवनवीन प्रयोग करायला प्रवृत्त होतात आणि त्यातूनच ती समृद्ध होत जातात.

ग्राममंगलच्या या संकल्पनेतून विचार करताना जाणवलं की, पुण्यातील एस.एन.डी. टी. कॉलेजच्या विद्यार्थिनी आणि काही शिक्षक अशा २५ जणींनी पुणे ते कन्याकुमारी असा सायकलप्रवास नुकताच केला. त्यांच्या या मोहिमेत काही प्रमाणात सुरुवातीला व शेवटचे ३/४ दिवस मी प्रत्यक्ष सहभागी होते. त्यामुळे विद्यार्थिनींना हा अनुभव घेताना मी प्रत्यक्ष पाहिले होते. तेव्हा अनुभवातून या काय शिकल्या, हे त्यांच्याकडूनच समजून घ्यावं म्हणून सौ. वासंती जोशी ज्या या मोहिमेच्या प्रमुख होत्या - (ज्यांनी यापूर्वी लेह, लडाख, खारदुंगा हा प्रवास प्रथम सायकलवरून केला आहे, नर्मदा परिक्रमा ही सायकलवरून केली आहे. एन्ड्युरोची स्पर्धा अनेक वेळा जिंकली आहे) त्यांनाच हा लेख लिहावयास सांगितला, तेव्हा 'हे तो प्रचितीचे बोलणे' आहे. - **डॉ. सुप्रिया अत्रे**

भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्रीशिक्षणाचा ध्यास घेऊन केवळ पाच महिलांना घेऊन सन १९१६ मध्ये भारतातील पहिल्या महाविद्यालयाची स्थापना पुण्यात केली. ठाकरसी कुटुंबीयांच्या आर्थिक पाठबळामुळे पुढे महिला विद्यापीठाची स्थापना झाली व श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ नावारूपाला आले. याच विद्यापीठाच्या पुण्यातील कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालयाने २५ जणींची पुणे ते कन्याकुमारी अशी १६०० किमी अंतराची सायकल रॅली २२ डिसेंबर २०१३ ते १२ जानेवारी २०१४ या कालावधीत आयोजित केली.



स्वामी विवेकानंदांचे राष्ट्रप्रितीचे जाज्वल्य विचार, युवाशक्तीवरील विश्वास आणि त्यांची विश्वबंधुत्वाची साद याला मानवंदना देण्यासाठी त्यांच्या १५१ व्या जयंती सोहळ्यात सहभागी होण्यासाठी या विद्यार्थिनी १२ जानेवारीचा मुहूर्त साधून कन्याकुमारीला पोहोचल्या. एखाद्या शैक्षणिक संस्थेने केवळ विद्यार्थिनींची आयोजित केलेली ही सायकल सफर सगळ्यांच्या कौतुकाचा विषय बनली.

महिला शिक्षणातील पारंपरिक अडथळे कमी झाल्याने प्रगतिपथावरील भारतात अनेक महिला विविध क्षेत्रांत आघाडीवर असल्याचे दिसून येत आहे, परंतु अजूनही महिलेकडे अबला या दृष्टीतून बघितले जाते. शिक्षणाचे दरवाजे उघडले तरी निर्णयप्रक्रियेत महिलांना सहजासहजी सामावले जात नाही. म्हणूनच 'महिला सबलीकरणा'चे प्रयत्न आजही गरजेचे ठरतात, त्यावर वातानुकूलित खोल्यांमध्ये चर्चासत्रे घडतात. अशा वेळी 'साहसी क्रीडांमधून महिला सबलीकरण' हा संदेश देणारी ही आगळीवेगळी सायकल सफर चार भिंतींबाहेर पडून विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्वामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यात यशस्वी झाली आहे. अभ्यासक्रमातून शिकविलेले विविध विषय, प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून दिलेले अनुभव, माहिती-तंत्रज्ञानाच्या स्फोटामुळे खुले झालेले माहितीचे भांडार- या सर्वांवर कडी करणारा, पदोपदी जाणिवा चेतवणारा आणि अंतर्मुख करणारा हा प्रवास स्वप्नवत होता यात शंका नाही.

**मोहिमेची बीजे**

एस. एन. डी. टी. कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने गेल्या चार-पाच वर्षांपासून विद्यार्थिनींसाठी साहसी क्रीडाप्रकारांची ओळख करून देणारा 'जिगर' नावाचा उपक्रम राबवला जातो. या अंतर्गत विद्यार्थिनी त्यांच्या मार्गदर्शक प्राध्यापकांबरोबर ट्रेकिंग, व्हॅली क्रॉसिंग, साहसी क्रीडा स्पर्धा अशा उपक्रमांमध्ये भाग घेतात; 'ज्ञानबा-तुकाराम' असा जयघोष करत वारीचाही अनुभव घेतात. अशा उपक्रमांत सहभागी विद्यार्थिनींचा आत्मविश्वास वाढतो, त्यांच्यात जिद्द निर्माण होते, प्रसंगावधान वाढते- हे सर्वांनाच जाणवत होते. त्यातच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानातून विद्यापीठाने गेल्या वर्षी १० सायकली विकत घेतल्या. प्राध्यापिका वासंती जोशी यांनी त्यांचा सायकलिंग क्षेत्रातला अनुभव पणाला लावला. कुटुंबीयांचा पाठिंबा, क्रीडाशिक्षिका राधिका राऊत यांची साथ, विद्यार्थिनींचा उत्साह, हितचिंतकांचे मोलाचे मार्गदर्शन, अनेक प्रायोजकांनी दाखविलेला विश्वास, महाविद्यालयाचे सहकार्य यामुळे हे अशक्यप्राय वाटणारे स्वप्न साकार झाले.

या स्वप्नपूर्तीसाठी २२ डिसेंबर २०१३ पासून या विद्यार्थिनींनी डॉ. जयंत जोशी आणि श्री. बाळासाहेब

भळगट यांच्या मार्गदर्शनाखाली तीन महिने कसून सराव केला. सुरवातीला चार-पाच कि.मी. अंतरातच दमणाऱ्या विद्यार्थिनींना चक्कर यायची, उलट्या व्हायच्या, सायकलिंगचा अजिबात अनुभव नसताना असे होणे स्वाभाविकच होते. पण त्यांनी हिंमत सोडली नाही. सरावात सातत्य राखून हळूहळू वेताळ चौकातील खिंड, चांदणी चौक, पिरंगुटचा घाट, कात्रज घाट चाकांखालचे झाले. नंतर दमसास वाढविण्यासाठी खडकवासला, खानापूर, आळंदी, थेऊर, लोणावळा, केतकावळे, रांजणगाव असा सराव झाल्यावर १०० कि.मी.ची भीती गेली. अशक्य ते प्रयत्नाने साध्य करू शकतो, असा विश्वास वाढला.

सरावा दरम्यान गावातील सरपंच, आमदार, मित्रवर्य यांनी अनेकदा विशेष स्वागत केले, थेऊर-रांजणगाव येथे मानाच्या आरत्या झाल्या, अनेकदा चहावालेकाकांनी प्रेमाने आग्रहाचा चहा पाजला. पोलीस, नागरिक व सायकलिंग क्षेत्रातील दिग्गजांनी कौतुकाने पाठ थोपटली. प्रसारमाध्यमांनी योग्य दखल घेतली, प्रसिद्धी दिली. या सर्व शिदोरीवर सायकलींच्या रूपात जणू पंख मिळालेल्या विद्यार्थिनी केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिक दृष्ट्याही घरट्याबाहेर झेपावायला तयार झाल्या.

**समाजाचे पाठबळ :**

सगळी सोंगं आणता येतात, पण पैशाचे नाही. स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी मोठ्या निधीची आवश्यकता होती. गिअरच्या २० सायकली, सुरक्षिततेसाठी गाड्या, सायकलदुरुस्तीसाठी मेकॅनिक, खाण्याची व्यवस्था, राहण्याचा खर्च... आकडा वाढत होता. पण, चांगल्या कामासाठी दानशूर व्यक्तींनी वानवा नाही याचा प्रत्यय आला. नामांकित उद्योग, बँका, व्यावसायिक, डॉक्टर्स, बिल्डर्स, सामाजिक संस्था यांच्या जोडीने शंभरपेक्षा जास्त जणांनी आपापला खारीचा वाटा उचलला. पिंपरीतील एका सद्गृहस्थांनी तर ओळखीच्या महिलांकडे वही घेऊन जाऊन, माहिती देऊन मदत गोळा केली. यात महाविद्यालयीन सहकारी, पालक यांचाही सहभाग होता. हळूहळू सायकल रॅली हे केवळ आमचे स्वप्न न राहता पुणेकरांचे झाले. अनेकांचे स्वप्न घेऊन केवळ माध्यम म्हणून जाण्याचा मानच जणू विद्यार्थिनींना मिळाला होता. 'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे... घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे' याचा अर्थ विद्यार्थिनींना समजावून सांगत त्यांच्यात भविष्यातील दानशूर व्यक्ती आम्ही बघू लागलो.

**झेपावायला सज्ज :**

तीन महिन्यांच्या सरावात संघबांधणी चांगली झाली होती. लांब राहणाऱ्या विद्यार्थिनीही वेळेचं महत्त्व जाणून सरावासाठी महाविद्यालयात पहाटे ५.४० ला हजर असायच्या. कोणी पडले, कोणाची सायकल मोडली, कोणी आजारी असेल तर तिची काळजी सहजगत्या घेतली जायची. आपली सायकलची शर्यत नाही, तर



रॅली आहे... कोण पहिलं- कोण दुसरं, कोण किती वाजता पोहोचलं याला महत्त्व नसून 'आपण'कधी पोहोचलो याला महत्त्व आहे, हे त्यांच्या मनावर सतत बिंबवत होतो. आपली पाच बोटे सारखी नाहीत; त्याप्रमाणे प्रत्येकीमध्ये कमी-अधिक प्रमाणात वेगवेगळे गुण आहेत; त्यांचा एकत्रित वापर करा... चर्चेतून 'मी' या शब्दापेक्षा 'आम्ही'चे महत्त्व मनावर सतत ठसत होते. जणू 'चक दे इंडिया' तील हॉकी संघाप्रमाणे संघभावना वाढीला लागली होती आणि यातच रॅलीचे यश दडलेले होते.

अडीचशे ते तीनशे जणांच्या उपस्थितीत रॅलीला हिरवा झेंडा दाखविला गेला. कर्वेनगरला महर्षी कर्वे आणि बाया कर्वे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून शुभाशीर्वाद घेतले गेले. सगळ्या सकारात्मक गोष्टी जणू एकवटल्या होत्या.

**समृद्ध अनुभव :**

सातारा, कोल्हापूर, बेळगाव, हुबळी ४५६ कि.मी. अंतर चार दिवसांत पार पडले. वाटेत स्वयंसेवी संस्था, पोलीस दल, नागरिक स्वागत करत होते. वाटेत 'मुलगी वाचवा' आणि 'पर्यावरणाचे रक्षण करा' या विषयांवर पथनाट्य सादर करून विद्यार्थिनी सामाजिक बांधिलकीही जपत होत्या. पुढे रानेबेन्नूर, चित्रदुर्ग, सिरा, डबासपेठे, बेंगलोर, धरमपुरी असा प्रवास करून रॅली तमिळनाडूत पोहोचली. सेलम, दिंडीगुल, मदुराई, सत्तूर तिरुनेलवल्ली मार्गे १७ दिवसांचे सायकलिंग करून रॅली अखेर कन्याकुमारीला पोहोचली.

महाराष्ट्र, कर्नाटक व नंतर तमिळनाडू या तीन राज्यांतील प्रवासात त्यांना भौगोलिक परिस्थिती, विविध भाषा, पिकांच्या पद्धती, वेगळे राहणीमान याची निरीक्षणे नोंदविता आली. अनेक वर्षांत न बघितलेला सूर्योदय आता रोजचाच झाला होता. शेतातील जेवण, दगडांनी पाडलेल्या चिंचा, दातांनी सोलून खाल्लेला ऊस, मोकळी हवा यातील आनंद त्यांना नवा होता. घरातले खाण्यापिण्याचे नखरे आता नव्हते. राहण्याची सोय कमी-जास्त असायची, पण एकदिलाने सगळ्या राहात होत्या. अतिशय काळजीपूर्वक व काटेकोर नियोजनामुळे गोष्टी सुकर होत होत्या. सर्वांच्या सहकार्याने synergy effect मिळत होता.

दिवसाला १०० कि. मी. सायकल चालवल्यावरही लुकलुकत्या डोळ्यांनी गडकिल्ले चढत होत्या, प्रेक्षणीय स्थळांना भेटी देत होत्या. लोकांमध्ये मिसळून आत्मविश्वासाने मुलाखती देत होत्या. अनेक ऐतिहासिक संदर्भ, विवेकानंदांच्या विचारांचा प्रसार करणारे जीवनव्रती आणि दत्तमंदिरातील सेवाभावी साधक, जेसीआय व रोटरी या सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधता आल्यामुळे इतिहासातील सोनेरी पाने त्यांच्यासमोर उलगडली जात होती. सामाजिक व धार्मिक जाणीवेने जाणते-अजाणतेपणी व्यक्तिमत्त्वाला पैलू पडत होते. जीवन समृद्ध होत होते.

कन्याकुमारीला समुद्रकिनारी पोहोचल्यावर सायकलींना समुद्रस्नान घडविणाऱ्या आणि संपूर्ण प्रवासात 'सखीने' साथ दिली म्हणून तिला कवटाळणाऱ्या विद्यार्थिनी भावनाविवश होत होत्या.

पुणे स्टेशनवरील हारतुरे घालून केलेले स्वागत, गावात लागलेले त्यांचे कटआऊट्स, वाटेत अनेकांनी केलेले स्वागत, समारंभ, वृत्तपत्रांतील मुलाखती यामुळे या वीरांगना घरोघरी पोहोचल्या.

'या रॅलीतील सहभागामुळे आमच्यात जिद्द निर्माण झाली, आत्मविश्वास वाढला, छोट्या-छोट्या गोष्टीतून आनंद घ्यायला शिकलो, आपापसात वाटून घेणे, तडजोड करणे यातील महत्त्व समजले, बोलण्याचे धाडस आले; एवढेच नाही तर रागावर नियंत्रण ठेवायला व मैत्री करायला शिकलो'- या त्यांच्या बोलक्या प्रतिक्रियांतच या रॅलीचे खरे यश आहे.

नटण्या-मुरडण्याच्या वयात या रॅलीत सहभागी झाल्याने अनुभवसंपन्न झालेल्या या विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल झाला आणि ही जडणघडण त्यांना आयुष्यभर साथ देणारी ठरेल, यात शंकाच नाही.

❒

रचनावादी दृष्टिकोनातून मुलांच्या शिकण्याच्या अंगाने, त्यांना आवश्यक ते अनुभव देण्याची ताकद विद्यार्थ्यांनी एकट्याने किंवा गटाने केलेल्या प्रकल्प पद्धतीत आहे. ही पद्धत कशी विकसित करता येते, करावी हे ग्राममंगलच्या दृष्टिकोनातून सांगणारी पुस्तिका




लेखक

अदिती नातू

ग्राममंगल प्रकाशन

संपर्क : ०२०-२५३८६६८७

देणगी मूल्य : १०० रुपये



■■

आई आणि वडील दोघांचेही आपल्या मुलावर जीवापाड प्रेम असते. मुलाच्या प्रगतीचे ते दोन पंख सर्व बाजूंनी कौशल्यपूर्ण, ताकदवान असतील; तर काय बिशाद आहे मूल बिघडण्याची! बाळाची आई पहिली गुरू आहे, परंतु आई आणि शाळेतील गुरू यांचे मूल्य मुलांच्या मनात बिंबवण्याची फार मोठी जबाबदारी वडिलांची आहे.

विचारांपेक्षा आचाराने संस्कार चांगले रुजतात. आईच्या मदतीने वडिलांना आपल्या वंशाचा वेल ध्येयाप्रत न्यायचा असतो. चिमुकल्यांना आपले वडील दमदार, हिंमतवान हवे असतात. आईवर, आपल्यावर काहीही संकट आले तर बाबा आहेत ना- असा धीर त्यांना मिळत असेल, तर ती आपली प्रगती निर्धास्तपणे जोमाने करताना दिसतात. घराचे व मुलाचे हास्य, चैतन्य टिकवण्यासाठी वडिलांनी आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीतला 'अहम्' बाजूला ठेवायला हवा. स्वभावात लवचीकता आणायला हवी. जरूर तिथे मुलापुढे नमतेही घ्यायला हवे. मूल वाढवणं हे शास्त्र आता प्रगत झालंय. मोठमोठे विचारवंत, बालमानसशास्त्रज्ञांनी लिहिलेले विचार वाचा, अभ्यास करा अन् बदला स्वत:ला... निदान तसे प्रयत्न तरी करा- मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी ! मुलाला जन्म दिला म्हणून कोणी तुम्हाला आदर्श पित्याचे सर्टिफिकेट नाही देऊ शकत. ती कौशल्ये प्रयत्नाने अंगी आणा. 'पुढच्याच ठेच, मागचा शहाणा' अशी इतरांची उदाहरणे आपल्याला शहाणपणा देऊन जातात. मुलांसाठी वाट्टेल ते कष्ट घेण्याची तयारी असणाऱ्या वडिलांनी हा समंजसपणा दाखवला, तर त्यांचे मुलांवर आदर्श संस्कार नक्कीच होतील.

बालमानसशास्त्रज्ञ सांगतात- मुलांची मानसिकता व प्रगती यांचा निकटचा संबंध आहे. भावनिक पातळीवर मुलांना असुरक्षित वाटायला नको. आज काही शाळाही तसा प्रयत्न करताहेत, पण याबाबतीत वडिलांची 'उदासिनताच' दिसून येते. वडिलांनी आपली कृती व विचार यांत साम्य ठेवावे. आई व मुलगा चुकला, तर तुम्हाला चालत नाही; मग तुमची चूक माफ का? -- असा प्रश्न मुलांच्या मनात येणारच ना? स्वत:लाच सर्व कळते, असा गैरसमज करून घेऊ नका. बायको मूर्ख, मुलाला बुद्धीच नाही-- असे त्यांचे खच्चीकरण करू नका. 'स्वयंघोषित शहाणे' बनू नका. 'तुझ्याभोवती आमच्या दोघांच्या प्रेमाचा भक्कम आधारवड आहे; तू हसत राहा.' असा तुमच्या दोघांचा सूर दिसू देत मुलांना-- बरेचसे पालक 'मुलांसाठी' म्हणून असे वागतात, ती मुले भाग्यवानच ठरतात.

आज पतीच्या बरोबरीने पत्नीही अर्थार्जन करताना दिसते आहे. नोकरी, धुणीभांडी, शेतातली कामे, फॉल-पिको, एलआयसी एजंट वगैरे काहीही असो;



दृष्टिकोन

■

पुष्पा सोळंके

# वडिलांचाही सहवास हवा

घरच्या व बाहेरच्या जबाबदाऱ्या पार पाडताना ती बेजार झालेली दिसत आहे. वाढती महागाई व स्पर्धा यामुळे दोघांची कमाई ही काळाची गरज झालीय. ती पुरुषाची अर्धी जबाबदारी घेते, तर पुरुषाने तिची पाव जबाबदारी घेतलीच पाहिजे. बाहेरच्या जबाबदाऱ्या झेलून घर, आले-गेले, आहे-नाही ते पाहणे, मुलांचे आरोग्य, अभ्यास-- असे धाप लागेपर्यंत, थकेपर्यंत ती काम करते आहे. हे कुठं तरी थांबायला हवं; त्याशिवाय ती तुमच्या मुलाला 'चांगला वेळ' देऊ शकणार नाही. मुलं अभ्यास करत नाहीत, जेवत नाहीत, शाळेला दांड्या मारतात-- असे आई सांगते; तेव्हा तू काय करतेस मग-- दे ते काम सोडून... माझं पोर वाया चाललंय..... असा पुरुषी रुबाब तिला जाचक ठरतो. तुला एवढे स्वातंत्र्य दिलंय, असाही वर तोरा असतो. पोर अगदी तुमचंच आहे, तर त्याच्या सर्व विकासाची जबाबदारीही तुमची पण नाही का?

लहान मूल अनुकरणीय असते. तुम्ही बायकोला मूर्ख, अक्कल नाही-- असे सतत ओरडत असाल; तर तोही आईचा मान राखणार नाही.

एक दिवस तो तुम्हा दोघांनाही उलट उत्तर देईल किंवा आईला बाबा त्रास देतात म्हणून मनात खट्टू होईल. तुमच्यविषयीची तिरस्काराची भावना त्याच्या मनात घर करेल. ती मोठेपणी प्रसंगाने उफाळून आल्याशिवाय राहत नाही. त्याच्या उद्धट वर्तनाला खतपाणी घालू नका. तुम्ही जर त्याची आई आदरणीय ठेवाल त्याच्यासमोर, तर फायदा तुमचाच आहे-- की तुमचा मुलगा/मुलगी उद्धट होणार नाही.

आई जेव्हा अभ्यासाला बोलावते; तेव्हा तुमची म्हणायला हवे-- बेटा, आई आज खूप थकलीय तरी तुझा अभ्यास घेतेय. जा ना... तिचं इंग्रजी किती छान

*मुलांना सर्वांत जास्त घृणा, दु:ख आई-वडिलांच्या भांडणाचे असते. दोघेही त्यांचा आधार. ते एकमेकांपासून तुटले, तर आपल्याला कोण-- अशी अनामिक भीती त्यांच्या मनात घर करून राहते. मुले कुढी, तुसडी बनतात. ज्या कुटुंबात भांडणे नाहीत; प्रेम अन् हसरं-विनोदी वातावरण असते, त्या घरातील मुले निर्धास्त होतात.*

आहे! तुला छान समजेल. मग तो/ती आई जे सांगते ते करण्यास तयार होतील. फायदा तुमच्या पोरांचाच ना?

अशिक्षित आईसुद्धा आपल्या मुलाला त्याच्या हिताचं सांगण्यास समर्थ असते. ज्या घरात मुलाच्या आदर्शाकडे लक्ष देण्यास वेळ नाही, ते घरच नव्हे. संसार भूषणावह तेव्हा होईल, जेव्हा तुमची मुलं सुसंस्कृत होतील.

आईने एक सांगायचं, वडिलांनी दुसरचं सांगायचं व दोघांनी मिळून भलत्याच वाटेनं जायचं- याचा मुलावर विपरीत परिणाम होतो. ते गोंधळून जातात. कोणासारखे वागावे, त्यांना कळत नाही. शेवटी ते विचार करण्याचे सोडून देतात. घरातले आनंदी वातावरण, प्रेम, कष्ट एवढ्या भांडवलावर जर बाळाच्या बुद्धिमत्तेची इमारत उभी करता येते; तर पोटच्या गोळ्यावर अन्याय का करता? पुढचे यश नको का? का कर्मदरिद्रीच राहायचे?

मुलांना सर्वांत जास्त घृणा, दु:ख आई-वडिलांच्या भांडणाचे असते. दोघेही त्यांचा आधार. ते एकमेकांपासून तुटले, तर आपल्याला कोण-- अशी अनामिक भीती त्यांच्या मनात घर करून राहते. मुले कुढी, तुसडी बनतात. ज्या कुटुंबात भांडणे नाहीत; प्रेम अन् हसरं-विनोदी वातावरण असते, त्या घरातील मुले निर्धास्त होतात. मुलाचा सतत पाठपुरावा करणं किंवा अगदीच दुर्लक्ष करणे या दोन्ही गोष्टी वाईटच आहेत. धाकाचा अतिरेक झाला की मानसिक स्वास्थ्य बिघडते. कसेही वागा किंवा ठरलेल्या चाकोरीबाहेर जराही जाऊ द्यायचे नाही-- अशी गुलामी न ठेवता सुजाण, प्रेमळ पालकांनी दोन्हींमधला सुवर्णमध्य शोधावा.

अडचण तुम्हाला ज्ञानाची नाही; तर 'कळतं पण वळत नाही', आम्हाला वेळच नाही, तसेच हे काम आईने करावयाचे की वडिलांनी-- ही आहे. आपलं वय मुलापेक्षा किती तरी पटीने जास्त आहे, तेव्हा भान राखण्याची जबाबदारीही तुमचीच ना? लहान मुलांना तुमचं हृदयातलं खोलवरचं प्रेम समजतंच पण ते तुम्हालाही त्यांना दाखवावं लागतं.

पालकत्व ही एक कला आहे. प्रेम आईने करावयाचे व शिस्त वडिलांनी लावायची, हा समज चुकीचा आहे. वडील म्हणजे धाक, राग, शिस्त याचं असे समीकरण नका होऊ. जिथे मुलांना 'उठता लाथ-बसता बुक्की' हा मंत्र वापरला जातो, त्या संसाराला त्या मुलाची लाथ कधी बसेल याचा नेम नसतो. आज कुटुंब हा घटक अनेक कारणांनी कमकुवत झालाय, अस्थिर वर्तमान, भविष्याची चिंता यांनी धास्तावलेला तरुणवर्ग काहीसा अगतिक, वैफल्यग्रस्त होऊन कोमेजला आहे. स्पर्धेमागे धावताना त्याची दमछाक होतेय. त्याचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य हरपले आहे. तो गांगरून गेलाय. अशावेळी आई-वडिलांनीच जबाबदारीने वागून त्यांना आश्वस्त करणे गरजेचे आहे.

प्रत्येक पालकाजवळ 'मूल्ये' आचरणात नसली तरी विचारात निश्चितच असतात. तेव्हा मुलांचे मित्र बना. त्यांच्या मनात घुसा आणि योग्य त्याच दिशेने जाऊन त्यांना घडवा. पत्नीचा आधार जाणीवपूर्वक

प्रेमाने घ्या, हुकूमशाहीने नव्हे.

मुलांना व्यक्त होऊ द्या. त्यांच्या इच्छा बघा, त्यांच्या भावना दाबू नका. विचारांची सकारात्मकता हाही एक 'संस्कारच' आहे. तो मोठेपणी त्यांच्या उपयोगी पडेल. बालवयात मुलाचे विश्व सुखद असावे लागते. त्याचे सर्वस्व आई असते. तिला कोणत्याही प्रकारची इजा झाली तर ते आतून दु:खी होते. याची जाणीव वडिलांनी ठेवली पाहिजे.

व्यसनी वडील, अपमानित आई यामुळे मुले अस्वस्थ होतात. परंतु आपले प्रेम गमावेल, या भीतीने तो त्या भावना दाबून ठेवतो. पती-पत्नीतील सु-संवाद मुलांना हसरं बनवतो, पण विसंवाद त्यांना कोमेजून टाकतो. तुम्ही बायकोला गुलाम समजून तिची अवहेलना पावलोपावली कराल, तिला कमी समजाल, सतत तिच्या मनाला इजा पोहचवाल तर तिच्याबरोबरच तिच्या मुलांच्याही मनावर विपरीत परिणाम होत असतो.

मुलाच्या आनंदासाठी दोघांनी आनंदी राहणे जरुरीचे आहे. मुलांसाठी तरी एकमेकांना चांगले म्हणा, कौतुक करा. मग त्यांना वाटेल, आपले आई-बाबा आपल्याला इतके जपतात तर आपल्याला काय कमी? आई-वडील मुलाला आपल्याकडेच खेचण्याचा वाईट प्रयत्न करतात. सततच्या टोचण्या, रागवणे, धाक याने वैतागलेली आई नवऱ्यावर राग मुलावर काढते. सततच्या चिडचिडीने मूल कोडगे व बेफिकीर बनते. प्रकाशमान होण्याआधीच त्याला काळजी धरते तो आई-वडील दोघांनाही झुगारून इतर गोष्टीतच आनंद शोधण्यासाठी चुकीचे मित्र, टीव्ही यात रमू लागतो.

वडिलांनी पंधरा दिवसांनी किंवा महिन्याने तरी शाळेला जरूर भेट द्यावी. त्याच्या प्रगतीतल्या अशिक्षित विचाराव्यात व त्याप्रमाणे प्रयत्न करावेत. अडाणी असलात तरी शिक्षकांना पालकाच्या भेटीने आनंद वाटतो. शिक्षित असाल तर शिक्षकापुढे शहाणपणा दाखवू नका. 'मुलाच्या प्रगतीसाठी आपण काय करू या?' असे विचारा. शिक्षकाच्या व तुमच्या एकत्रित प्रयत्नांशिवाय तुम्हाला पाल्यात बदल घडवून आणणे अशक्य असते. तसेच शाळा, अभ्यासा व्यतिरिक्त त्याचे खेळ, मित्र, खाणे, दैनंदिन कार्यक्रम यावरही गप्पा मारणे खूप जरुरीचे आहे. त्यामुळे मुले तुमच्या जवळ येतील.

परीक्षेतील गुण हा त्याच्या बुद्धिमत्तेचा एकमेव निकष नाही हे वडिलांनी लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यामुळे जर परीक्षेत तुमच्या अपेक्षेइतके गुण त्याने मिळवले नसले तरी निराश न होता, त्याला अपमानकारक शब्द न वापरता पुढील परीक्षेत ते कसे वाढतील याची काळजी घ्या. त्यांच्या पाठीवर सांत्वनाचा, आधाराचा हात ठेवा.

जसे रोपट्याच्या वाढीसाठी ऊन, पाणी; तसे मुलाच्या सर्वांगीण वाढीसाठी आई-वडील आवश्यक आहेत. वडिलांनीसुद्धा चतुर व्हावे. संगोपनाचे कौशल्य अंगी प्रयत्नाने आणावे. ती फक्त आईचीच जबाबदारी नाही. आई-वडिलांनी एकमेकांचे चांगलेच गुण मुलांसमोर आणावेत. त्यांना आईची कूस प्रिय असते, तर वडिलांचे कर्तृत्व. आपले एवढे मोठे बाबा घरात खेळीमेळीने राहतात याचा त्यांना खूप आधार वाटतो. कमीत कमी संध्याकाळचे जेवण सर्वांनी सोबतच करावे. चला, 'आपण आईला मदत करू या. मी पाणी घेतो, तू ताटे-वाट्या आण; असे त्यांना आपल्यात सामावून घ्या; म्हणजे तुमच्यात अंतर राहणार नाही. त्यांच्या मित्र-मैत्रिणींशीसुद्धा गप्पा मारा. त्यांची वैचारिक झेप वाढवण्याचा नकळत प्रयत्न करा. जे वडील मुलांना रागवत नाहीत, मैत्रभावाने राहतात; त्याच वडिलांची आदरयुक्त भीती, तसेच त्यांच्याबद्दल मुलांना प्रेम जास्त असते.

मुलांसाठी पैसे कमवले की जबाबदारी संपते का? मुलावर खर्च केलेला कष्टाचा पैसा वाया जाऊ नये म्हणून त्यांना वेळ द्या. बोला त्यांच्याशी. त्यांच्याबरोबर लहान होऊन त्यांचे मित्र बना. आर्थिक-मानसिक अडचणीतले पालक मुलांच्या आरोग्याकडे लक्षच देत

नाहीत. पहिले संकट आहेच मुलांकडे दुर्लक्ष करून, मग दुसरे संकट ओढवून घेऊ नका. संकटे काही घर करून एकाच ठिकाणी राहत नसतात. मुलांची एक-एक छोटी समस्या घ्या व ती सोडवण्याचा प्रयत्न करा. ती मोकळी होतील, हसतील.

चीन, जपानमधील लहान मुलांच्या शाळेची फी १० ते ३५ लाखांपर्यंत आहे. तुम्हाला वाटेल, एवढी फी घेत असतील तर पालकांना काही बघायचेच कारण नसेल. मशीनमध्ये कणसे टाकली की कशी ज्वारीच खाली पडते, तशी मुले मेरिटची होऊनच बाहेर येत असतील. चांगल्या शाळेच्या खुंटाला मुले बांधली की संपली जबाबदारी, अशी भारताच्या पालकांची मानसिकता आहे.

तेथील पालक, शाळेचा एक अविभाज्य घटक आहेत. लहान मुले जेवताना दररोज दोन पालक हजर असतात, तर प्रत्येक वर्गातही एक-दोन पालक हजर असतात. शिक्षकांवर नजर ठेवावयास नाही, तर त्यांना मदत करण्यासाठी. ज्या पालकाला जो विषय वा जी कला अवगत, त्याचा तास आठवड्यातून एकदा त्या पालकाला घ्यावा लागतो.

शिकवणे, वाचून दाखवणे, वह्या तपासणे, खेळ, नृत्य, गाणे, चित्रकला-- काहीही किंवा एखादा आवडीचा पदार्थ करून खाऊ घालणे, वर्गाचे पालक होणे इत्यादी. पिकनिक तर आई-वडिलांशिवाय होतच नाही. एका भारतीयाने ही कामे करण्यास टाळाटाळ केली असता, त्यास एक लाख रुपयाचा दंड भरावा लागला. पालक, शिक्षक, मुले एकमेकांत मिसळून जातात. आनंदात उत्सुकतेने ज्ञान मिळवतात. पालक, शिक्षक मुलांभोवती आधारवड तयार करतात. पण आपल्याकडे शासन, शाळा, शिक्षक आणि त्याहीपेक्षा पालक जास्त उदासीन आहेत. 'एवढे पैसे देऊन शिक्षक काय करतात?' असा सवाल आपले पालक करतील किंवा 'वेळ नाही' ही पळवाट काढतील.

शेवटी वडिलांनी आपले प्रेम आचरणातून दाखवावे. आई-वडील, शाळा, मूल यांचा सूर जुळला; तर प्रगतीचे सुंदर 'संगीत'च निर्माण होईल. तुमचा हसरा, आनंदी, खेळकर स्वभावच तुमचे व्यक्तिमत्त्व 'देखणे' बनवतो, हे विसरू नका. स्वत:ला प्रश्न विचारा... आपण आपल्या मुलांना हवेहवेसे वाटतो का, का ती आपल्याला टाळण्याचा प्रयत्न करतात, ती आईजवळ मन मोकळे करतात आपल्याकडे का नाहीत करत? मुलांना समजून घेणारे त्यांना आश्वस्त करणारे वडील हवे असतात. 'माझेच बाबा रागीट का?' असे त्यांना आतून टोचत असते. बोलून दाखवत नाहीत, पण हे प्रश्न त्यांना त्रास देतात. थोडासा बदल करा. बघा-- तुमचा कुलदीपक/कुलदीपिका घरी, दारी, शाळेत सर्वांचे आवडते बनतील. त्यांना आनंदाने बागडताना बघून तुम्ही, तुमचं अख्खं घर आनंदाने डोलायला लागेल व समाजाला एक आदर्श मिळेल. ❒


## वर्गणीदारांसाठी निवेदन

**आपण 'शिक्षणवेध' या आमच्या अंकाचे वर्गणीदार आहात, याचा आम्हास आनंद आहे. मात्र अंक वेळेवर मिळण्याबाबत आपल्या काही तक्रारी वा नाराजी असेल तर आपण आमच्या ऑफिसशी पत्रव्यवहार करू शकता किंवा फोनवरही संपर्क साधू शकता. वेळ - १०.०० ते २.००**

**आपली तक्रार लवकरात लवकर दूर करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**

**पत्ता : ग्राममंगल शिक्षणवेध, 'सृष्टी' अपार्टमेंट, फ्लॅट नं. १०६ सरितावैभव सोसायटी समोर, सिंहगड रोड, पुणे-३० स्थिर संवाद : ०२० २४२५२१५१, चल संवाद - ९४२३५८०१४५**

ग्राममंगल

# प्रसार



## तरूण पालकांसाठी कार्यशाळा



योग्य शिकणे    आनंदात शिकणे    वेगाने शिकणे

अविरत शिकणे    कायमस्वरूपी शिकणे    परिपूर्ण शिकणे

'ग्राममंगल' ही संस्था १९८२ पासून शिक्षण क्षेत्रात काम करत आहे. सर्व पातळ्यांवरील आणि स्तरांमधील कामांमुळे व विविध प्रयोगांमुळे येथे, मुलाच्या जन्मापासून ते १० वर्षापर्यंतच्या वाढीच्या टप्प्यांचा अभ्यास सातत्याने चालू असतो. केलेल्या अभ्यासाचा उपयोग सर्व पालकांना व्हावा यासाठी ही कार्यशाळा आयोजित केली आहे.

फक्त आई-वडिलच नाही तर मुलांचे आजी-आजोबा, पाळणाघरातील कर्मचारी, शिशूवाडी-बालवाडी शिक्षक यांच्यासाठी देखील हे कार्यसत्र उपयुक्त.

कार्यशाळेची वैशिष्ट्ये

- मेंदू संशोधन आणि शिक्षण
- क्षमता विकासाचे टप्पे
- मूल भाषा कसे शिकते ?
- मूल गणित कसे शिकते ?
- आहार
- व्यक्तिमत्व विकास

ह्या विषयांवर तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन

ठिकाण :-लर्निंग होम, गांधीभवन
वेळ :-दुपारी ३ ते ७
कार्यशाळा शुल्क :-३०००*/-रू.(६दिवसांकरिता)
नोंदणी शुल्क :-५००/- रू. *नोंदणी शुल्कासहित

सर्वांच्या सोयीसाठी सहा शनिवारी अर्धवेळाच्या सत्राचे आयोजन केले आहे. या कार्यशाळा वर्षभर चालू राहतील. नोंदणी झाल्यावर कार्यशाळेची निश्चित तारीख कळविण्यात येईल.

-: कार्यशाळेचे ठिकाण :-
ग्राममंगलचे लर्निंग होम
पत्ता :- ग्राममंगल, गांधीभवन परिसर, अंध मुलींच्या शाळेशेजारी, कोथरूड, पुणे.
संपर्क :- स्वाती मेहेंदळे फोन:- ०२०-२५३८६६८७
ईमेल :-info@grammangal.org

## काही अनुवादित कविता

# मुलं कामावर जाताहेत

धुक्यात वेढलेल्या रस्त्यांवरून
मुलं कामावर जाताहेत
पहाटे पहाटे!

मुलं कामावर जाताहेत!
वर्तमानातील सगळ्यात भयंकर ओळ आहे ही–
भयंकर आहे, तिला बातमीसारखं लिहिलं जाणं
लिहिलं जायला हवं एखाद्या प्रश्नासारखं–

कामावर का जाताहेत मुलं?

अंतराळात उडून गेलेत काय सगळे चेंडू?
वाळवीने खाल्लीत काय सगळी रंगीबेरंगी पुस्तकं?
काळ्या पहाडाखाली दबलीत काय सगळी खेळणी,
की एखाद्या भूकंपात पडून गेल्यात
सगळ्याच शाळांच्या इमारती?
की सगळी मैदानं, बागा आणि घरांची अंगणं
संपलीयेत एकाएकी?



तर मग शिल्लकच काय आहे या जगात?
किती भयानक झालं असतं–
की वास्तवात असं घडलं असतं!
भयानकच आहे... पण यापेक्षा ते
की अजूनही डोळ्यांना सगळ्याच गोष्टी
दिसताहेत सुंदर!

आणि जगातल्या हजारो सडकांवरून जाणारी
मुलं–
खूप छोटी छोटी मुलं...
फुलांसारखी सुंदर मुलं...
कामावर जाताहेत!

मूळ हिंदी कवी : राजेश जोशी

## आपल्या मुलांना वाचवा!

विनाकारण तात्पर्य ऐकवण्यापेक्षा
वर्गात झोपू द्या मुलांना –
म्हणजे निरोगी राहील त्यांचं शरीर आणि मन

पळवा गावाकडं–
शिक्षकांना, व्याख्यात्यांना, प्राध्यापकांना...
शाळा, महाविद्यालय आणि विद्यापीठाच्या अंधारातून
अनुभवशून्य शिक्षण,
आचरणरहित आदर्श–
असे आहेत जसे निरुपयोगी पाणी!

धूळ माखल्या पुस्तकांच्या दारिद्र्यापासून,
मोठ्या चष्म्याच्या विकृत चित्रांपासून,
जुन्या विचारांच्या संसर्गजन्य मूर्खपणापासून
रोगी आणि बेकार
अळी–कीटकांच्या क्रूरतेपासून...
आपल्या मुलांना वाचवा!

राष्ट्राच्या समृद्धीसाठी,
या मुलांच्या कल्याणासाठी
येणाऱ्या पिढीच्या सद्‌भाग्यासाठी
आणि तर आणि–
सतत बसलेल्या भिकारीपणापासून
आपल्या जातीचं रक्षण व्हावं म्हणून–
आपल्या मुलांना वाचवा!

मूळ तेलुगू कवी – के. शिवा रेड्डी



## विश्वास

आवाज देशील,
तर अगदी छोट्याला
दे आवाज...

भलेही तो शिशु असेल,
चालणं त्याला माहितीही नसेल...

जो सगळ्यात छोटा आहे,
त्याच्याकडून सर्वाधिक आशा आहे
दरवाजा उघडण्यासाठी...!

मूळ हिंदी कवी : प्रेमरंजन अनिमेष

सर्व कवितांचा अनुवाद – डॉ. पृथ्वीराज तौर

साभार : उद्याचा मराठवाडा

# परिशीलन

■

डॉ. रत्ना गुजर

# सर्जनशीलता आणि शैक्षणिक प्रगती

■■

बुद्धी हीच मानवाला प्राप्त झालेली एकमेव शक्ती नव्हे; तर तिच्यापेक्षाही एक श्रेष्ठ शक्ती मानवाला लाभली आहे- ती म्हणजे सर्जनशीलता. नवनिर्मितीच्या मुळाशी असणारी शक्ती म्हणजे सर्जनशीलता. 'गरज ही शोधाची जननी' असे म्हणणे योग्य ठरेल. कोणत्याही क्षेत्रात पूर्वप्रचलित व पारंपरिक विचारांच्या-कल्पनांच्या आवर्ताबाहेर पडून जी व्यक्ती नव्या विचारसरणीचा पुरस्कार करते, तिला 'सर्जनशील विचारवंत' म्हणावे. प्रत्येक क्षेत्रात नवनिर्मिती व प्रगती घडवून आणण्याचे मौलिक कार्य सर्जनशील व्यक्तींनीच केले आहे. विज्ञानातील नवे शोध, तत्त्वज्ञानातील नवे विचार, संप्रदाय, सामाजिक शास्त्रातील नवनवीन उपपत्ती व कलेच्या क्षेत्रातील नवे प्रयोग, नवे प्रवाह ही सर्व सर्जनशील व्यक्तींची देणगी होय.

समाजाच्या प्रगतीसाठी- कोणत्याही क्षेत्राच्या प्रगतीसाठी नवनवीन विचारवंतांची आवश्यकता सतत असते. ही गरज सर्जनशीलताच भागवू शकते. बुद्धीच्या साह्याने ज्ञानी, विद्वान किंवा पंडित निर्माण होतील; सर्जनशील विचारवंत निर्माण होऊ शकत नाहीत. प्रगतीला खरा हातभार सर्जनशील विचारवंतांचाच लागला आहे, म्हणून मानवाच्या-जगाच्या प्रगतीचे श्रेय हे बुद्धीपेक्षा सर्जनशीलतेलाच द्यावे लागते.

प्रवाहीत्व, लवचीकता, विविधता, वैचित्र्य, मौलिकता, स्पष्टीकरण, विस्तार किंवा पूर्ती, पुनर्व्याख्या, पुनर्मांडणी, पुनर्रचना, उणीव, दोष, समस्या, संवेदनक्षमता हे सर्जनशीलतेचे घटक आहेत.

*सर्जनशील विद्यार्थी प्रगती करीत नाहीत, असे जरी आढळून आले; तरी त्याचा अर्थ त्यांच्यात ती क्षमता नसते, असे नाही. ठरावीक अभ्यासक्रम, ठरावीक ज्ञानाच्या ठरावीक पद्धतीने प्राप्ती व ठराविक साच्याच्या परीक्षेत त्याची केवळ पुनरावृत्ती पठडीत बसू शकत नसल्यामुळे ते अयशस्वी ठरतात.*

**सर्जनशीलता आणि शैक्षणिक प्रगती :**

सर्जनशील विद्यार्थी हे शैक्षणिक प्रगती करण्याच्या बाबतीत असमर्थ असतात, अपात्र असतात- असा निष्कर्ष काढणे चूक ठरेल. सर्जनशीलता व बुद्धी यांत जर धनिष्ठ संबंध असेल, आणि शैक्षणिक प्रगती जर बुद्धीवर अवलंबून असेल; तर सर्जनशीलता व शैक्षणिक प्रगती यांतही सहसंबंध असलाच पाहिजे. याबाबतीत टॉरन्स, हडसन, यामानाटो आदींनी अधिक सर्जनशील विद्यार्थी व कमी सर्जनशील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा तुलनात्मक अभ्यास केला. त्यात त्यांना अधिक सर्जनशील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती कमी सर्जनशील विद्यार्थ्यांपेक्षा बरीच अधिक असल्याचे त्यांना आढळून आले. याचा अर्थ दोहोंत सहसंबंध आहे.

आपला शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रम साचेबद्ध असतो. अध्यापनपद्धती ठरावीक असतात. परीक्षा तर बव्हंशी स्मृतीचाचणी असते. विशिष्ट प्रकारे अभिसारी विचारप्रक्रियेचा अवलंब करून ज्ञान आत्मसात करणे, घोकंपट्टी करणे व ठरावीक साच्याची उत्तरे परीक्षेत लिहिणे- यालाच आज शिक्षणात महत्त्व आले आहे. या प्रकारांशी जुळवून घेणे सर्जनशील विद्यार्थ्याला जड जाते. हे सर्व त्यांना कंटाळवाणे वाटते. मात्र सगळेच बुद्धिवान विद्यार्थी परीक्षेत उत्तम प्रकारे उत्तीर्ण होतात, असे नाही. पण बुद्धीच्या जोरावर शैक्षणिक प्रगती चांगल्या प्रकारे करून घेतात. परीक्षेच्या बाबतीत एक मुद्दा महत्त्वाचा आहे. तो म्हणजे- परीक्षेतील प्रश्नांचे स्वरूप कसे आहे, हा. ठोकळेबाज प्रश्नांची उत्तरे कदाचित सर्जनशील विद्यार्थी चांगल्या प्रकारे लिहिणार नाहीत; पण ज्या प्रश्नांच्या उत्तरामध्ये स्वतंत्र विचारांना, कल्पकतेला, नावीन्याला वाव आहे त्या प्रश्नांची उत्तरे सर्जनशील विद्यार्थी अधिक चांगल्या प्रकारे लिहितात, असा अनुभव आहे. उदा. - कल्पनाविस्तार, वेगळ्याच अपरिचित विषया-वरील निबंध, कोणत्याही समस्या निराकरणाबाबत आपल्या स्वत:च्या सूचना, एखाद्या विचारसरणीचे वा उपपत्तीचे मूल्यमापन इत्यादी.

परीक्षेच्या आवर्ताबाहेर येऊन अभ्यासक्रमाचा विचार केल्यास हाच अनुभव येतो. प्रत्येक विषयात स्वतंत्र विचारांना, कल्पकतेला, नवनिर्मितीला आवाहन करणारे जे घटक असतील, त्यात सर्जनशील विद्यार्थ्यांना अधिक रस वाटतो. अभ्यासपूरक कार्यक्रमांतही ते अधिक उत्साहाने भाग घेतात. उदा., विज्ञान प्रदर्शन, हस्तलिखित मासिक, निबंध, कथा-काव्य स्पर्धा, हस्तकला स्पर्धा इत्यादी कारण या उपक्रमांत त्यांच्या सर्जनशीलतेला अधिक वाव मिळतो. अभ्यासक्रमावर आधारित काही प्रकल्प घेतल्यास त्यातही सर्जनशील विद्यार्थी आपली शक्ती पणाला लावतात. अभ्यासेतर सांस्कृतिक कार्यक्रमांबद्दल तर विचारायलाच नको. या अभ्यासपूरक कार्यक्रमांच्या निमित्तानेदेखील या विद्यार्थ्यांचा निर-निराळ्या विषयांचा चांगला अभ्यास होऊ शकतो व हा अभ्यास त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला उपकारकही ठरतो.

आपण शैक्षणिक प्रगतीत परीक्षेतील यशासोबतच या सर्व घटकांचा अंतर्भाव करणार असू व त्यांच्या आधारे जर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणार असू; तर हे सर्जनशील विद्यार्थी शैक्षणिक प्रगतीत मागे पडणार नाहीत, हे आपल्याला दिसून येईल. परंतु केवळ परीक्षेतील गुणांच्या आधारेच विद्यार्थ्यांची गुणवत्ता

ठरविण्याची पद्धती आपल्याकडे रूढ झालेली आहे व दुर्दैवाने ती अधिकाधिक प्रभावी होत आहे. दर वर्षी दहावी-बारावी व पुढे महाविद्यालयीन परीक्षांचे जे निकाल जाहीर होतात, त्यात जास्तीत जास्त गुण प्राप्त करणारे गुणवत्ता यादीत येतात. त्यांचाच सर्वत्र गौरव होतो. गुणवत्तेची संकल्पनाही आपण संकुचित करून टाकली आहे.

अध्यापनपद्धतीच्या बाबतीतील प्रयोगांचे अशाच प्रकारचे निष्कर्ष क्रोपली या विचारवंताने आपल्या 'सर्जनशीलता' नावाच्या पुस्तकात नमूद केले आहेत. सर्जनशील परंतु अभ्यासात विशेष यशस्वी न होणाऱ्या विद्यार्थ्यांना नेहमीपेक्षा वेगळ्या सर्जनशील पद्धतीने शिकविण्याचा प्रयत्न जेव्हा करण्यात आला, तेव्हा त्या विद्यार्थ्यांनी अभ्यासात बरीच प्रगती करून दाखविली.

तात्पर्य हेच की, सर्जनशीलता व शैक्षणिक संपादन, शैक्षणिक प्रगती यांचा निश्चित संबंध आहे. सर्जनशील विद्यार्थी प्रगती करीत नाहीत, असे जरी आढळून आले; तरी त्याचा अर्थ त्यांच्यात ती क्षमता नसते, असे नाही. ठरावीक अभ्यासक्रम, ठरावीक ज्ञानाच्या ठरावीक पद्धतीने प्राप्ती व ठराविक साच्याच्या परीक्षेत त्याची केवळ पुनरावृत्ती पठडीत बसू शकत नसल्यामुळे ते अयशस्वी ठरतात. पण शैक्षणिक प्रगतीचा असा संकुचित अर्थ न घेता व्यापक अर्थ जर आपण स्वीकारला, तर सर्जनशीलता ही विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीला सहाय्यक ठरते, असे दिसून येईल.



सर्जनशीलता हा व्यक्तिमत्त्वाचा एक अंगभूत घटक आहे. संपूर्ण व समृद्ध मानवी जीवनाचा एक अनिवार्य भाग आहे. ज्ञान संपादन केले, विचारशक्तीचा वापर केला; म्हणजे माणूस म्हणून जीवन सफल झाले, असे म्हणता येणार नाही. व्यक्तिमत्त्वाचा परिपूर्ण विकास होण्यासाठी परिपूर्ण जीवन जगण्यासाठी सर्जनशीलतेची नितांत गरज आहे म्हणून प्रचलित शिक्षणपद्धतीत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याची आवश्यकता आहे; त्याशिवाय नवविचारवंत निर्माण होऊ शकणार नाहीत.

असे सर्जनशील व्यक्तिमत्त्व जोपासण्यासाठी शिक्षकही सर्जनशील हवेत. सर्जनशीलतेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन अनुकूल व विधायक हवा, तरच ते विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेची योग्य ती दखल घेऊन तिला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करतील. ते आपल्या अध्यापनातून, विविध कार्यक्रमांतून व विद्यार्थ्यांबरोबरच्या सुयोग्य संबंधांतून अनुकूल वातावरण निर्माण करू शकतात.

सर्जनशीलता-मापनासाठी डॉ. म. बा. कुंडले यांनी काही भाषिक कसोट्या संशोधनासाठी वापरल्या होत्या, त्या उदाहरणादाखल दिल्या आहेत.

**प्रकार १ : शब्दसंपदा व शब्दप्रवाहीत्व**

प्र. १) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

उदा. आई = माय, माता, मातृ, जननी

१) देव = ......... २) फूल = .............

३) सुवास = ......... ४) जंगल = .............

प्र. २) उपसर्ग लावून शब्द तयार करा.

सु - सुस्वभाव .............

नि - निराधार .............

ना - नापसंत .............

प्र. ३) पुढील शब्दांचे समानार्थी व त्या शब्दांच्या छटा उमटविणारे शब्द लिहा.

१) राग .......... २) मत्सर .............

३) दु:ख .......... ४) गर्व .............

**प्रकार २ : पुढील वाक्ये वेगवेगळ्या प्रकारांने लिहा.**

उदा. माधवला अतिशय आनंद झाला. माधवाच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

प्र. १ अ) आमचे वडील फारच रागीट आहेत.

ब) तो फारच सुंदर चित्र काढतो.

**प्रकार ३ : कल्पनारम्य लेखन**

एखादा विषय देऊन त्यावर १० ओळी लेखन करायला लावायचे. उदा.-उन्हाळा, गलिच्छ वस्ती, पाऊस इत्यादी.

प्रकार ४ : कथापूर्ती

(अपूर्ण कथा पूर्ण करावयास लावणे.)

प्रकार ५ : कथालेखन

(विषय देऊन कथा लिहावयास प्रवृत्त करणे)

प्रकार ६ : काव्यपूर्ती

(कवितेच्या अपुऱ्या ओळी पूर्ततेसाठी देणे.)

प्रकार ७ : संवादलेखन

(विषय सुचवून त्यावर संवादलेखन करायला लावणे.)

वरीलप्रमाणे कसोट्या वापरून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा विकास व मापन शिक्षकांना करता येईल आणि सर्जनशीलतेच्या विकासाचे दालन समृद्ध करता येईल.

''आकाशातून तारेही, तोडून आणता येतात,  
उंच तेवढे हात हवे,  
रोजच मग भेटीला येतील,  
क्षितीज नवे अन् गगन नवे!''

❐

## प्रकाशकाचे निवेदन

रजिस्ट्रेशन ऑफ न्यूज पेपर (सेंट्रल) रूल्स, १८५६, नियम (३) अनुसार ग्राममंगल शिक्षणवेध मासिकासंबंधी प्रतिवर्षी फेब्रुवारीनंतर प्रथम प्रकाशित होणाऱ्या अंकात करावयाचे निवेदन :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रकाशन स्थळ | : | मुंबई |
| २) | नियतकाल | : | मासिक |
| ३) | मुद्रक व प्रकाशकाचे नाव | : | अजित मंडलिक |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७ |
| ४) | मुद्रण स्थळ | : | मुंबई |
| ५) | संपादकाचे नाव | : | प्रा. रमेश पानसे |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | ज्ञानपाठशाळामंडळ, गंगापुरी, वाई, जि. सातारा. |
| ६) | मालकाचे नाव | : | ग्राममंगल |
| ७) | पत्ता | : | गांधी भवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड, पुणे ४११ ०३८ |

मी असे जाहीर करतो की वरील निवेदन माझ्या माहितीनुसार आणि समजुतीनुसार खरे आहे.  
अजित मंडलिक - मुद्रक-प्रकाशक

# वृत्तविश्व




## विश्ववृत्त

### भारतीय अभ्यासक्रम अतिमहत्त्वाकांक्षी असल्याचे UNESCO चे म्हणणे

भारतीय शाळांच्या अभ्यासक्रमांवर अतिशय तीव्र शब्दांत UNESCO ने टीका केली असून तो अवास्तव व अतिमहत्त्वाकांक्षी असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला अवघड होत असल्याचे नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालात (Education for All Global Monitoring Report) म्हटले आहे. व्हिएतनाम येथील शालेय अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमधील मूलभूत कौशल्ये वाढवत असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अक्षमतेवर विशेष लक्ष देऊन ती दूर करण्याचा प्रयत्न करतो. याउलट, भारतातील अभ्यासक्रमांतून विद्यार्थी शिकतात, त्यामुळे प्रगतीच्या गतीला खीळ घातली जाते. शिक्षणाच्या दीर्घ काळाचे गणित व गुणवत्ता यांमध्ये बरीच तफावत असल्याचे या अहवालात म्हटले आहे.

अगदी प्राथमिक शिक्षणापासूनच मुले जे शिकतात व जेवढे शिकतात, ते अर्थहीन असून त्यामध्ये मुलांची शाळागळती होत आहे. या शिक्षणामुळे प्रौढ निरक्षरतेचे प्रमाणही जगाच्या तुलनेत वाढले असून ते २८७ मिलियन इतके भयानक आहे. चौथीपर्यंत शिकूनही ९०% विद्यार्थी अशिक्षित आहेत, तर त्यापुढे पाचवी-सहावीपर्यंत शिकून ३०% विद्यार्थी निरक्षर आहेत. मुलांपेक्षा मुलींचे शिक्षण अधिक निराशाजनक असून दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थिनींचे तर त्याहीपेक्षा भयानक आहे. मध्य प्रदेश व उत्तर प्रदेश येथील पाचपैकी केवळ एकच विद्यार्थिनी प्राथमिक गणितातील उदाहरणे सोडवू शकते. स्थलांतरित विद्यार्थी हे शैक्षणिक गळतीचे मोठेच कारण असल्याचे या अहवालात म्हटले आहे. केरळसारख्या श्रीमंत राज्यात दरडोई ४२,४७० रु. इतका खर्च आहे, तर बिहारसारख्या गरीब राज्यात तो केवळ ६२०० रु. इतका, आहे. इजिप्त, भारत, फिलिपाइन्स या देशांमध्ये लोकशाही असूनदेखील शैक्षणिक व्यवस्थेकडे अक्षम्य दुर्लक्ष्य होत आहे, असे या अहवालात म्हटले आहे.

### नासा घेणार खासगी कंपन्यांची मदत

अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासा आता चंद्रावरील खनिजसंपत्तीचा शोध घेण्यासाठी चक्क खासगी कंपन्यांची मदत घेणार आहे. यापूर्वी नासाने हाच प्रयोग आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकावर मदत- सामग्री साठवण्यासाठी केला होता, तो बऱ्याच अंशी यशस्वी झाल्याने खासगी कंपन्या आता अंतराळ संशोधनातदेखील रुची घेऊ लागल्या आहेत. त्यामुळे नासाला भविष्यात अनेक अंतराळ मोहिमांसाठी निधी उपलब्ध होऊ शकेल. नासाच्या मागील अंतराळ मोहिमेत चंद्राच्या भूगर्भात मोठ्या प्रमाणात खनिजसंपत्ती दडली असल्याचे स्पष्ट झाले होते. त्याचा शोध घेण्यासाठी नासाचे संशोधक खासगी कंपन्यांची मदत घेण्यासाठी सरसावले आहेत. शिवाय बहुराष्ट्रीय कंपन्याही परग्रहावरील खनिजसंपत्तीच्या आमिषाने या संशोधनकार्यात सहभागी होण्यास तयार झाल्या आहेत. व्यावसायिक पातळीवर नासाच्या चांद्रमोहिमा सुरू झाल्या, तर

संशोधनाला अधिक गती येऊन चंद्राच्या भूगर्भात दडलेली मौल्यवान खनिजेही सहजगत्या सापडू शकतील. मंगळ ग्रहावर कायमस्वरूपी मानवी वस्ती वसवण्याकरीता नासाचे संशोधक प्रयत्न करत आहेत. यात खासगी कंपन्या सहभागी झाल्या; तर संशोधनाला आर्थिक पाठबळ मिळून त्याला आणखी गती मिळू शकेल, असा आशावाद संशोधकांच्या वर्तुळातून व्यक्त होतो आहे.

## राष्ट्रवृत्त

### गोमंतकातील पाठ्यपुस्तके आता द्वैभाषिक

प्राथमिक स्तरावर द्वैभाषिक पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्याचे आदेश मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री मनोहर पर्रिकर यांनी दिले आहेत. शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञांनी या धोरणाचे कौतुक करतानाच मात्र यासाठी उत्तम भाषाप्रभुत्व असलेले प्रशिक्षित शिक्षक नेमण्याची आवश्यकताही स्पष्ट केली आहे. पर्रिकर यांनी या योजनेची माहिती देताना सांगितले की, आता इंग्रजी माध्यमातील कोकणी, मराठी भाषेच्या पाठ्यपुस्तकांना इंग्रजी पाठ्यपुस्तकांचा केवळ संदर्भ देण्यासाठीच वापर होणार असून इंग्रजी भाषेत ते शिकवले जाणार नाहीत. काही तज्ज्ञांच्या मते, मुलांचे भाषिक कौशल्य वाढण्यासाठी या योजनेचा निश्चितपणे फायदा होईल. यामुळे शिक्षकांनादेखील भाषेची सखोलता समजेल. यासाठी कॅनडा येथील शैक्षणिक प्रयोग डोळ्यांसमोर ठेवल्याचे समजते.

### 'लोकशाहीची जोपासना शाळेपासूनच आवश्यक - उपराष्ट्रपतींचे वक्तव्य

जम्मू-काश्मीर येथील कटरा येथील माता वैष्णोदेवी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाच्या अध्यक्षस्थानी उपराष्ट्रपती हमीद अन्सारी यांची उपस्थिती होती. या प्रसंगी ते म्हणाले, ''लोकशाहीत शिक्षणाची भूमिका अतिशय महत्त्वाची असून, भारतासारख्या जात, वंश, भाषा,परंपरा, धर्म यांची विविधता असलेल्या देशात विशेषत: राष्ट्रीय बाण्याच्या शिक्षणाची आवश्यकता आहे.'' ते पुढे म्हणाले, ''भौगोलिक दृष्ट्या, सामाजिक-राजकीयदृष्ट्या विभिन्नता असलेल्या सुमारे १.२ बिलियन लोकसंख्या असलेल्या भारतासारख्या देशात खऱ्या अर्थाने लोकशाहीची जोपासना करणे हेच आपले लक्ष्य असले पाहिजे. हे लक्ष्य साधण्यासाठी 'शिक्षण' हेच प्रभावी माध्यम असल्याची माझी भावना आहे. म्हणून शाळांनीच या कामी पुढाकार घेऊन लोकशाहीचीह जोपासना केली पाहिजे.

''विज्ञान आणि तंत्रज्ञानात विद्यापीठातील उच्च तंत्रज्ञानाची वाढती आवड ही अभिमानाची बाब असून आता जीवनातील वेगवेगळ्या पातळींवरील संघर्षाला तोंड देण्याची क्षमता वाढवण्याचे काम शिक्षणाने केले पाहिजे,'' असेही ते म्हणाले.

## राज्यवृत्त

### ब्रिटिश मंडळ देणार इंग्रजी शिक्षणासाठी धडे

शिक्षकांनी इंग्रजीचे धडे एकत्रितपणे कसे द्यायचे याचे शिक्षण देणे मुंबई महानगरपालिकेने ब्रिटिश मंडळाबरोबर सुरू केले आहे. महानगरपालिकेचे आयुक्त सीताराम कुंटे यांनी याविषयी माहिती दिली. पुढील पाच वर्षांत महानगरपालिकेचे सुमारे ९६०० शिक्षक या योजनेचा लाभ घेतील. सन २०१३-१४ ते २०१७-१८ या काळात या शिक्षकांना वर्षातील २० दिवस असे दोन वर्षांत हे प्रशिक्षण पूर्ण करायचे आहे. या वर्षी २४०० शिक्षकांनी या प्रशिक्षणाला सुरुवात केली आहे. त्यापुढील वर्षामध्ये सेमी इंग्रजी माध्यमातील शिक्षकांसाठीही ब्रिटिश मंडळाच्या साह्याने प्रशिक्षण देण्याची योजना आहे. 'आत्तापर्यंत १७७ शाळांमध्ये हे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली असून त्याचा निकाल फारच समाधानकारक आहे. इंग्रजी माध्यमातून गणित व विज्ञान विषय शिकवणाऱ्या शाळांसाठी हा प्रकल्प उपयुक्त असून इतर विषय मात्र आम्ही मातृभाषेतूनच शिकवणार आहोत', असे कुंटे यांचे म्हणणे आहे.

# ग्राममंगल वार्ता

## ज्येष्ठ समाजसेवक सिंधुताई अंबिके सन्मानित

ज्येष्ठ समाजसेविका, बालशिक्षणतज्ज्ञ व पद्मश्री अनुताई वाघ यांच्या सहकारी शिक्षिका श्रीमती सिंधुताई अंबिके यांना त्यांच्या कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागाकडून 'आदिवासी सेवा सेवक पुरस्कार' देण्यात आला. हा कार्यक्रम १४ जानेवारी २०१४ रोजी नाशिक येथे संपन्न झाला. मान. राज्यपाल श्री. के. शंकरनारायणन यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. मानचिन्ह, शाल, श्रीफळ व रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांची ही उपस्थिती होती.

श्रीमती सिंधुताई यांनी आयुष्याची ५० वर्षे आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी कोसबाड येथे व्यतीत केली. मुलांचे सहज शिक्षण घडवणारी शेकडो गाणी त्यांनी लिहिली आहेत. ती गाणी त्यांनी मुलांना तर शिकवलीच, पण महाराष्ट्रातील हजारो शिक्षकांनाही शिकवली. मुलांना व शिक्षकांना शिकवण्याचा त्यांचा उत्साह वयाच्या ८४ व्या वर्षीही अबाधित आहे. सध्या त्यांचा मुक्काम ऐन्याच्या ग्राममंगलच्या केंद्रात आहे. त्यांच्या कार्याविषयी खूप अभिमान आणि आदर वाटतो, अशी ग्राममंगलच्या कार्यकर्त्यांची भावना आहे.

## स्नेहनगरीत प्रजासत्ताकदिन उत्साहात साजरा

'प्रजासत्ताकदिन' सर्वच शाळांमध्ये उत्साहाने साजरा होतो. विविध कार्यक्रम मुले सादर करतात. 'ऐना' या आदिवासी गावातील ग्राममंगलच्या छोट्या शाळेतही मुलांच्या उत्साहाला २६ जानेवारी रोजी उधाण आले होते. झेंडावंदनानंतर मुलांनी स्वत:साठीच्या छोट्या-छोट्या घोषणा जोरदार आवेशात म्हटल्या. ''आम्हा मुलांना भरपूर खेळू द्या, भरपूर हसू द्या, भरपूर काम करू द्या.'' अशा गमतीच्या घोषणा श्रीम. सिंधूताई अंबिके यांनी तयार केल्या होत्या. पाचवी-सहावीच्या मुलांनी लेझीम, डंबेल्स, घुंगुरकाठी वापरून तऱ्हेतऱ्हेचे आकार बनवत विविध व्यायामप्रकार सादर केले. त्यांच्या खेळाच्या शिक्षकाने - सुनीलदादाने या कार्यक्रमासाठी अत्यंत परिश्रमपूर्वक मुलांकडून सराव करवून घेतले होते. यात ताल, शिस्त आणि सहकार यांचा सुरेख मेळ घातला होता. बालवाडी ते चौथीच्या मुलांनीही शाळेत नियमित म्हटली जाणारी गाणी, नाटुकली सहजतेने सादर केली. सहावीच्या २० मुलांनी केवळ दोन दिवस आधी सांगूनही त्यांना येणाऱ्या प्रयोगांची छान तयारी केली. गमतीदार जादूसारखे वाटणारे सहा प्रयोग मुलांनी आपल्या मित्रांना, शिक्षक-कार्यकर्त्यांना पुन: पुन्हा करून दाखवले. यासाठी त्यांच्या लाडक्या आभाताईचे मार्गदर्शन लाभले होते. अंबरनाथहून मुलांच्या कार्यक्रमासाठी आलेल्या सुभेदार आजी-आजोबा व उषा लांडगे यांनी मुलांना खाऊ देऊन त्यांचे कौतुक केले.

नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठानातर्फे दिला जाणारा **'गोदा गौरव पुरस्कार' या वर्षी मा. रमेश पानसे** यांना त्यांच्या बालशिक्षण क्षेत्रातील अनमोल कार्याबद्धल जाहीर झाला आहे. हार्दिक अभिनंदन !

# पुस्तक परीक्षण




■
डॉ. विनायक गंधे

शिक्षणाचा सर्वांगीण विचार करणारे

## ‘सुसंस्कृत शिक्षण’

■■

सुसंस्कृतता आणि शिक्षण या गोष्टी वास्तविक एकच असावयास पाहिजेत; म्हणजे शिक्षणाबरोबर सुसंस्कृतता यायला हवी. पण आज प्रत्यक्षात काय दिसते? शिक्षित आणि सुशिक्षित यांत अंतर पडायला लागले आहे. माणसे शिक्षित असतात- अगदी उच्चशिक्षित असतात; पण ती सुसंस्कृत असतातच, असे नाही. आपली सामाजिक परिस्थितीही फारशी समाधानकारक नाही. एकीकडे माहितीचा प्रचंड स्फोट आणि झगमगाट, तर दुसरीकडे पूर्ण अंधार, ज्ञानापासून व मूलभूत गोष्टींपासून वंचित असलेले लोक. शिक्षणाच्या मूलभूत हक्कापासून तळागाळातील कितीतरी लोक वंचित राहिले आहेत. माणसाला मानवतावादी आणि सुसंस्कृत बनविणाऱ्या शिक्षणाची आज नितांत आवश्यकता आहे. सुसंस्कृतता हे शिक्षणाचे मूलभूत प्रयोजन आहे.

या सुसंस्कृत शिक्षणासंदर्भात वेळोवेळी केलेले लेखन असे मुग्धा देशपांडे यांच्या ‘सुसंस्कृत शिक्षण’ या पुस्तकाचे स्वरूप आहे. या लेखसंग्रहात एकूण अकरा लेख असून ते मूल्याधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारे आहेत. विविध वेळी आणि विविध नियतकालिकांतून हे लेख प्रसिद्ध झाले असले तरी ‘मूल्याधारित शिक्षण’ हे त्यांचे समान सूत्र आहे. लेखिकेचे हे शिक्षणविषयक लेखन वैचारिक स्वरूपाचे असले, तरी त्याला प्रत्यक्षातील अनुभवांची आणि कृतीची जोड आहे.

शिक्षणक्षेत्रात ‘सारेच दीप कसे मंदावले आता’ इतकी वाईट परिस्थिती नाही. या क्षेत्रात काही आशेचे किरण आहेत. तळागाळातील माणसांसाठी वंचितांसाठी, निराधार मुलांसाठी आणि स्त्रियांसाठी काम करणाऱ्या काही संस्था आहेत. या संस्थांना ऊर्जा आणि पाठबळ देणाऱ्या

काही ध्येयवादी व्यक्ती आहेत. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा हृद्य परिचय हाही या पुस्तकाचा महत्त्वाचा विशेष आहे.

'शिक्षणाचे मूलतत्त्व' या पुस्तकातील अखेरचा पण गाभाभूत लेख आहे. या पुस्तकातील लेखांचा हा तात्त्विक पाया आहे. लेखिकेला अनेक लेखांतून जे सांगायचे आहे, त्याचे हे तत्त्वचिंतनात्मक रूप म्हणायला हवे. बालशिक्षणाचा मूलभूत विचार करून शिक्षणक्षेत्रात नवनवीन प्रयोग करणारे प्रा. रमेश पानसे यांच्या चिंतनातून प्रकट झालेली शिक्षणाची मूलतत्त्वे लेखिकेने येथे सांगितली आहेत. 'मेंदूचा विकास आणि शिक्षण' हा पानसे यांच्या संशोधनाचा आणि अभ्यासाचा विषय. आपल्या शिक्षणविषयक विचारांना मूर्त रूप देण्यासाठी त्यांनी 'ग्राममंगल' ही संस्था स्थापन केली. प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ अनुताई वाघ यांच्याबरोबर आदिवासी मुलांसाठी काम करण्याची संधी त्यांना मिळाली. प्रा. पानसे यांना काही प्रश्न विचारून मुलाखतीच्या स्वरूपात त्यांचे शिक्षणविषयक चिंतन लेखिकेने प्रस्तुत लेखात सादर केले आहे.

''मुलाच्या शारीरिक विकासाच्या टप्प्याबरोबर त्याच्या बौद्धिक विकासाची क्षमता सुरू होते. मुलाच्या बौद्धिक आणि भाषिक आकलनाच्या तयारीत पाच-साडेपाच वर्षे जावी लागतात. त्यामुळे या वयाच्या आधी शिकविणे म्हणजे त्या मुलावरील अत्याचार होय.'' प्रा. पानसे यांनी सांगितलेला हा मूलभूत विचार आजच्या शिक्षणव्यवस्थेने आणि आपल्या मुलांना शिकविण्याची घाई करणाऱ्या पालकांनी आवर्जून लक्षात घ्यायला पाहिजे. 'शिक्षण आणि सामाजिकता' या संदर्भात प्रा. पानसे यांनी चिंतन केले आहे. त्यांच्या मते, शालेय शिक्षणापुरतेच शिक्षण मर्यादित करू नये. शिक्षण ही व्यापक संकल्पना आहे. घर, शालेय शिक्षण, परिसर या सर्वांनी शिक्षण परिपूर्ण होते. अशा शिक्षणाने संपूर्ण जीवनाची तयारी होते. परिपूर्ण शिक्षणासाठी घरं आणि शाळा बालकेंद्री असाव्यात, असे प्रा. पानसे म्हणतात. शास्त्रीय विकासातून तार्किकतेचा विकास झाला, ज्ञानविषयक विशिष्ट संकल्पना निर्माण झाली; पुढे ज्ञानप्रक्रियेसाठी शालेय व्यवस्था निर्माण झाली व त्यानंतर ज्ञानाचे विशेषीकरण झाले, असा यातील क्रम प्रा. पानसे यांनी सांगितला आहे. या शिक्षणव्यवस्थेतून स्वतंत्र विचारशक्ती व विवेकशक्ती निर्माण होत नाही. आजच्या प्रचलित शिक्षणव्यवस्थेतील एक महत्त्वाची उणीव प्रा. पानसे यांना वाटते; ती म्हणजे, शिक्षणाच्या बाबतीत लोकशाही यंत्रणा नाही. 'कॉमन स्कूल'ची संकल्पना हा प्रा. पानसे यांना यावरचा उपाय वाटतो.

प्रा. पानसे यांचे शिक्षणविषयक हे मौलिक विचार शिक्षकांना तसेच सुजाण पालकांनाही उद्बोधक आहेत. शिक्षणव्यवस्थेविषयी नव्याने विचार करायला लावणारे आहेत.

या संग्रहातील इतरही काही लेख ग्रामीण भागातील उपेक्षित आणि वंचित समाजातील शिक्षणाचे दाहक वास्तव स्पष्ट करणारे आहेत. या विचारमंथनाला लेखिकेच्या प्रत्यक्ष अनुभवाचा आधार आहे. आजची मुले पिंजऱ्यातले पोपट कसे आहेत, हे लेखिकेने रवींद्रनाथ टागोरांच्या गोष्टीच्या आधारे मार्मिकपणे सांगितले आहे. लेखिकेची नोंद वास्तवाचे दाहक रूप स्पष्ट करणारी आहे. ''तळागाळातील शिक्षण गेलंय, शैक्षणिक साधने गेली आहेत; पण यातून कष्ट न करता लाचारीचे किंवा फुकट मिळविलेल्या मुजोरीपणाचं शिक्षण वर्तमान सामाजिक स्थितीत नकळत मिळतंय.'' या गोष्टीची लेखिकेची मीमांसा अशी की, शिक्षकांना शिक्षणबाह्य कामे लावली जातात. भारतात नऊशे विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक असे प्रमाण आहे. त्यामुळे शिक्षकांना नवे प्रयोग करायला अवसर मिळत नाही. शाळांच्या स्वरूपामध्येही विसंगती आहे. दारिद्र्यरेषेखालील आणि दारिद्र्यरेषेवरील शाळा यांत मोठा विरोध आहे. शिक्षणात समानतेचे तत्त्व नाही आणि शिक्षणाचे आजचे ध्येयही देशी-परदेशी बाबू घडविणे, हे आहे.

'झगमगाट महासत्तेचा' या लेखात देशपांडे यांनी आपले अनुभव आणि आपण केलेले प्रयोग मांडले आहेत. त्यांनी साताऱ्याला मुलांचे तीन स्तर करून त्यांना शिकविण्याचा प्रयोग केला. पुणे येथे झोपडपट्टीतील मुलांना शिकविण्याचे काम केले. पुण्यासारख्या महानगरातील तळागाळातील मुलांची वाईट स्थिती त्यांनी अनुभवली. एकीकडे गडगंज संपत्तीची

उधळमाधळ, तर दुसरीकडे कुपोषण आणि अनारोग्य यांचा अनुभव घेतला. विविध ठिकाणी शिबिरे घेतली. कला आणि खेळ यांच्या माध्यमातून काही शिक्षणविषयक प्रयोग केले. 'स्वते सृष्टी' या संकल्पनेवर आधारित शैक्षणिक शिबिरे घेतली. लेखिकेने या संदर्भातील शोधग्राम आणि आनंदवन येथील आपले अनुभव सांगितले आहेत. नयी तालीम, शांतिनिकेतन, नालंदा विद्यापीठ अशा मानवहितवादी शिक्षणप्रणालींचा अभ्यास व्हावा, असे लेखिकेला वाटते.

'हिरवी भिंत आणि जागतिकीकरणाची सुनामी' या लेखात लेखिकेने शोधग्राम आणि गडचिरोली येथील आपली दैनंदिनी सादर केली आहे. 'शोधग्राम'मध्ये आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोन आणि निष्काम कर्मयोग आणि समाजाच्या विकासाचा विचार यांचा संस्कार घडतो, असे लेखिकेला वाटते.

'स्कूल चले हम भी' या लेखात लेखिकेने ज्या संस्था, शाळा आणि शिक्षक मुलांना त्यांचं स्वत्व जाणवून देण्यासाठी प्रयत्न करतात; त्यांचा शोध घेतला आहे. 'जिन्हे नाज है हिंद पर वो कहाँ है?' या लेखात लेखिकेने मानव्य संस्थेतील वेश्यांच्या मुलांच्या निरागस भावविश्वाचे चित्रण केले आहे. विजया लवाटे यांनी ही संस्था सुरू केली. या संस्थेत परित्यक्ता, विधवा, कुमारी माता, परिस्थितीनं फसलेल्या, दुष्टचक्रात अडकलेल्या स्त्रियांच्या पुनर्वसनाचे काम केले जाते. 'इंद्रधनुष्य' या लेखात त्यांनी शोधग्रामच्या बाल-शिबिरातील काही अनुभव मांडले आहेत. युवक-युवतींना लैंगिक शिक्षण देण्याची खूप गरज आहे, हे लक्षात आल्यावर लेखिकेने केवळ युवक-युवतींसाठीच नाही तर शिक्षकांसाठीही लैंगिक शिक्षणावर शिबिरे घेतली.

प्रस्तुत पुस्तकातील काही लेख सुसंस्कृत शिक्षण देणाऱ्या काही संस्थांच्या आणि त्यांच्या प्रमुखांच्या कार्यांचे विवेचन करणारे आहेत. 'वनस्थळी'च्या निर्मलाताई पुरंदरे, 'स्नेहप्रकाश' च्या अनुताई भागवत, 'मुक्तांगण'चे डॉ. अनिल अवचट हे सर्व क्रियावान पंडित आहेत. यांच्या कार्याचा आणि त्यांच्या संस्थांचा परिचय लेखिकेने करून दिला आहे. 'वनस्थळी' ही उपेक्षित आणि अल्पशिक्षित स्त्रीला आत्मनिर्भर बनविणारी एक समर्थ संस्था. बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण हा त्यांचा मोठा प्रकल्प. त्यायोगे अनुताई भागवतांनी समाजातील दुर्लक्षित आणि वंचित गटाला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले. त्यांनी अपंगांना समर्थ केलेच, त्याचबरोबर अपंगांविषयी समाजाची संवेदना जागृत केली.

डॉ. अनिल अवचटांच्या 'मुक्तांगण' या व्यसनमुक्ती केंद्राचे कार्यही लेखिकेने नेमकेपणाने सांगितले आहे. अनिता अवचटांनी रुग्णांचं कौटुंबिक आणि सामाजिक पुनर्वसन करण्याचे फार मोठे काम केले. अनिल अवचटांसारख्या हरहुन्नरी आणि संवेदनशील विचारवंतांची त्यांना जोड मिळाली. मुक्तांगणच्या व्यसनमुक्ती उपचारपद्धतीला जगभरातून मान्यता मिळाली आहे. यातून संस्थेच्या कार्याची मौलिकता जाणवते. या उपचारपद्धतीचा विशेष लेखिकेने सांगितला आहे की- या उपचारपद्धतीत व्यक्तिगत, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक अडचणी व दु:खं समजून घेऊन रुग्णातील आत्मविश्वास व सकारात्मक दृष्टिकोन जागृत केला जातो आणि यातून व्यक्तिमत्त्वविकास साधला जातो.

शाश्वत शेती जगणाऱ्या फुटाणे दांपत्याच्या कार्याचा लेखिकेने करून दिलेला परिचय उद्‌बोधक आहेच, पण रोचकही आहे. या फुटाणे दांपत्याने बरड जमीन सुजलाम्-सुफलाम् केली. 'माती अडवा, पाणी जिरवा' हे तंत्र प्रत्यक्षात आणले. त्यांनी केवळ शाश्वत शेती केली नाही, तर शेतीजीवन शाळा सुरू करून अनेक कार्यकर्ते तयार केले.

असा हा शिक्षणविषयक अकरा लेखांचा छोटेखानी संग्रह. तो जसा वाचनीय आहे तसा उद्‌बोधकही आहे. मुग्धा देशपांडे यांनी अत्यंत लालित्यपूर्ण भाषेत आपले विविध अनुभव चित्रित केले आहेत. रेखीव व्यक्तिचित्रे, उत्कट प्रसंग आणि वैविध्यपूर्ण निसर्गवर्णने यामुळे या लेखांची रोचकता वाढली आहे. सुजाण वाचकांना ते रमणीय वाटतीलच, पण अंतर्मुखही करतील आणि शिक्षणव्यवस्थेबद्दल अधिक आस्थेने विचार करायला लावतील.

---

**सुसंस्कृत शिक्षण, मुग्धा देशपांडे,**
**डायमंड पब्लिकेशन्स**

# लहान मुलांच्या पालकांसाठी

■

भाग्यश्री चौथाई



# संवादाचा सेतू

■■

मैत्रेयी वय वर्षे साडेतीन. एका मॉलमध्ये नव्या बाहुलीसाठी हट्ट करीत होती. तिची आई तिला कडेवर घेऊन काही तरी छान समजावत होती. लांबून ते दृश्य बघणाऱ्यांना काय बोलणे चालले आहे, हे कळत नव्हते. पण दोघींमध्ये संवादाची देवाण-घेवाण होत होती, हे अगदी नक्की. थोड्या वेळातच मैत्रेयी कडेवरून हसत-हसत उतरली व आईचे बोट धरून चालू लागली.

खरे तर ही लढाई जिंकली होती आईने, पण विजयाचा आनंद ओसंडून वाहत होता मैत्रेयीच्या चेहऱ्यावरून.

काय बोलली असेल मैत्रेयीची आई? लहानग्या मैत्रेयीला समजावून सांगताना कोणत्या शब्दांचा आधार आईने घेतला असेल? लहानग्या मैत्रेयीलादेखील काय उमजले असेल? तिची आई कोठे शिकली असेल हे संवादकौशल्य ?

संवाद ही मानवाची एक मूलभूत गरज आहे आणि लहान मुलांशी संवाद साधणे ही एक कला आहे, हे अगदी खरे.

घरामध्ये पालक व मूल दोहोंमध्ये संवाद हवा, असे म्हटले जाते. मुलांशी संवाद साधावा; पण कसा असतो हा संवाद? वरील उदाहरणादाखल मैत्रेयी व तिच्या आईमधील दिलेल्या संवादाप्रमाणे असतो का हा संवाद ?

आपल्या मुलाला समजेल, पटेल, उमजेल अशा सहजसोप्या शब्दांत साधायला हवा संवाद. तोही अगदी लहानपणापासूनच. ''अजून लहान आहे, त्याला काय कळतंय? हेच वय असते हट्ट करण्याचे... किंवा थोडा मोठ्ठा झाल्यावर बघू.'' असे नाही, हे लक्षात घ्या.

आता संवाद म्हटला की, देवाण-घेवाण आलीच. आपण मुलाला समजावून सांगताना त्याचे बोलणे शांतपणे ऐकून घेणे ही प्राथमिक पायरी. आपले म्हणणे आई ऐकून घेते आहे ह्याची जाणीव मुलाला झाली पाहिजे, हेदेखील महत्त्वाचे आहे. अगदी लहान मुलालादेखील आत्मसन्मान असतो. ती एक स्वतंत्र व्यक्ती असते, त्याला स्वत:ची मते व विचार असतात. त्यामुळे त्यांना निर्णयप्रक्रियेत नेहमी सामील करून घ्या.

''चला, आता आपण काय करू या? आज गोष्टीचे कोणते पुस्तक वाचू या? कोणता खेळ खेळायचा? मी आज जेवणात काय बनवू तुझ्या आवडीचे?'' अशा

दैनंदिन जीवनातील वर-वर साध्या वाटणाऱ्या विषयांमध्ये मुलांचा निर्णय विचारला तर संवाद घडतो. त्यांचे संवादकौशल्य वाढीस लागते.

घरात आपण तितकेच महत्त्वाचे आहोत, हा स्वाभिमान चांगल्या रीतीने मुलामध्ये वाढीस लागतो आणि त्याच्या एकंदर व्यक्तिमत्त्वविकासासाठी हा स्वाभिमान, आत्मविश्वास उपयोगी पडतो.

मग मोठेपणी मुलाला शिक्षण, नोकरी, करिअर, लग्न ह्या महत्त्वाच्या टप्प्यांवर लहानपणापासूनची ही पायाभरणी उपयोगी पडते.

याउलट, 'माझेच खरे' हा आग्रह पालकांनी धरला आणि ''तू अजून लहान आहेस, तुला काय कळतंय? काही नको नाक खुपसायला! आम्ही सांगितलेले फक्त ऐक. आम्ही हे सर्व तुझ्या भल्यासाठीच करतोय.'' असा संवाद- अर्थात एकतर्फी- घरामध्ये सतत घडत असेल, तर मग मूल मोठे झाल्यावर पालक व मुलात वारंवार खटके उडू लागतात. मग घरात विसंवादाचा सूर उमटू लागतो. मुलाचा हट्ट किंवा वर्तणूक ही अगदी एखाद्या रबरासारखी असते. जितका ताण द्याल तितकी ताणली जाते, तुटत किंवा संपत नाही. आणि एक गोष्ट अगदी खरी- हे किती ताणायचे ह्याचे ज्ञान मुलांना उपजतच असते.

पालकत्वाची कसोटी इथेच लागते. आपले संवादकौशल्य पणाला लावून सर्व परिस्थिती हाताळायची असते. घरामध्ये आई, बाबा व इतर लोक एकमेकांशी कसा संवाद साधतात, फोनवर कसे बोलतात...

घरात आलेल्या पाहुण्यांशी कसा संवाद साधतात- हे सर्व बघून, ऐकून लहान मुलांचे संवादकौशल्य विकसित होत असते. पालक म्हणून आपणच त्याच्यासमोर आदर्श असतो. त्रागा, आदळआपट, आरडाओरडा, उच्च स्वर लावला की आपल्याला हवे ते मिळते; किंबहुना, जे पाहिजे त्यासाठी हे असेच करायचे असते ह्याचे बाळकडू त्याला घरातून मिळते.

त्यामुळे अर्थातच, पालक म्हणून आपली जबाबदारी वाढते. एकमेकांमधील विश्वासपूर्वक, प्रेमळ, आधार वाटणाऱ्या संवादामुळेच प्रेम, माया, आपुलकी वाढीस लागते.

अर्थात ही काही जादूची कांडी नाही; अगदी लहानपणापासून निरंतर चालणारी सुंदर प्रक्रिया आहे. संवादाचा सेतू हा अगदी प्रयत्नपूर्वक आपण बांधू या. ❐

## पुढील अंकात ...

❖ महाराष्ट्र बाल शिक्षण परिषदेच्या वेगवेगळ्या शाखांतर्फे सादर केल्या गेलेल्या उपक्रमांविषयी सविस्तर वृत्तान्त

❖ निरोगी शाळा कशा निर्माण होतील, शालेय आरोग्य कसे सुधारावे यावर प्रा. रमेश पानसे यांचा अनुभवधिष्ठित लेख.

❖ याशिवाय बरेच काही...

**अवश्य वाचा, एप्रिल २०१४** **शिक्षणवेध**

## पथनाट्य

■

जयश्री घाटगे

# आम्हांलाही शिकायचं आहे

**कोणताही विचार ललित लेखनातून परिणामकारकरीत्या मांडला जाऊ शकतो. विचार व कलात्मकता या दोन्हींचा समतोल त्यामधून साधलेला असतो. बालशिक्षणावरील नाटिका वाचताना याचा प्रत्यय येतो. मादाम मॉन्टेसोरी, ताराबाई मोडक यांचे बालशिक्षणातील विचार मांडणारी ही नाटिका...**

**मा**दाम मॉन्टेसोरी पेशाने डॉक्टर असल्याने त्या काळी त्यांना गृहभेटी कराव्या लागत. अशा गृहभेटी करतेवेळी मागासलेल्या वस्ती, कामगारांची मुले, मतिमंद मुले, अंध मुले, मूक-बधिर मुले त्यांना आढळून आली. त्यांच्या विकासासाठी मॉन्टेसोरी बाईंनी प्रयत्न करायचे ठरविले. मतिमंदत्व हा आजार किंवा मानसिक आजार नसून ही मुले बुद्ध्यांक कमी असलेली असतात, हे त्यांच्या संशोधनातून सिद्ध झाले. त्यांना साधारण मुलांच्या सान्निध्यात घातले की, त्यांचा विकास चांगला होतो, हे त्यांनी सिद्ध केले. तसेच कामगारांची मुले, अंध मुले किंवा अल्प दृष्टिहीन मुले, मूक-बधिर - म्हणजेच कोणत्याही प्रकारचे अपंगत्व असलेल्या मुलांना साधारण मुलांच्यात शिक्षण मिळावे, हे त्यांचे स्वप्नं आता साकार होताना दिसत आहे.

तसेच मा. ताराबाई मोडक यांचे हसत-खेळत शिक्षण, स्वानुभवातून मिळणारे शिक्षण व परिसरातून शिक्षण मुलांना मिळावे यासाठी असलेली धडपड याचे महत्त्व आता समाजाला पटू लागले आहे. बालशिक्षणाच्या या दोन्ही रचेत्या, प्रणेत्यांना शतश: प्रणाम.

शिक्षणाचा प्रसार सर्व स्तरावर व्हावा. मुलींनाही शिकता यावे - विशेष गरजा असलेल्या मुलांनाही साधारण मुलांच्या शाळेत शिकण्याची संधी मिळावी - या हेतूने आम्ही ही नाटिका सादर करीत आहोत. ‘सर्वांगीण शिक्षण’ हाच या नाटिकेचा हेतू आहे. चला तर पाहू या -

 

## ‘आम्हांलाही शिकायचे आहे’

**प्रसंग - १**

(दृश्य- शाळेत प्रवेश - मुख्याध्यापकांचे ऑफीस - पालक)

पालक : नमस्कार मॅडम, आत येऊ का?

मुख्याध्यापक : नमस्कार, या. बोला, कोणाला प्रवेश घ्यायचा आहे?

पालक : मॅडम, माझा मुलगा मतिमंद आहे. त्याला तुमच्या शाळेत प्रवेश मिळेल का?

मुख्याध्यापक : अहो, आमची शाळा ही साधारण मुलांची आहे. अशी मुलं आमच्या शाळेत घेत नाही. त्यांच्यासाठी विशेष शाळा आहेत; तिथे जा.

पालक : अहो, डॉक्टरांचे म्हणणे आहे की, हा ठार मतिमंद नाही. त्याला साधारण मुलांच्यात ठेवले की, त्याचा विकास होईल. त्यासाठी तुमच्याकडे आले आहे.

मुख्याध्यापक : नाही हो, प्रवेश मिळणार नाही. शिपाई, पुढच्या पालकांना पाठवा बघू.

पालक २ : मॅडम, माझी मुलगी अंध आहे. तिला प्रवेश मिळेल का?

मुख्याध्यापक : अंध? अहो, ही अंधांची शाळा नाही, साधारण मुलांची शाळा आहे.

पालक २ : अहो, म्हणजे तिला सगळं समजतं, हो. ऐकायला येतं, बोलायला येतं.

मुख्याध्यापक : नाही- नाही, प्रवेश दिला जाणार नाही. शिपाई, पुढे कोण आहे, पाठवा बरं.

पालक ३ : मॅडम, मी धुणं-भांड्यांची कामं करते. मुलांना प्रवेश घ्यायचा आहे.

मुख्याध्यापक : आमची फी तुम्हाला परवडणार नाही. त्यांना सरकारी शाळेत प्रवेश घ्या.

पालक ३ : अहो, पण चांगल्या शाळेत घालायची इच्छा आहे हो. फी माफ होणार नाही का?

मुख्याध्यापक : नाही, नाही........ शिपाई.... पुढे कोण आहे, पाठवा बघू.

पालक ४ : मॅडम, माझा मुलगा तोतरा बोलतो. त्याला तुमच्या शाळेत प्रवेश मिळेल का?

मुख्याध्यापक : अहो, तोतरं बोलतो ! कसं शक्य आहे? अवघड शब्द कसे बोलेल

तो? कविता पाठ कशा करेल? नाही जमणार. शिपाई...

पालक ५ : नमस्कार मॅडम! माझ्या मुलाची बुद्धी कमी आहे. त्याला ना, लवकर लक्षात येत नाही. काय करणार? एकुलता एक पोरगा हाय माझा. घ्याल का तुमच्या शाळेत?

मुख्याध्यापक : अहो, आमच्या शाळेच्या नावाचा प्रश्न आहे. आमच्या शाळेत आम्ही फक्त हुशार मुले घेतो. अशी मुलं शिकवत बसलो तर शाळेची गुणवत्ता कशी वाढेल? नाही, नाही- जमणार नाही. तुम्ही जाऊ शकता.

(सर्व मुलांचे पालक चिडतात आणि मुख्याध्यापकांशी भांडू लागतात.)

सर्व पालक : आमच्या मुलांनी कोणत्या शाळेत जायचं? आम्हांला प्रवेश मिळालाच पाहिजे. (हट्ट धरतात.)

मुख्याध्यापक : नाही, नाही-- प्रवेश मिळणार नाही. आम्ही काही धर्मशाळा काढली नाही. शाळेत अशी मुले घेतली जाणार नाहीत. नाही होणार, जा बघू... (शेवटी वैतागून) शिपाईऽ शिपाईऽऽ बाहेर काढा बघू यांना.

(पालकांपुढे मोठा प्रश्न पडला आहे. आपापसांत चर्चा करू लागतात. आता आपण जायचं कुठं, मुलांना शिक्षण मिळणार कसे, मुले आपली शिकतील कशी... त्यांची ही चर्चा जवळून जाणाऱ्या एका शाळेतील शिक्षिका ऐकतात व त्यांना दिलासा देतात.)

शिक्षिका : का हो, काय झालं? असे घाबरून जाऊ नका. तुमच्या सगळ्यांचं बोलणं आम्ही ऐकलं आहे. काळजी करू नका. अशाही काही शाळा आहेत, जिथे तुमचे सर्व प्रश्न सुटतील. अशा शाळांमध्ये विशेष गरजा असलेली मुले गेल्या अनेक वर्षांपासून शिकत आहेत. मुलांचा तिथे सर्वांगीण विकास करून घेतला जातोच, पण ताणविरहित हसत-खेळत शिक्षण दिले जाते. कोणत्याही मुलांच्या मध्ये भेदभाव केला जात नाही.

पालक : खरंच, मिळेल आमच्या मुलांना अशा शाळांमध्ये प्रवेश ? खूप उपकार होतील हो.

शिक्षिका : चला आमच्या बरोबर.

**प्रसंग २**

(दृश्य - शाळा मुख्याध्यापकांचे ऑफीस)

शिक्षिका : आत येऊ का?

मुख्याध्यापक : या, या.

शिक्षिका : मॅडम, आपल्याकडे विशेष गरजा असलेल्या मुलांचे पालक आले आहेत. त्यांच्या मुलांना प्रवेश घ्यायचा आहे. आम्ही त्यांना आपल्या शाळेची माहिती सांगितली आहे. बोलवू का त्यांना?

मुख्याध्यापक : हो, हो- बोलवा त्यांना.

(पालक आपले म्हणणे मुख्याध्यापकांकडे मांडतात. मुख्याध्यापक त्यांना दिलासा देतात.)

मुख्याध्यापक : अहो, मतिमंद मुलांना आम्ही त्यांच्यासाठी विशेष प्रशिक्षण घेतलेले शिक्षक नेमले आहेत. तसेच, अंध मुले असली तरी त्यांना ऐकायला व बोलायला येते, मूकबधिर मुले असली तरी त्यांना

दिसते, समजते, तोतरी मुले असली तरी सरावाने त्यांच्यामध्ये फरक पडू शकतो. त्यांना स्पीच थेरपी दिली जाते, गतिमंद मुलांचा सरावाने विकास होऊ शकतो. त्यासाठी इतकं घाबरून जायचं कारण नाही. काळजी करू नका. आमच्या शाळेत याची सर्व सोय आहे. तुम्ही त्यांचे फॉर्म भरून प्रवेश घ्या बघू. मॅडम, यांच्याकडून फॉर्म भरून घ्या.

**प्रसंग ३**

(दृश्य - कामगारांची मुले - (वयानुरूप मुले) घरीच बसून आपल्या भावंडांना सांभाळतात, कोणी आईबरोबर बांधकामावर मदत करताना शिक्षकांना आढळतात.)

शिक्षिका : अगं, तू शाळेत जात नाहीस?

मुलगी : नाही.

शिक्षिका : तुम्हाला शाळेत जावंसं वाटतं की नाही?

मुलगी : हो, आवडतं ना.

शिक्षिका : मग का जात नाही?

मुलगी : माझ्या भावाला आणि बहिणीला सांभाळायला कोणीच नाही. आई कामावर जाती, मग त्यांना कोण बगणार?

शिक्षिका : तुझ्या आईला भेटून तिला पाठवायला सांगतो; मग तर याल ना? कधी भेटेल तुमची आई?

मुले : हो- हो, संध्याकाळी येईल.

शिक्षिका : मग आम्ही संध्याकाळी येऊ. (संध्याकाळी आईला भेटायला शिक्षिका जातात.)

मुले : आईऽ आईऽऽ कोण आलंय बघ- ए मम्मीऽ कोन आया देख-

आई : कोण हाय?

शिक्षिका : आम्ही शिक्षिका आहोत. तुमच्या मुलांना शाळेत शिकायची इच्छा आहे. त्यांना शाळेत पाठवा.

आई : नाय- नाय, जमणार नाय. आवं, ही पोरं शाळेत गेली तर आम्ही खायचं काय? लहान लेकरांना सांभाळणार कोण? आन् घरातली कामं कोण करणार?

शिक्षिका : अहो, या लहान मुलांनाही शाळेत घाला. त्यांच्यासाठीपण शाळा आहे. तुमच्या मोठ्या मुलीबरोबर ते बसतील. इथं घरात सांभाळण्या-ऐवजी शाळेत शिकतील पण आणि त्यांना सांभाळतील पण. लहान मुलांना कामावर ठेवणं कायद्यानं गुन्हा आहे.

आई : आवं, ठाय हाय मला... पण काय करणार पोटासाठी करावं लागतं. आन् शिकून काय करणार? भाकरी करावीच लागतीया ना!

आई, २ : (तिथं येते) आप जो बोलती है वो तो ठीक है। लेकिन क्या पढाई करके किसका भला हुआ है?

आई, १ : आवं, फी कशी भरणार? आमाला जमणार नाही.

शिक्षिका : अहो, अशा मुलांसाठी मोफत शिक्षण आहे. आता सर्व शिक्षा अभियानाद्वारे समान हक्क, सर्वांना शिकण्याची संधी सरकारने दिली आहे. तेव्हा त्यांना गणवेश व पुस्तके शाळाच देणार आहे. तुम्हाला फक्त मुलांना शाळेत पाठवायचं काम आहे.

तुमची पण काळजी मिटेल.

आई २ : ए बाई, क्या बोलती तू? सभी लोग पहले पहले ऐसाच बोलते- मोफत है, मोफत है करके; बाद में पैसा देने को बोलते ।

शिक्षिका : नाही हो, खरंच त्यांना मोफत शिक्षण दिले जाणार आहे.

आई, २ : ठीक है, फिर मैं भेजती मेरे बच्चोंको. ए सरला, तू भी भेज बच्चोंको.

आई, १ : बरं बरं- ठीक हाय. आमाला शिकायला मिळालं नाय तर पोरी तरी शिकतील. पाठवतोय उद्यापासून.

शिक्षिका : हे घ्या गणवेश आणि पुस्तकं. उद्या मी येते तुम्हाला न्यायला.

**प्रसंग ४**

(दृश्य - शाळेतील प्रसंग : शिक्षिका मुलांना शिकवताना - मुले आनंदाने शिकत आहेत.)

**प्रसंग ५**

(दृश्य - अंध मुलाचा इलाज)

पालक : मॅडम, तुम्ही मागे म्हणाला होता, माझ्या मुलीचे डोळ्याचे ऑपरेशन केले तर तिला दिसेल.

शिक्षिका : हो-हो, सर्व शिक्षा अभियानातर्फे मोफत ऑपरेशन करून दृष्टी येते. चला ,आपण त्यांच्याकडे जाऊ.

(सर्व शिक्षा अभियानाचे ऑफिस - डॉक्टर)

शिक्षिका : मॅडम, तुमच्याशी फोनवर बोलणे झाले, त्याप्रमाणे मुलीला घेऊन आलो.

पाकल : नमस्कार डॉक्टर! माझ्या मुलीला दृष्टी मिळू शकेल का?

(डॉक्टर डोळे तपासतात)

डॉक्टर : हो, हो, मी चिठ्ठी देते. तिथे जाऊन ऑपरेशन करून घ्या.

(काही दिवसांनंतर - ऑपरेशननंतर - मंजूला दृष्टी आली आणि तिचा आनंद गगनात मावेनासा झाला. शिक्षणाचा समान हक्क सर्वत्र पसरलेला दिसू लागला.

मुलांना वयानुरूप शिक्षण मिळाले, सर्व मुलांना शिक्षणाचा समान हक्क मिळाला. सगळीकडे आनंदीआनंद दिसू लागला. मुले आनंदाने बागडू लागतात.

**प्रसंग ६**

(मादाम मॉन्टेसोरी व ताराबाई मोडक स्वर्गातून हे सर्व पाहत आहेत. मादाम मॉंटेसोरी म्हणतात -

ताराबाई, माझे स्वप्न आज साकार होताना दिसत आहे. समाजाला आज माझी तत्त्वे व माझे विचार पटू लागलेले दिसत आहे. सर्वांना शिक्षणाचा समान हक्क मिळालेला पाहून तर मी धन्य-धन्य झाले. तुम्हालाही तुमचे स्वप्नं साकार झाल्यासारखे वाटत असेल; नाही?)

ताराबाई : हो-हो ! बालशिक्षण हे बालकांचा सर्वांगीण विकास करणारे शिक्षण आहे. असे ताणविरहित हसत-खेळत, शिक्षण आज सर्वत्र प्रसारित झालेले पाहून मलाही खरंच धन्य वाटत आहे. आपणच लावलेल्या शिक्षणाच्या रोपाचा वटवृक्ष झालेला पाहून आपण खरंच धन्य झालोत. ❐

**ताराबाईंच्या बालक-पालक-शिक्षक यांच्यासाठी लिहिलेल्या लेखनाचे जे वाचक आहेत त्यांना, हे वेगळ्याच धर्तीचे लेखन खूप आवडेल याची खात्री वाटते.**

**प्रा. रमेश पानसे**




प्रकाशन : **ग्राममंगल**

संपर्क : ०२०-२५३८६६८७

पृष्ठसंख्या : १३२

मूल्य : शंभर रुपये



# शंका-समाधान

## गंपूदादा

**माझी मुलगी दोन वर्षे वयाची आहे. ती झोपताना मंगळसूत्र धरून झोपते, अन्यथा झोपतच नाही. मंगळसूत्र काढून घेतल्यास लगेच जागी होते. काय करावे?**

मुलं नेहमीच सुरक्षित वातावरण शोधत असतात. त्यांना स्पर्शज्ञान सर्वांत आधी कळते. त्यामुळे आपली आई-बाबा-आजी-आजोबा या सगळ्यांचा स्पर्श छान कळतो. त्यातही एक खास गोष्ट ते स्पर्शाच्या माध्यमातून ठरवतात. माझ्या पाहण्यात मुलं... कान पकडून झोपतात. हाताच्या कोपराशी खेळत झोपते! एक मूल तर डोळ्याच्या पापणीला वा भुवईला स्पर्श करत झोपतात...'' स्तनपानानंतर म्हणजे दूध सुटल्यानंतरची संक्रमण अवस्था असते, त्यात ३ ते ३॥ या वर्षांच्या बाळापर्यंत ह्या सवयी दिसतात; त्यात वेगळं काही पाहण्याची गरज नाही.

या सगळ्या स्पर्शाच्या माध्यमातून मूल 'मी सुरक्षित, योग्य व्यक्तीकडे, आहे ना?' इतकंच पाहत असतं. म्हणून मुलांची ही सवय प्रेमाने समजावून हळूहळू सोडवावी, किंबहुना ती आपोआप जातेच. आपलं मूल कोणत्याही प्रकारे असुरक्षित राहू नये म्हणून आपणा सर्वांना काही एक परिश्रम होणार आहेत, अडचणींना सामोरं जावंच लागणार आहे. कारण अडचणी-समस्या थोड्या आहेत. बाकी पालक ही भूमिका आनंददायी आणि समाधान देणारीच आहे.

**माझी मुलगी इयत्ता नववीत आहे. आत्तापर्यंत तिचा काहीच प्रश्न नव्हता, परंतु काही दिवसांपासून ती सारखी आजारी पडत आहे. अभ्यासात, खेळात उत्तम असलेली माझी मुलगी सध्या सर्वांत मागे पडत आहे. डॉक्टरांच्या सल्ल्याने सगळ्या चाचण्या करून घेतल्या, परंतु सर्व रिपोर्ट्स नॉर्मल आलेत. डॉक्टरांनी मानसतज्ज्ञांचा सल्ला घेण्यास सांगितले आहे. तरी कृपया मार्गदर्शन करावे.**

**आर्या भट, पिंपरी**

खरं तर एवढ्याच माहितीवरून सल्ला देण्यापेक्षा प्रत्यक्ष भेटल्यास प्रश्नापर्यंत पोहोचता येईल. तरीदेखील काही शक्यता इथे सांगत आहे.

मुलगी नववीत आहे, म्हणजे पौगंडावस्थेकडे जाणाऱ्या वयात आहे. या वयात मुलांची 'स्व-प्रतिमा' तयार होत असते. या काळात स्वत:कडून स्वत:च्या असणाऱ्या अपेक्षा, पालकांच्या असणाऱ्या अपेक्षा, तसेच कुटुंबातील इतरांच्या अपेक्षा यांचा ताण ती घेऊ लागतात. या ताणाचं व्यवस्थित समायोजन करता येत नाही. या अपेक्षा पूर्ण करता आल्या नाहीत की मग- 'मी करू शकणार नाही' हा न्यूनगंड वाढू लागतो; त्याचबरोबर ताण आणि चिंतादेखील

मानसिकतेवर राज्य करू लागते.

या सर्वांचा परिणाम मग 'अपयशाच्या भीतीत' होतो. या सर्व परिस्थितीत मानसिक हतबलता येते व यावर उत्तर शोधण्यासाठी मग शारीरिक कारणांचा आधार घेतला जातो. एकदा का, 'मी आजारी आहे' म्हटल्यावर मला सर्व गोष्टींमध्ये मुभा मिळते- ही पळवाट शोधल्याने शारीरिक कारणे पुढे केली जातात.

कुठे तरी एका खोट्या समाधानात जगणं सुरू होतं की 'आता मला स्वत:ला सिद्ध करावं लागणार नाही'... 'आता माझ्याकडून कोणत्याच अपेक्षा नाहीत'- असं. परंतु ताण, चिंता, भीती यातून बाहेर पडण्यासाठी हा तात्पुरता मार्ग मूल अवलंबत असतं.

यातून खरंच बाहेर पडायचे असल्यास पालकांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. एक प्रश्न पालकांनी स्वत:ला नक्कीच विचारावा की- 'मी माझ्या मुलाला अतिरिक्त ताण तर देत नाही ना?' आणि याचे प्रामाणिक उत्तर द्यावे. तसे असल्यास ते थांबवणे गरजेचे आहे.

ही चिंता (Anxiety) आणि भीती (Phobia) ची केस आहे, ज्यामध्ये तज्ज्ञांची मदत घेणं गरजेचे आहे.

आपणही आपल्या बालकाच्या शैक्षणिक अथवा वर्तनविषयक समस्या आम्हाला पाठवू शकता. आमचे तज्ज्ञ तुमचे समाधान करतील. यासाठी आपण **shikshanvedh@grammagle.org** किंवा ९४२३५८०१४५ या नंबरवर एसएमएस द्वारे संपर्क करू शकता. मात्र मेलवर किंवा मेसेजवर 'शंका समाधान' असा स्पष्ट उल्लेख करावा.

## नवशिक्षणाची नव गृहिते

शिक्षण हे शिकणाऱ्यांसाठी असते-विद्यार्थी हा शिक्षणप्रक्रियेत केंद्रस्थानी असतो.

शिक्षण हे विकासानुरूप असते-एकूण विकास प्रक्रियेचा भाग असतो.

शिक्षण हे भावी कालाभिमुख असते-ते भूतकालातील शिक्षणाची प्रतिकृती नसते.

शिक्षण तुलनविहीन असते-प्रत्येकजण स्वतंत्रपणे शिकत असतो.

शिक्षण स्पर्धाविहीन असते-प्रत्येकानेच पूर्णतेप्रत जायचे असते; दुसऱ्यांच्या तुलनेत पुढे जायचे नसते.

शिक्षण परिसरातील संस्कृतीच्या कोंदणात होत असते.

शिक्षण हे उपजत क्षमतांच्या साहाय्याने होत असते.

शिक्षण आपले आपणच होत असते.

शिक्षण हे साध्य नसते, साधन असते.

# वाचक - संवाद

सप्रेम नमस्कार,

जानेवारीचा अंक आवडला. त्यातही श्रीमती विदुला जोशी यांचा लेख अधिक व्यावहारिक असल्यामुळे अधिक उपयुक्तही ठरेल, असे मला वाटले. त्यामुळे तो अधिक आवडला. प्रस्तुत लेख वाचल्यानंतर मला फार पूर्वीच्या माझ्या एका उपक्रमाचे स्मरण झाले. संस्थेचा प्रतिनिधी म्हणून आमच्या वि. रा. रुईया या मूकबधिर विद्यालयाचा प्रमुख पदावर सुमारे अडीच वर्षे मी काम केले. ज्यांना ऐकायलाच येत नाही, त्यांना ज्ञानग्रहणाची दारे निसर्गत:च कशी बंद असतात आणि परिणामी त्यांची कशी कुचंबणा होते, हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे.

'शिक्षणवेध'मधून अशाच प्रकारचे दर्जेदार लेख प्रकाशित व्हावेत, ही अपेक्षा.

आपला,
मनोहर राईलकर

## शिक्षणवेधसाठी आपण हे करू शकता.




- वार्षिक वर्गणीदार
- एखाद्या कुटुंबाला अंक भेट
- कल्पक सूचना
- विविध शैक्षणिक संदर्भ किंवा माहिती
- आपलं कसदार लेखन
- वर्षभर किमान एखादी जाहिरात
- उपक्रमांसाठी प्रायोजक
- परीक्षणार्थ पुस्तके
- प्रतिक्रिया आणि शुभेच्छा